# मार्करचित येशू-वार्ता

MARK [with Study Notes]

# मार्करचित येशू-वार्ता

## 1

1 *परमेश्वराचा पुत्र* येशू ख्रिस्त यांच्या येशू-वार्तेचा प्रारंभ. 2 *ज्याप्रमाणे यशया संदेष्टयाच्या पुस्तकात लिहिले आहे की, “पाहा,
मी आपला दूत तुझ्या आधी पाठवेन, जो तुमचा मार्ग तयार करील. 3 ऐका, घोषणा करणाऱ्याची वाणी जंगलात ऐकू येत आहे; की
प्रभूसाठी मार्ग तयार करा आणि त्याच्या वाटा सरळ करा; ही घोषणा करणारा 4 *योहान आला आणि तो अपराधांच्या क्षमेसाठी मन
परिवर्तनासाठी, बाप्तिस्म्याची घोषणा करून लोकांचा यार्देन नदीत बाप्तिस्मा करीत असे. 5 *यहूदीया प्रांत आणि यरूशलेमेत राहणारे,
त्याच्याजवळ आले, मग जेव्हा त्यांनी त्यांचे गुन्हें मान्य केले तेव्हा योहानाने त्यांना यार्देन नदीत बाप्तिस्मा दिला. 6 योहान उंटाच्या
केसांचे वस्त्र घालीत असे आणि त्याच्या कमरेला कातड्याचा कमरबंद (पट्टा) असे. त्याचे भोजन टोळ व जंगलातील मध असे
होते. 7 तो घोषणा करीत असे की माझ्यानंतर येणारे माझ्यापेक्षा अधिक सामर्थी आहेत. मी तर या लायकीचाही नाही की वाकून
त्यांच्या जोड्यांचे बंद सोडावेत. 8 मी तर तुम्हांला पाण्यात बुडवलेले (बाप्तिस्मा) आहे, परंतु येशू ख्रिस्त तुमचा, पवित्र आत्म्याने
बाप्तिस्मा करतील. 9 गालीलाच्या नासरेथाहून येशू त्या दिवसांत आले आणि त्यांनी यार्देनेत योहानाच्या हातून बाप्तिस्मा घेतला.
10 पाण्यातून वर येताना येशूंनी आकाश उघडलेले आणि पवित्र आत्मा, होल्यासारखा आपल्यावर उतरतांना पाहिला. 11 त्या वेळी
आकाशात आवाज घुमूं लागला की, “तू माझा लाडका पुत्र आहेस आणि मी तुझ्यावर प्रसन्न आहे”. 12 *मग परमेश्वराचा आत्मा
येशूंना लगेच जंगलात घेऊन गेला; 13 त्याठिकाणी चाळीस दिवसांपर्यंत (बराच दीर्घ काळ) सैतान त्यांच्यापुढे अनेक प्रलोभनें
(परीक्षा) आणून त्यांची पारख करीत राहिला. तेथे येशू जंगली पशूंबरोबर राहिले आणि परमेश्वरदूत त्यांची सेवा करीत राहिले.
14 *योहानाला अटक झाली, त्यानंतर येशूंनी गालीलात येऊन परमेश्वराच्या राज्याची येशू-वार्ता गाजविली. 15 *आणि असे म्हटले की
समय पूर्ण झाला आहे आणि परमेश्वराचे शासन खूपच जवळ आलेले आहे. हृदय परिवर्तन (पश्चात्ताप) करा आणि आनंदाच्या
खबरेंवर विश्वास ठेवा. 16 *गालीलाच्या समुद्राकाठून जातांना येशूंनी शिमोन व अंद्रिया, या मासे धरणाऱ्यांना समुद्रात जाळें टाकतांना
पाहिले. 17 येशू त्यांना म्हणाले, “तुम्ही माझे शिष्य व्हा आणि तेव्हा मी तुम्हांला माणसें धरणारे कोळी करीन. 18 ताबडतोब त्यांनी
जाळीं सोडली आणि ते येशूंच्या मागे गेले. 19 तेथून थोडे पुढे गेल्यावर येशूंनी, जब्दीचा पुत्र याकोब व त्याचा भाऊ योहान यांना
होडीत जाळीं नीट करतांना पाहिले. 20 बोलावल्यावर त्यानी आपल्या बापाला (अर्थात जब्दीला) मजुरांसोबत बोटीत सोडले आणि
येशूंबरोबर गेले (अनुसरण केले). 21 कफर्णहूम* येथे शब्बाथ दिवशी आराधनालयात जाऊन येशू शिक्षण देऊ लागले. 22 *येशू
धार्मिक शिक्षकांप्रमाणे नव्हे तर प्रचंड अधिकाराने शिकवीत होते, म्हणून त्यांच्या या शिकवणीमुळे तेथील लोक आश्चर्यचकित
झाले. 23 तेव्हा एक भूतग्रस्त* मनुष्य (दुष्टात्मा) आराधनालयात (प्रार्थना भवनांत) येऊन ओरडून म्हणाला, “हे नासरेथकरा, हे येशू

---

* **1:1** शब्द “मुक्तीवार्तेचा” हे एका ग्रीक शब्दाचे भाषांतर आहे; ज्याचा अर्थ आहे ‘उत्तम समाचार’ परमेश्वराचा संदेश असल्यामुळे आणि त्याद्वारे मनुष्याला उद्धाराचा मार्ग सापडत असल्यामुळे येशू व त्यांच्या शिष्यांनी त्याला उत्तम समाचार असे म्हटले. ‘येशू आणि ख्रिस्त’ या नांवाचा अर्थ पाहा मत्त 1:1यांत.

* *“परमेश्वराचा पुत्र”*- मत्त 1:18; 3:16-17; योहान 1:18; 3:16; 5:18-23.

* **1:2-3** मलाखी 3:2; यश 40:3; मत्त 3:3; 11:10.

* **1:4** मत्त 3:1-6; 9:5-7.

* **1:5-11** मत्त 3:4-17.

* **1:12-13** पाहा, मत्त 4:1-11; लूक 4:1-13;“येशूंची परीक्षा” - या थोडक्या माहितीद्वारे, मार्क आपल्याला एक सत्य सांगतो. हे सत्य इतर सुवार्तेत आढळत नाही - ते म्हणजे जंगली जनावरांची तेथे असलेली उपस्थिती. यावरून कळते की येशू किती धोक्याच्या आणि एकांतात असलेल्या ठिकाणी होते.

* **1:14** मत्त 14:3.

* **1:15** मत्त 3:2; 4:17.

* **1:16-20** मत्त 4:18-22.

* **1:21** *“कफर्णहूम”*- मत्त 4:13.

* **1:22** मत्त 7:28-29.

* **1:23** *“भूत”*- मत्त 4:24 अशुद्ध आत्मा.

आम्हांला असेच राहू दे, आमचा आपल्यांशी काहीच संबंध नाही. 24 *आपण आमचा नाश करावयास आला आहात काय? आपण
कोण आहात हे मला नीट ठाऊक आहे, आपण तर परमेश्वराचे पवित्रजण* आहात.” 25 *धमकावून येशू त्याला म्हणाले, “शांत हो
आणि त्याच्यातून बाहेर निघून जा” 26 लगेच तो अशुद्ध आत्मा त्याच्या शरीराला जोराने पिरगळून त्याच्यातून बाहेर निघून गेला. 27 *हे
पाहताच लोक आश्चर्याने एकमेकांशी अशी चर्चा करू लागले की, “हे काय आहे? ही तर एक नवीन शिकवण आहे! येशू मोठ्या
अधिकाराने दुष्टात्म्यांना हुकूम देतात आणि दुष्टात्में त्यांची आज्ञा मानतात.” 28 आणि मग लगेच येशूंचे नांव गालीलाच्या
सभोवतालच्या सर्व प्रदेशांत पसरले. 29 *येशू लगेच आराधनालयातून निघाले, ते याकोब, योहानासह, शिमोन व अंद्रियाच्या घरी
गेले. 30 त्यांनी येशूंना सांगितले की शिमोनाची सासू तापाने आजारी आहे. 31 जवळ जाऊन ज्या क्षणी येशूंनी तिचा हात धरून तिला
उठवले, त्या क्षणीच तिचा ताप निघाला आणि ती येशूंची सेवा करू लागली. 32 सूर्यास्तानंतर म्हणजे संध्याकाळी लोक सर्व
प्रकारच्या आजाऱ्यांना, भूतग्रस्तांना येशूंजवळ घेऊन आले. 33 संपूर्ण शहरच दाराशी गोळा झाले. 34 *येशूंनी अनेक तऱ्हेच्या रोगांनी
पीडलेल्या, खूप लोकांना बरे केले व त्यांतून अनेक भुतें काढली. भुतांनी येशूंना ओळखले होते, म्हणून येशूंनी त्यांना कायमचे शांत
केले. 35 *दिवस उजाडण्यापूर्वी भल्या पहाटेस येशू उठले; ते जंगलातील एकाकी ठिकाणी जाऊन प्रार्थना करू लागले. 36 तेव्हा
शिमोन आणि त्याचे सोबती येशूंना शोधण्याकरता निघाले. 37 येशू सापडल्यावर त्यांनी त्यांना सांगितले की, “सर्व लोक आपल्याला
शोधत आहेत.” 38 *येशू त्यांना म्हणाले, चला आपण सर्वजण, आजूबाजूंच्या दुसऱ्या वस्तींत जाऊ, तेथील लोकांना येशू-वार्ता
ऐकवू, कारण हेच माझे कार्य आहेत.” 39 *यास्तव येशूंनी सबंध गालील व तेथील आराधनालयांत (मंदिरात) जाऊन येशू-वार्ता
गाजवली व भुतें काढणे कायमच ठेवले. 40 *त्याच ठिकाणी गुडघे टेकून एका कोढ्याने विनंती करून म्हटले की, “जर आपली
इच्छा असेल तर आपण मला शुद्ध करू शकता”, 41 येशूंना त्याची कीव आली, त्यांनी त्याला स्पर्श करून म्हटले, “माझी इच्छा
आहे की तू शुद्ध व्हावेस.” 42 लगेच त्याचे कोढ गेले व तो शुद्ध झाला. 43 सावध राहण्याचा सल्ला देऊन येशूंनी त्याला पाठवून दिले.
44 आणि हे सुद्धा सांगितले की कोणाला काही न सांगता, स्वतःला याजकासमोर सादर करा; सोबतच याचे प्रमाण म्हणून मोशेद्वारे
नेमलेले अर्पणही करा. 45 *परंतु तेथून गेल्यावर कोढ्याने आपल्या बऱ्या होण्याच्या वर्तमानाची अशी वादळी वाच्यता केली की,
(इतकी गाजवीली की ),यामुळे येशूंचे (खुल्लमखुल्ला)स्वतंत्रपणे फिरणे कमी झाले. परंतु येशू बाहेरील उजाड स्थानी राहिले व

---

*1:24** दुष्ट आत्मा किंवा अशुद्ध आत्म्यांना हे ज्ञान होते की येशू आपल्या व्यक्तिमत्वात आणि सामर्थ्यात संपूर्णपणे किती अनन्यसाधारण होते.

* *“परमेश्वरपित्याचे पवित्रजण”*- नवीन करारांत केवळ याच ठिकाणी या शब्दांचा वापर झालेला आहे, लूक 4:34; योहान 6:69. परंतु सगळीकडे (प्रत्येक ठिकाणी) येशूंच्या संपूर्ण पवित्रतेवर भर दिलेला आहे. त्यांच्या उत्कृष्ट पवित्रेचा उल्लेख प्रत्येक ठिकाणी केलेला आहे. पाहा लूक 1:35; योहान 8:46; 2 करिं 5:21; इब्री 4:15; 1 पेत्र 2:21-24.

***1:25** येशूंठायी सर्व दुष्टात्म्यांवर, अशुद्ध आत्म्यांवर परिपूर्ण अधिकार होता आणि आजही आहे. (5:1-10; लूक 10:17).

***1:27** नवीन शिकवण लोकांना स्तंभित करीत नव्हती, पण केवळ यासाठी ते आश्चर्य करीत होते की येशूंनी परमेश्वराच्या अलौकिक शक्तीमान कार्याद्वारे त्याचे प्रमाण दिले. परमेश्वराची प्रचंड शक्ति व बळ त्यांच्याठायी होते. नोट्स - मत्त 8:1.

***1:29-34** मत्त 8:14-17.

***1:34** वचन 25; 3:12; 5:43; मत्त 8:4; 9:30; 12:16.

***1:35** येशू वारंवार प्रार्थना करीत होते (मत्त 14:23; 19:13; 26:36,39; लूक 5:16; 6:12; 9:29; 22:32; योहान 17 अध्याय; इब्री 5:7). प्रार्थनेकरता येशू एकांती जात असत. अशीच जागा ते शोधीत असत. ज्याप्रमाणे एखादा मनुष्य देवाशी प्रार्थना करतो त्याचप्रमाणे येशूही प्रार्थना करीत असत. इतकेच केवळ नव्हे तर परमेश्वराच्या एकमेव - अनन्यसाधारण पुत्रासारखेही ते देवाशी प्रार्थना करीत असत. म्हणजेच, त्यांचा दैवीक (परमेश्वरी) आणि मानवी स्वभाव (हे दोन्ही) त्यांच्या प्रार्थनेद्वारे प्रगट होत होता. तुलना योहान अध्याय - 17.

***1:38** पाहा यश 61:1.अनेक कारणांपैकी हे एक कारण होते की येशू स्वर्गातून पृथ्वीवर आले. इतर कारणांसाठी पाहा मत्त 5:17.

***1:39** मत्त 4:23.

***1:40-43** मत्त 8:1-4.

***1:45** हा कुष्ठरोगी बरा झाला होता. येशूंचे आभार मानून त्यांची आज्ञा पाळण्याऐवजी, येशूंनी सांगितलेल्या गोष्टीविरूद्ध त्याने कार्य केले. अशा प्रकारचे वर्तन करणारा हा काही शेवटचा मनुष्य नव्हता. लोकांचा समुदाय वाढत चालला होता, धार्मिक पुढाऱ्यांचा विरोध बळकट होत होता, तो इतका तीव्र विरोध होता की येशू तेथून निघाले; कारण यावेळी त्याठिकाणी दंगा/गडबड निर्माण करण्याची त्यांची इच्छा नव्हती. (पाहा योहान 7:30)

आजूबाजूचे लोक त्यांच्याकडे येतच राहिले.

## 2

1 *पुष्कळ दिवसानंतर कफर्णहूमात, एका घरांत येशू आहेत ही बातमी बऱ्याच लोकांनी ऐकली. 2 तेथे मोठ्या संख्येने लोक गोळा
झाल्यामुळे दारापर्यंतही जागा नव्हती, परंतु येशू लोकांना परमेश्वराची वचनें शिकवीत होते. 3 तेव्हा चार लोक लकवा (पक्षघात)
असलेल्या एका माणसाला उचलून येशूंना भेटावयास आले. 4 गर्दी असल्यामुळे त्या चौघांना येशूंकडे जाता येत नव्हते म्हणून त्यांनी
कौलें काढली. नंतर रोग्यासहीत त्यांनी बाज वरून खाली लटकवून येशूंसमोर ठेवली. 5 त्या चौघांचा विश्वास पाहून येशूंनी त्या
लकवाग्रस्त मनुष्याला म्हटले, “बेटा, तुझे अपराध (गुन्हें) क्षमा झाले आहेत.” 6 तेव्हा तेथे बसलेले धर्मपंडीत आपआपल्या मनांत
अशा प्रकारे विचार करू लागले की, हा मनुष्य येशू असे का बोलतो आहे? 7 हा तर परमेश्वर- निंदाच करतो आहे. परमेश्वराखेरीज,
अपराधांची क्षमा आणखी कोणी करू शकतो काय?” 8 लगेच येशूंनी आपल्या आत्म्याठायी ओळखून घेतले की ते आपआपल्या
मनांत काय विचार करीत आहेत. येशू त्यांना म्हणाले, “तुम्ही तुमच्या मनात असे विचार का येऊ देत आहा?” 9 लकवाग्रस्ताला,
“तुझे अपराध क्षमा झाले आहेत असे म्हणणे सोपे आहे किंवा की ऊठ आपली बाज उचलून परत जा?” 10 परंतु पृथ्वीवर
अपराधांची क्षमा करण्याचा अधिकार सुद्धा येशूंठायीच आहे, हे त्यांना शिकवावे म्हणून, 11 येशू त्या अपंगाला म्हणाले, “ऊठ,
आपली बाज उचलून आपल्या घरी जा.” 12 त्याच वेळी तो उठला, सर्वांच्या नजरेसमोरच त्याने आपली बाज उचलली व तेथून
निघून गेला. हे पाहून सर्वजण स्तंभित झाले व म्हणू लागले की, “असे आम्ही कधीच पाहिलेले नाहीये”. 13 *तेथून निघून येशू
समुद्रकिनाऱ्याकडे आले; त्याठिकाणी लोकांची अफाट गर्दी त्यांच्याकडे धावत आली आणि मग येशू त्यांना शिकवू लागले.
14 तेथून पुढे जातांना येशूंना अल्फीचा मुलगा लेवी, टॅक्स वसूलीच्या आसनावर बसलेला दिसला. त्यांनी त्याला म्हटले,
माझ्याबरोबर ये; तो लेवी उठून त्यांच्याबरोबर गेला. 15 *जेव्हा येशू त्याच्या घरी जेवावयास बसले तेव्हा तेथे पुष्कळ कर घेणारे व
गुन्हेंगारही हजर होते. तोवर येशूंच्या मागे येणाऱ्यांची संख्या बरीच वाढली होती. 16 येशू कर घेणाऱ्या व गुन्हेंगार लोकांबरोबर जेवत
आहे हे पाहून, परूशी व धर्मपंडीत त्यांच्या शिष्यांना म्हणाले, “येशू कर घेणाऱ्या व अपराधी लोकांबरोबर जेवतात.” 17 येशूंनी
त्याचे ऐकले आणि म्हटले, “निरोगी लोकांना डॉक्टरची गरज नसते, परंतु रोग्यांना असते; माझे आमंत्रण (बोलावणे) नीतिमानांसाठी
नव्हे तर अपराधी लोकांसाठी आहे.” 18 *योहानाचे शिष्य व परूशी उपास करीत असत, त्यामुळे लोक येशूंकडे येऊन त्यांना
म्हणाले, “योहानाचे शिष्य व परूश्यांचे शिष्य उपास करतात, परन्तुआपले शिष्य उपास का करीत नाहीत?” 19 येशू त्यांना म्हणाले,
“वराती लोकांबरोबर, वर आहे तोवर ते कधी उपास करतील काय? नाहीच मुळी. 20 पण तरीही असे दिवस येतील की वर
वरातींपासून वेगळा केला जाईल आणि मग ते उपास करतील. 21 जुन्या वापरलेल्या कापडावर कोणी नवीन कापडाचे ठिगळ
लावीत नाही, कारण नवीन ठिगळ, जुन्या कापडातून काही दोरे ओढून घेईल; त्यामुळे जुने कापड फाटून आणखी छिद्र मोठे होईल.
22 ताजा द्राक्षारस कोणीही जुन्या कातडी पिशवीत घालीत नाही, कारण ताजा द्राक्षारस जुन्या पिशव्या फाडून टाकेल म्हणून ताजा
द्राक्षारस नेहमी नवीन कातडी पिशवीतच भरला जातो; कारण तसे केले नाही तर, परिणामी द्राक्षारस व पिशव्या बर्बाद होतील.
23 *एका शब्बाथ दिवशी जेव्हा येशू आपल्या शिष्यांसमवेत शेतांतून जात होते, तेव्हा त्यांचे शिष्य चालता चालता कणसें मोडू
लागले. 24 तेव्हा परूशी म्हणाले, “पाहा, जे कार्य शब्बाथ दिवशी करू नये, तेच कार्य हे करीत आहेत?” 25 येशू त्यांना म्हणाले,
“तुम्हांला ठाऊक नाही काय की, दावीद व त्याच्या सोबत्यांना जेव्हा भूक लागली होती, तेव्हा त्यांनी काय केले होते? 26 समर्पित

---

*__2:1-12__ मत्त 9:1-8 चे नोट्स पाहा. मार्क आपल्यासमोर किती आगळे चित्र मांडतो ते पाहा. मार्कने दाखविले की लकवाग्रस्ताच्या मित्रांनी प्रत्येक अडचण व बाधा यांवर मात करण्याचा कसा दृढ निश्चय केला होता; हे त्यांच्या विश्वासावरून प्रगट होते. या गोष्टीत निश्चितच आपल्यापुढे एक उत्तम उदाहरणच ठेवलेले आहे. विश्वासाची चिकाटी व निरंतरता यासाठी पाहा, मत्त 7:7-8; लूक 11:5-10; 18:1-8.

*__2:13-14__ पाहा मत्त 9:9.याठिकाणी लेव्याला मत्तय असे म्हटलेले आहे. कदाचित लेवी हे त्याचे वास्तविक व मूळचे नांव होते, पण एका प्रेषिताच्या रूपांत त्याचे नवीन नांव मत्तय असे होते. इब्री भाषेत ‘प्रभूचे वरदान’ याच शब्दाला ग्रीक भाषेत ‘मत्तय’ असे म्हणतात. (याहवे).

*__2:15-17__ मत्त 9:10-13.

*__2:18-22__ मत्त 9:14-17.

*__2:23-28__ मत्त 12:1-8.

भाकरी खाण्याची परवानगी प्रमुख याजकाखेरीज कोणालाही नव्हती; तुम्ही वांचले नाही काय की कशा प्रकारे अब्याथार पुरोहित
असताना दावीद प्रार्थनालयात गेला आणि आपल्याबरोबरचे सोबती घेऊन त्या सर्वांनी मिळून समर्पित भाकरी खाल्ल्या? 27 येशू
त्यांना म्हणाले, “शब्बाथाचे[*] प्रयोजन मनुष्यांसाठी केलेले होते, मनुष्य शब्बाथासाठी केलेला नाही. 28 [*] [*]कारण मी शब्बाथ
दिवसाहूनही श्रेष्ठ आहे.”

## 3

1 [*]येशू जेव्हा पुन्हा आराधनालयात गेले तेव्हा त्यांनी,’ एक- हात’ वाळलेला मनुष्य पाहिला. 2 परूशी दोष लावण्याच्या संधिची
वाट पाहात होते, की येशू शब्बाथ दिवशी त्याला बरें करतात की नाही. 3 येशू वाळलेल्या हाताच्या माणसाला म्हणाले, “जरा
सर्वांच्यामध्ये ये.” 4 तेव्हा येशूंनी परूशी लोकांना विचारले, “शब्बाथ दिवशी काय करणे योग्य आहे- बरे करणे किंवा वाईट करणे,
कोणाला वाचवणे किंवा त्याचा जीव घेणे; यांपैकी काय बरोबर आहे?” परंतु सर्वजण शांत राहिले. 5 [*]येशू त्यांच्या मनाचा
कठोरपणा पाहून उदास झाले, त्यांनी खूप रागाने त्यांच्याकडे पाहिले आणि त्या मनुष्याला म्हटले, “आपला हात मला (माझ्याकडे
कर) दे”; ज्या क्षणी त्याने तसे केले, त्याचा हात बरा झाला. 6 [*]तेव्हा परूशी लगेच बाहेर गेले. हेरोदियांबरोबर[*] ते येशूंविरूद्ध
याविषयी सल्ला -मसलत करू लागले की येशूंना कशा प्रकारें जिवें मारावे. 7 यानंतर येशू आपल्या शिष्यांबरोबर समुद्राकडे निघाले
आणि गालीलातून लोकांच्या एका मोठ्या समूहाने त्यांचे अनुसरण केले. 8 [*]येशू अद्‌भुतें करीत आहेत असे ऐकून यहूदीया,
यरूशलेम, इदोम व यार्देनेच्या पलीकडचा प्रदेश आणि सोर व सिदोनच्या[*] आजूबाजूंच्या प्रदेशांतून लोकांचा एक प्रचंड मोठा
समुदाय त्यांच्याकडे आला. 9 [*]येशू आपल्या शिष्यांना म्हणाले, “गर्दी भरपूर आहे, लोकांनी मला चेंगरून टाकू नये म्हणून
माझ्यासाठी लहान होडी तयार ठेवा.” 10 येशूंनी लोकांचे आजार-रोग बरें केले होते; म्हणून रोगी व पीडा असलेले लोक स्पर्श
करण्यासाठी येशूंच्या अंगावर पडत होते. 11 [*]ज्या ज्या वेळी अशुद्ध आत्में येशूंना पाहात असत, त्या त्या वेळी ते खाली कोसळत
आणि ओरडून म्हणत की, येशू परमेश्वर आहेत. 12 येशूंनी वारंवार लोकांना सावध केले की त्यांनी त्यांच्याविषयी जास्त सूचना देऊ
नयेत. 13 [*]यानंतर येशू डोंगरावर चढून गेले. ज्या सर्वांवर येशूंचे प्रेम होते. 14 येशू-वार्तेची खबरबात सांगण्यासाठी, जे पाठविले जाणार

---

[*]**2:27** *“शब्बाथाचे”*- निर्ग 20:8-11.प्रत्येक आठवड्यात केलेल्या परिश्रमापासून विश्रांती मिळावी यासाठी हा विशिष्ट दिवस नेमिलेला होता. त्याचप्रमाणे लोकांनी आपल्या निर्मात्याची आणि उद्धारकर्त्याची स्तुति -आराधना त्या दिवशी करावी याकरता शब्बाथाचे प्रयोजन केलेले होते. येशूंच्या काळातील अनेक धार्मिक पुढाऱ्यांनी शब्बाथाविषयीचे स्वतः तयार केलेले नियम लोकांसाठी केले होते. लोकांच्या गरजेपेक्षा अधिक प्रमाणात त्यांनी हे नियमच रूढ केले होते. मनुष्यप्राणी हा दिवस आणि अधिलिखीत नियम किंवा नियमबद्धतेहून अधिक महत्वाचा, मोलाचा आहे या गोष्टीवर येशूंनी आवर्जून भर दिला. तुलना कल 2:16.

[*]**2:28** *“मी अर्थात मनुष्याचा पुत्र”*- मत्त 8:20.

[*]*“प्रभु”* - मत्त 12:8.

[*]**3:1-6** मत्त 12:9-14.

[*]**3:5** जे, लोकांना धुळीत पायदळी तुडवून मानव निर्मित नियमांनी त्यांना दुखापत करण्याची इच्छा बाळगित होते, नव्हे तसे करीत होते, त्यांच्यावर येशू प्रचंड क्रोधाने भरून गेले आणि केवळ रागच नव्हे तर त्याविषयी त्यांना खूप दुःखही झाले; हे असे लोक होते जे आपल्या हृदयाच्या कठोरपणामुळे शब्बाथ दिवशी एखाद्याला बरें करण्याची मनाई करीत होते, पण त्याच शब्बाथ दिवशी एखाद्याला जिवें मारण्याचा कट करणे, हे ते मान्य करीत होते. प्रियांनो आज देखील, अनेक धार्मिक लोकांठायी असलेली वागणूक, व्यवहार याविषयी येशू निरंतर क्रोधिष्ट होतात; त्या गोष्टींचा अनेकदा राग बाळगतात. पाहा, की अपराध आणि अन्यायाविरूद्ध व्यक्त केला जाणारा परमेश्वरी- क्रोध न्याय्य व योग्य आहे (गण 25:3). तुलना निर्ग 32:19-20; इफि 4:26.

[*]**3:6** मत्त 12:14.

[*]*“हेरोदीयांबरोबर”*- मत्त 22:16.

[*]**3:8** इदोम हा यहूदीयाच्या दक्षिण पश्चिमेकडचा प्रदेश होता.

[*]*“सोर व सिदोनच्या”*- मत्त 11:21.

[*]**3:9** मत्त 13:2.

[*]**3:11-12** पाहा 1:24-25,34.

[*]**3:13-19** नोट्‌स - मत्त 10:1-4.

होते त्यां लोकांनी त्यांच्याबरोबर रहावे म्हणून, येशूंनी त्यांची निवड केली. 15 हे देखील की त्यांना (बोलविलेल्यांना) दुष्टात्में (भुतें)
काढण्याचा अधिकारही असावा/ मिळावा. 16 पाचारण झालेल्या लोकांची नांवे अशी :शिमोन, ज्याचे नांव त्यांनी पेत्र ठेविले,
17 जब्दीचा मुलगा याकोब व याकोबाचा भाऊ योहान ज्यांची नांवे येशूंनी बोआनेर्गेस ठेविले, ज्याचा अर्थ आहे,‘गर्जनेचे* पुत्र’.
18 अंद्रिया, फिलिप्प, बर्थलमय, मत्तय, थोमा, अल्फीचा मुलगा याकोब, तद्दय, शिमोन कनानी 19 आणि (विश्वासघाताने) त्यांना
धरून देणारा यहूदा इस्कर्योत. 20 *ज्या वेळी येशू घरी आले त्या वेळी पुन्हा लोकांचा इतका जमाव झाला की ते भोजन करू शकले
नाही. 21 जेव्हा येशूंच्या घरच्या लोकांनी* हे ऐकले तेव्हा ते येशूंना धरण्याकरता निघाले, कारण त्यांना वाटू लागले होते की येशूंना
वेड लागलेले* आहे. 22 **यरूशलेमेतून आलेले धर्मपंडीत म्हणत होते की येशूंच्याठायी सैतान आहे आणि ते भुतांचे स्वामी
बालजबूलाच्या* मदतीनेच अशुद्ध आत्में काढतात. 23 म्हणूनच येशूंनी त्यांना जवळ बोलावून आणि उदाहरणें देऊन सांगितले की
सैतान, सैतानाला काढू शकतच नाही; 24 उदाहरणें ही होती : जर एखाद्या देशाची एकता नष्ट झाली असेल तर, तो देश कसा स्थिर
राहू शकेल? 25 जर एखाद्या घरात फूट पडली तर ते घर टिकाव कसा (स्थिरावेल) धरेल? 26 म्हणूनच जर सैतान स्वतःचा विरोधी
होऊन आपसांतच फूट पाडेल तर, त्याचे राज्य कसे टिकेल? पण त्याचा अंत येऊन ठेपलेलाच आहे. 27 एखादा मनुष्य कोणत्याही
माणसाच्या घरात शिरून त्याच्या वस्तु लुटूं शकत नाही; जोवर तो आधी त्या दणकटाला बांधीत नाही त्यानंतरच तो त्या घरात
लुटमार करू शकेल. 28 मी तुम्हांला अगदी खरे सांगतो की, लोकांनी केलेल्या सर्व प्रकारच्या अपराधांची व निंदेच्या शब्दांची क्षमा
होईल, 29 परंतु जो कोणी पवित्रात्म्याच्या विरोधात काही बोलेल तो कधीच क्षमा केला जाणार (मिळणार) नाही, पण तो
सार्वकालिक गुन्हेंगार ठरील . 30 *येशू याकरता असे म्हणाले, कारण ते म्हणत होते की, येशूंच्या आत अशुद्ध आत्मा आहे. 31 *तेव्हा
येशूंची आई आणि त्यांचे भाऊ यांनी बाहेरूनच त्यांना बोलावले. 32 सभोवताली बसलेल्या लोकांनी येशूंना सांगितले, “पाहा, आपली
आई व आपले भाऊ आपल्याला शोधीत, बाहेर आले आहेत.” 33 येशूंनी लोकांना विचारले, “माझी आई व भाऊ कोण आहेत?”
34 येशूंनी त्यांच्या चारीं बाजूला बसलेल्या लोकांकडे पाहून म्हटले, “पहा, माझी आई व भाऊ हेच आहेत; 35 म्हणून जो मनुष्य
परमेश्वराच्या वचनांनुसार करतो, तोच माझा भाऊ व तीच माझी आई व बहीण आहे.”

# 4

1 *समुद्राकाठी येशू ख्रिस्त (मशीहा)शिकवीत होते त्या वेळी त्यांच्याजवळ लोकांची फार मोठी गर्दी जमली; म्हणून ते एका बोटीत

---

* **3:17** *“गर्जनेचे”*- असे वाटते की त्यांचा स्वभाव, नैसर्गिक प्रवृत्ती आणि वागणुकीची रीत, किंवा कल काहीसा वादळी होता. तुलना लूक 9:54.

* **3:20** पाहा 6:31.

* **3:21** *“घरच्या लोकांनी”*- येथे जो ग्रीक शब्द उपयोगात आला आहे त्याचा अर्थ म्हणजे “जे त्याच्याबरोबर आहे” अर्थात जे त्यांचे आहेत. याचा संकेत कुटूंबाकडे किंवा नातेवाईकांकडेही असू शकतो.

* *“वेड लागलेले”*- तुलना योहान 10:20.येशूंचा परमेश्वराप्रत उत्साह व आवेग दांडगा होता; त्यांच्याठायी लोकांना शिकविण्याची आणि लोकांची मदत करण्याची इच्छा इतकी प्रबळ होती, की ज्या सामान्य माणसांनी अशा प्रकारचा अनुभव स्वतः घेतलेलाच नव्हता त्यांना येशू एक असामान्य व्यक्ती भासत असत. तुलना योहान 2:13-17.अशाच कारणांमुळे प्रत्येक शताब्दीत येशूंचे काही शिष्य आणि विश्वासीं वेडे किंवा मूर्ख समजले गेलेत. पाहा प्रेषि 26:24.

* **3:22-29** मत्त 12:25-32.

* **3:22** येशूंच्या शिकवणीविषयी आणि वागणुकीविषयी यहूदी धार्मिक पुढाऱ्यांकडे वेगळेच स्पष्टीकरण होते; येशू सैतानाच्या आधीनतेत आहे असे ते म्हणत होते.

* *“बालजबूलाच्या”*- नोट्स मत्त 10:25.येशूंविषयी काय विश्वास करावा, हा निर्णय प्रत्येकाने घ्यावयाचा आहे. येशू वेडपट किंवा दुष्टात्माग्रस्त, किंवा ठरवून आणि योजून धोका देणारे धोकेबाज होते काय? जर असे नाही तर ते परमेश्वरापासून आले होते, ते सत्य बोलत होते आणि परमेश्वराची कार्यें केली होती. सर्व पुरावे आणि प्रमाण दाखवतात की ते परमेश्वराकडून आले होते.

* **3:30** वचन 22; योहान 7:20; 8:48,52; 10:20.

* **3:31-35** मत्त 12:46-50.

* **4:1-20** मत्त 13:1-23. मार्क, मत्तयापेक्षा काही वेगळे शब्द वापरतो; तेच सत्य व्यक्त करण्याकरता, कळविण्याकरता तो थोडचा भिन्न शब्दांचा उपयोग करतो. अकराव्या वचनांत मार्क ‘परमेश्वराचे राज्य’ हा शब्द वापरतो, पण मत्तय ‘स्वर्गाचे राज्य’ हा शब्द

जाऊन बसले आणि लोक समुदाय समुद्राकाठी जमिनीवर उभा राहिला. 2 दाखले देऊन येशू त्यांना शिकवीत असत. त्यांपैकी एक
दाखला असा होता: 3 एक शेतकरी, बी पेरण्याकरता निघाला, 4 पेरणी करतांना काही बी वाटेच्या बाजूला पडले आणि पक्ष्यांनी
येऊन ते खाऊन टाकले. 5 काही बी खडकाळ जमिनीत पडले, तेथे त्यांना खोल माती मिळाली नाही; तरीही ते लगेच उगवले, 6 परंतु
सूर्य वर आल्यावर, त्यांची मूळें खोल गेली नसल्यामुळे ते लवकरच वाळून गेले. 7 काही बी झुडपांत पडले व झुडपें वाढली आणि
त्यामुळे त्यांची वाढ खुंटली, म्हणून बी काहीच फळ देऊ शकले नाही. 8 परंतु काही बी चांगल्या जमिनीत पडले, ते उगवले व फळ
देणारे झाले; काहींनी तीसपट, काहींनी साठपट आणि काहींनी शंभरपट असे फळ दिले. 9 तेव्हा येशू म्हणाले, जो कोणी माझे ऐकून
योग्य पाऊल उचलतो त्याच्यासाठी हा दाखला फायदेशीर आहे. 10 येशू एकटे असताना, त्यांच्याबरोबर असलेल्या बारा जणांनी व
त्यांच्या सोबत्यांनी येशूंना या दाखल्याविषयी विचारले. 11 येशू त्यांना म्हणाले, “परमेश्वराच्या राज्यात घडणाऱ्या रहस्यमय गोष्टींची
जाण केवळ तुम्हांलांच दिलेली आहे, पण बाहेरच्या लोकांसाठी सर्व गोष्टी दृष्टांतात (दाखले देऊन) सांगितल्या जातात. 12 ते पाहात
रहातील पण त्यांना कळणार नाही, ऐकतील पण त्यांना समजणार नाही, व त्यांचे मन-परिवर्तन झाले नसल्यामुळे, त्यांचे अपराध
क्षमा होऊ शकणार नाही. 13 मग येशू त्यांना म्हणाले, “तुम्ही या दृष्टांताचा (दाखल्याचा) अर्थ समजला नाहीत काय? तर मग तुम्ही
दुसरे दाखलें कसें काय समजू शकाल?” 14 जो पेरण्याचे कार्य करितो,तो वचन पेरतो. 15 जे (वचन)वाटेच्या बाजूला पेरले जाते, ते हे
लोक आहेत : जेव्हा त्यांनी ऐकीले तेव्हा सैतान लगेच येतो आणि जे काही शिकविले होते ते उचलून नेतो. 16 त्याचप्रमाणे जे
खडकाळ जमिनीतील पेरलेले ते हे लोक आहेत : जे शिकवलेले वचन ऐकून लगेच आनंदाने स्वीकारतात, 17 तरीपण स्वतः
आंतरिक रीत्या सशक्त नसल्यामुळे काही दिवसाकंरताच ते टिकून राहतात; यानंतर, स्वीकारलेल्या येशूंच्या शिकवणीमुळें जर
त्यांचावर एखादे संकट, क्लेश, समस्या आली किंवा छळ झाला तर मागे हटतात. 18 जे झुडपांमध्ये पेरले जाते ते हे लोक आहेत, जे
येशू-वार्ता ऐकतात, पण त्यानंतर; 19 दुनियादारीची चिंता, संपत्तिचा धोका आणि दुसऱ्या गोष्टींचा लोभ त्यांच्याठायी शिरतो, ती ते
इतकी घट्ट आवळून असतात (धरतात) की पेरलेले बी निष्फळ राहते. 20 जे वचन चांगल्या जमिनीवर पेरले गेले ते हे लोक आहेत :
आनंदाची खबरबात ऐकून ती स्वीकारतात वाढत जातात, आणि मग कोणी तीसपट, कोणी साठपट तर कोणी शंभरपट असे
उत्पादन देतात. 21 *येशू त्यांना म्हणाले, दिवा भांड्याखाली किंवा पलंगाखाली ठेवण्यासाठी आणतात काय? 22 कारण कोणतीही
बाब लपलेली नाही, जी पुढे येणार नाही, ना कोणतीही वस्तु अशी गुप्त आहे , जी प्रगट होणार नाही. 23 *जर कोणी माझ्या गोष्टींकडे
लक्ष देण्याची इच्छा धरतो तर त्याने द्यावे. 24 *मग येशू त्यांना म्हणाले, “जे काही तुम्ही ऐकता त्याविषयी खबरदारी घ्या; ज्या मापाने
तुम्ही दुसऱ्यांसाठी मापता, त्याच मापाने तुमच्याकरता मापले जाईल आणि जो अधिक ऐकितो, त्याला जास्तही दिले जाईल,
25 *कारण ज्याच्याजवळ आहे, त्याला आणखी मिळेल पण ज्याच्याजवळ थोडके आहे, त्याचे ते सुद्धा त्याच्यापासून घेतले जाईल.”
26 *यानंतर येशू त्यांना म्हणाले, “परमेश्वराचे राज्य असेच आहे; जसे एखादा मनुष्य जमिनीत बी पसरतो, 27 जो रात्री झोपतो आणि

---

उपयोगात आणतो. उघडउघड आणि स्पष्टपणे या दोन्ही शब्दसमूहांचा अर्थ सारखाच आहे. या राज्यावरचे नोट्स मत्त 4:17 यांत पाहा. मार्क काही आणखी शब्दांचा त्यांत समावेश करतो.

***4:21-22** मत्तय अध्याय 13 यांत ही वचनें आढळत नाहीत, पण त्याच्या सुवार्तेत इतर ठिकाणी असेच, सारखे/ समान शब्द आढळतात. पाहा मत्त 5:15; 10:26.

***4:23** मत्त 13:9.

***4:24** मत्त 7:2.

***4:25** मत्त 13:12; 25:29.

***4:26-29** हा दाखला केवळ मार्करचित सुवार्तेतच आढळतो. शाब्दीक पातळीवर प्रत्येक दिवसाचे सत्य आणि वास्तविकता हीच आहे की, जेव्हा उत्तम बी, उत्तम जमिनीत पेरले जाते तेव्हा अंकुर निघणे आणि त्याची वाढ होणे अनिवार्य आहे; ते टाळता किंवा थांबवता येणारे नाहीच मुळी. बी पेरणाऱ्याला ही प्रक्रिया समजली नाही तरी, कळत नसली तरी, त्याचा वाढीवर परिणाम होत नाही. वाढ कदाचित हळू होत असेल पण ही प्रक्रिया आपोआप, स्वाभाविक होणारी अशी आहे. एखाद्याच्या जीवनात किंवा संपूर्ण जगात, प्रारंभापासून कापणीच्या शेवटापर्यंत, परमेश्वराच्या राज्याविषयी हे सत्य आहे. माणसाच्या अंतःकरणात आणि हृदयांत परमेश्वराचे वचन हे एक जिवंत शक्तीमान बी आहे जे पेरिले जाते. ते अंकुरित होईल, वाढेल आणि पीक उत्पन्न करेल पण लोकांना हे समजणार नाही, की ते कसे होते किंवा ती वाढ ते पाहू शकणार नाहीत किंवा त्यावर नियंत्रणही ठेवू शकणार नाहीत. तुलना 1 करिं 3:6-7; 1 पेत्र 1:23-25. येशूवार्ता गाजविणाऱ्यांसाठी आणि परमेश्वराचे सत्यवचन शिकविणाऱ्यांसाठी ही एक सशक्त उत्साहवर्धक, व प्रेरणा देणारी बाब आहे. त्यांनी परमेश्वराच्या वचनांच्या सामर्थ्यावर आणि परमेश्वराच्या कार्यांवर मोठा आत्मविश्वास ठेवून त्यांवर भरंवसा करून त्यांप्रत श्रद्धा बाळगावी. पण तरीही निरंतर वाढ आणि उन्नति आहे, हे सत्य असले तरी

दिवसा जागा होतो, आणि ते बी मातीत कसे रूजले, वाढले, हे ज्याला कळेनासे होते. 28 मातीत लपलेल्या ताकदीनेच, एखादे बी,
अंकुर, कणीस आणि मग कणसांतील दाणे; आपसुकच तयार करते. 29 दाणे पिकले की, तो कापणीसाठी.* लगेच विळा वापरतो.
30 *त्यानंतर येशू म्हणाले, “मी परमेश्वर राज्याची बरोबरी (तुलना)कशाशी करू? कोणते उदाहरण देऊन त्याविषयी समजावून सांगू?”
31 परमेश्वराचे राज्य मोहरीच्या दाण्यासारखे आहे. पेरल्या जाणाऱ्या सर्व दाण्यांपेक्षा तो सर्वात लहान आहे. 32 परंतु उगवल्यानंतर तो,
सर्व भाज्यांमध्ये मोठा होतो, त्याच्या फांद्या इतक्या मोठाल्या असतात की, उडणारे पक्षी येऊन त्यांच्या छायेत वस्ती करतात.
33 *लोकांना समजेल, कळेल अशा प्रकारचे दाखलें देऊन येशू त्यांना शिकवीत असत. 34 *दाखल्यांवांचून येशू त्यांच्याशी बोलत
नसत. (तरीपण) जेव्हा, एकांती, केवळ शिष्य त्यांच्याबरोबर असायचे, तेव्हा त्या दाखल्यांचा अर्थ ते स्पष्ट करीत असत. 35 *त्याच
संध्याकाळी येशू त्यांना म्हणाले, “चला आपण सर्व पलीकडे जाऊ!” 36 लोकसमुदायाला निरोप दिल्यानंतर ते सर्व येशूंबरोबर एका
बोटीत बसले. 37 तेव्हा एक मोठे वादळ झाले व लाटा नावेवर आदळूं लागल्या, त्यामुळे नाव पाण्याने भरू लागली. 38 परंतु येशू
स्वतः नावेच्या मागच्या भागात गादीवर झोपलेले होते. येशूंना जागे करून ते लोक म्हणाले,” गुरूजी! आपल्याला ठाऊक नाही
काय, की आपण बुडणारच आहोत?” 39 “ताबडतोब येशूंनी वादळाला धमकावले आणि पाण्याला म्हटले,” आवाज़ नकोच.
खामोश! आणि शांतता पसरली. 40 येशू त्यांना म्हणाले, “तुम्ही का घाबरला? अजूनही तुमचा माझ्यावर विश्वास नाही काय?”
41 शिष्य भ्याले, घामांघूम होऊन, घाबरलेल्या मनस्थितीत, ते एकमेकांना म्हणू लागले, “हे आहेत तरी कोण? वादळ- वारें व समुद्र
देखील यांचे ऐकतात?

## 55

1 *त्यानंतर ते सर्व समुद्राच्या पलीकडे गरसेकरांच्या देशी पोचले. 2 *ज्या क्षणी येशू नावेतून खाली उतरले (त्याच क्षणी) अशुद्ध
आत्म्याने भरलेला एक मनुष्य त्यांना भेटला, 3 *जो कबरस्तानातून निघून आलेला होता. तो कबरस्तानात रहात असे व त्याला
साखळदंडानी बांधून ठेवण्यात कोणालाही यश मिळाले नव्हते. 4 तो वारंवार साखळदंड व बेडयांनी बांधला जाई परंतु तो त्याचे
तुकडे -तुकडे करून टाकीत असे. तो कोणत्याही माणसाच्या नियंत्रणात येत नव्हता. 5 रात्रंदिवस तो कबरांमध्ये आणि डोंगरात
राहून ओरडत असे आणि स्वतःला दगडांनी ठेचून आपले शरीर घायाळ करीत असे. 6,7 *त्याने येशूंना दुरूनच पाहिले व धावत
जाऊन त्यांना प्रणाम केल्यानंतर, तो मोठ्याने किंचाळला आणि म्हणाला, “हे येशू परमप्रधान परमेश्वराच्या पुत्रा, आपल्याशी माझे
काहीही देणे-घेणे नाही; मी शपथ वाहूंन आपल्याला म्हणतो की मला दुःख देऊ नका.” 8 तो असे म्हणाला कारण येशूंनी त्याला
म्हटले होते की, “अरे अशुद्ध आत्म्या, या माणसातून बाहेर नीघ.” 9 *येशूंनी विचारले, “तुझे नांव काय आहे?” त्याने उत्तर दिले,

---

आपल्याला परमेश्वराचे वचन किंवा परमेश्वराच्या कार्यांविषयीची आपली जबाबदारी टाळता येत नाही. वचन 23,24 पाहा.

*__4:29__ *“कापणीसाठी”*- तुलना मत्त 3:12; 13:30; प्रकटी 14:14-16.

*__4:30-32__ मत्त 13:31-32.

*__4:33__ शिष्य काही गोष्टी समजू शकले नाहीत. काही गोष्टींचे आकलन करण्याची क्षमता त्यांच्या आवाक्याबाहेर होती. तुलना योहान 16:12.आपली शिकवण प्रकाशमय आणि ज्वलंत करण्यासाठी येशू तुलना आणि समर्पक उदाहरणांचा वापर करीत असत. येशूंनी अनेक गोष्टी, तुलना व उदाहरणें वापरली असतील पण त्यांची नोंद बायबलमध्ये कदाचित केलेली नाही. तुलना योहान 20:30; 21:25.

*__4:34__ वचन 13-20 हे येशूंद्वारे केलेल्या स्पष्टीकरणाचे एक उदाहरण आहे. मत्त 13:36-43हे दुसरे उदाहरण होय.

*__4:35-41__ मत्त 8:23-27.

*__5:1-20__ ही मत्त 8:28-34यातील घटनेविषयी विस्तारपूर्वक केलेले वर्णन आहे. मत्तय म्हणतो की तेथे दोन दुष्टात्माग्रस्त माणसें होती. मार्क एकाविषयीचा उल्लेख करतो; तो त्याच्यावरच आपले लक्ष केंद्रित करतो आणि म्हणून तो दुसऱ्याचा उल्लेख करीतच नाही.

*__5:2__ ‘अशुद्ध आत्म्याने’ यावर मत्त 4:24चे नोट्स पाहा.

*__5:3-5__ दुष्टात्मा एखाद्या माणसाची काय अवस्था - दशा करू शकतो याचे हे एक ठळक, ठसठशीत आणि स्वच्छ चित्र निर्माण करणारे वर्णन आहे. दुष्टात्म्यांच्या नियंत्रणात असलेल्यांचे असेच हाल होतात. या माणसाचा व्यवहार अनावर, हिंसक आणि क्रूर प्रकारचा होता; त्याचे कारण हेच होते की त्याच्यात अनेक भुतें (दुष्टात्में) होती. वचन 9.

*__5:6-7__ असे वाटते की दुष्टात्म्यांना/भुतांना नेहमीच ठाऊक होते की येशू कोण आहेत - 1:24,34 .

*__5:9__ रोमन सेनेच्या तुकडीत तीन ते सहा हजार माणसें असायची. तरीपण वचन 2 आणि आठ वाचून असे वाटते की एकच आत्मा

“माझे नांव सैन्य आहे, कारण आम्ही विपुल (संख्येने) आहोत.” [10] *तो मनुष्य बहुत विनंती करू लागला, “आम्हांला या देशाबाहेर पाठवू नका!” [11] त्याच ठिकाणी डोंगरावर डुकरांचा एक मोठा कळप चरत होता. [12] अशुद्ध आत्म्यांनी येशूंना विनंती केली की, “आम्हांला त्या डुकरांत पाठवा.” [13] येशूंनी तसेच केल्यानंतर ते अशुद्ध आत्में निघून डुकरांत शिरले, त्यामुळे जवळजवळ दोन हजार डुकरांचा कळप वेगाने धावत जाऊन समुद्रात पडला व बुडून मेला. [14] डुकरांचे राखण करणारे पळाले व त्या गावात ही गोष्ट सांगितली. ही खबर ऐकताच लगेच लोक पाहण्यासाठी तेथे पोचले. [15] *ज्या माणसात अशुद्ध आत्म्यांचे सैन्य होते, त्याला वस्त्र घातलेला व शुद्धीवर आलेला पाहून, लोकांना भीति वाटली. [16] ती घटना पाहणाऱ्या लोकांनी अशुद्ध आत्में असणाऱ्या मनुष्याविषयी व डुकरांच्या बाबतीत काय झाले याची पूर्ण माहिती सांगितली. [17] त्या लोकांनी येशूंना विनंती केली की, त्यांनी त्यांच्या गावाच्या सीमेबाहेर निघून जावे. [18] येशू बोटीत बसताच, अशुद्ध आत्में निघालेला माणूस त्यांना विनंती करू लागला की त्यांनी त्याला आपल्याजवळ राहू द्यावे. [19] परंतु येशूंनी त्याचे ऐकले नाही आणि म्हणाले, “आपल्या घरी जाऊन, आपल्या प्रिय लोकांना सांग* की प्रभु परमेश्वराने तुझ्यावर दया करून तुझ्यासाठी किती मोठी कार्यें केली आहेत.” [20] *तो मनुष्य गेला, त्याने दकापलीस येथील लोकांना सांगितले, की येशूंनी त्याच्यासाठी किती अद्‌भुत कार्यें केली. हे ऐकून लोक आश्चर्यचकित झाले. [21] *येशू बोटीत बसून पलीकडे गेल्यावर त्याठिकाणी लोकांची मोठी गर्दी जमली. [22] *त्याच ठिकाणी समुद्राकाठी आराधनालयाच्या प्रधानांपैकी याईर नांवाचा एक अधिकारी आला व तो येशूंच्या चरणांशी पडला. [23] विनंती करून तो येशूंना म्हणाला, “माझी मुलगी मरणाच्या अवस्थेत आहे; आपण येऊन तिच्यावर हात ठेवावे, म्हणजे बरे होऊन तिने जिवंत रहावे.”. [24] येशू त्याच्या बरोबर त्याच्या घराकडे निघाले. गर्दी इतकी प्रचंड होती की, लोक एकमेकांवर आदळू लागले होते. [25] *एका बाईला बारा वर्षांपासून रक्त वाहण्याचा आजार होता. [26] *डॉक्टरांपासून तिला खूप दुःख सोसावे लागले होते; तिने आपली सर्व संपत्ति, उपचार करण्यात खर्चून टाकली होती पण फायदा होण्याऐवजी ती जास्तच आजारी झाली होती. [27] येशूंच्या प्रसिद्धीविषयी ऐकून त्या गर्दीत शिरून, मागून जाऊन तिने येशूंच्या वस्त्राला हात लावून स्पर्श केला. [28] ती तिच्या अंत:करणातअसे कबूल करीत होती की, “जर मी केवळ येशूंच्या वस्त्रांनाच स्पर्श केला तरी मी बरी होईन.” [29] त्याच क्षणी तिचे रक्त वाहणे थांबले आणि तिने, ‘आपल्या शरीरांत अनुभवले की या आजारापासून तिला मुक्ति मिळाली आहे. [30] *आपल्या शरीरांतून शक्ति निघण्याचा आभास होताच, येशूंनी मागे वळून म्हटले, “माझ्या कपड्यांना, कोणी स्पर्श केला आहे?” [31] येशूंचे शिष्य म्हणाले, “लोकांची गर्दी एवढी प्रचंड आहे, हे आपण पाहातच आहात आणि तरी म्हणता

---

होता. हे कदाचित यावरून कळते की तेथे केवळ एकच पुढारी किंवा नेता होता, जो त्या माणसातील सैन्याचा, सेनाध्यक्ष आणि बलाढ्य व हुकमी सरसेनापती होता. येशूंनी प्रामुख्याने याच एका आत्म्याला संबोधित करून, त्यांशी योग्य तो व्यवहार केला.

***5:10** तुलना लूक 8:31.

***5:15** लोकांना कळून चुकले होते की येशूंनी अलौकिक व आश्चर्यजनक सामर्थ्याचे प्रदर्शन (प्रगट) केले होते. तरीही त्यांना या गोष्टीची जाणीव झाली नाही, कळले नाही की येशू कोण होते आणि त्यांचा हेतू काय होता - दुःखाची बाब ही आहे की त्यांना ते समजून घ्यायचेही नव्हते (वचन 17) किंबहुना त्यांची तशी इच्छाच नव्हती.

***5:19** *“लोकांना सांग”*- तुलना करा येशूंच्या या निर्देशाशी व त्यांनी दिलेल्या दुसऱ्या निर्देशांशी. (1:44; 3:12). गरसेकरांच्या प्रदेशातील परिस्थिती आणि वास्तविकें इस्त्राएलाच्या देशापेक्षा वेगळी होती. गरसेकर यहूदी नव्हते, त्यांना ख्रिस्तांची/मशीहांची आशा नव्हती, येशू क्वचितच तेथे जात असत. लोक समुदाय त्यांना त्यांची सेवा करण्याच्या महत्वाच्या कामगिरीत बाधा घालणार, अशी तेथे भीति नव्हती. त्याठिकाणी ते आपली सेवा पूर्णपणे करू शकत होते. जे शब्द येशूंनी त्या माणसाला म्हटले, ते त्या सर्वांवर समानतेने लागू होतात ज्यांनी आपल्या जीवनांत परमेश्वराच्या कार्यांचा अनुभव घेतलेला आहे.

***5:20** दकापलीस हे ग्रीक नांव आहे. याचा अर्थ म्हणजे दहा शहरें. गरसेकरांचा प्रदेश हा दकापलीस नांवाच्या भागाचा एक भाग होता.

***5:21** येशू, गालील समुद्राच्या पश्चिमभागाकडे परत आले.

***5:22-43** या ठिकाणी, मत्त 9:18-25मध्ये आढळणाऱ्या कमी शब्दांत केलेल्या घटनांचे, विशाल प्रमाणावर केलेले वर्णन आहे.

***5:25** वचन 42. याईराच्या मुलीपेक्षा या स्त्रीने कितीतरी दीर्घकाळ हा त्रास भोगलेला होता.

***5:26** तिच्या रोगाचा उपचार करणे, हे त्या काळच्या डॉक्टर व औषधांच्या पलीकडची गोष्ट होती. केवळ तिच्याठायी असलेला भक्कम विश्वास डॉक्टर व मानवी उपचारांपेक्षा कितीतरी श्रेष्ठ होता. तुलना निर्ग 15:26; स्तो 103:3.

***5:30** लूक 8:46. ज्या लोकांचा विश्वास येशूंवर असतो, त्यांच्या गरजा भागविण्यासाठी प्रभु येशूंतून परमेश्वराचे अलौकिक व परमेश्वरी सामर्थ्य ओसंडून वाहत असते. त्या स्त्रीने आपला विश्वास लपवून ठेवावा, गुप्त ठेवावा अशी येशूंची इच्छा नव्हती; सर्वांसमक्ष तिची प्रशंसा करून तिच्या आशीर्वादाची घोषणा करण्याची येशूंची प्रबळ इच्छा होती, त्यांना ते हवे होते.

की, “मला कोणी स्पर्श केला”? 32 स्पर्श करणाऱ्या व्यक्तिला पाहण्यासाठी येशूंनी आजूबाजूला पाहिले. 33 जी स्त्री बरी झाली होती,
जिला आजारापासून मुक्ति मिळाली होती, ती भीत भीत व कांपत कांपत येशूंच्या पायांशी पडली व तिने त्यांना सर्व काही सांगितले.
34 *येशू तिला म्हणाले, “मुली, तुझ्या ‘विश्वासा-परिणामीच’, (विश्वासामुळे) तू बरी झालेली आहेस.” 35 *येशू तिच्याशी बोलत
असतानाच आराधनालयाच्या अधिकाऱ्यांच्या घरातून आलेले काही लोक त्याला म्हणाले, “आपली मुलगी मरण पावली आहे
आता गुरूजींना त्रास का देता आहात?“ 36 *लोकांचे हे शब्द ऐकून येशू आराधनालयाच्या अधिकाऱ्याला म्हणाले, “भिऊ नको,
फक्त विश्वास ठेव.” 37 मग पेत्र, याकोब व याकोबाचा भाऊ योहान यांच्याशिवाय येशूंनी इतरांना आपल्याबरोबर येण्याची मनाई
केली. 38 आराधनालयाच्या प्रबंधकाच्या घरी पोचल्यानंतर येशूंनी तेथे आरडाओरड करणाऱ्या , तसेच जोरजोराने रडणाऱ्या
लोकांना पाहिले. 39 *आत गेल्यावर येशू त्यांना म्हणाले, “हे सर्व रडणे-विलाप करणे काय चालविले (काय प्रकार) आहे?” मुलगी
मेलेली नाही, ती तर झोपेत आहे. 40 येशूंचे हे कथन ऐकून तेथे जमलेले लोक त्यांच्यावर हसू लागले. येशूंनी सर्वांना बाहेर काढले.
नंतर ते, मुलीचे आईबाप व आपल्या सोबत्यांसह, त्या ठिकाणी पोहचले जेथे ती पडलेली (झोपलेली) होती. 41 *मुलीचा हात धरून
तिला म्हणाले, “ऊठ !” 42 लगेच ती मुलगी उठून चालू फिरू लागली. तेथे उपस्थित सर्व लोकांनी तोंडात बोटें घातली. 43 *येशूंनी
त्यांना कडक आज्ञा केली, की या घटनेविषयी कोणालाही कळता कामा नये“, मग येशू म्हणाले, “मुलीला खावयास काही दिले
जावे.”

# 6

1 *येशू त्या ठिकाणाहून निघून आपल्या देशात आले. त्या वेळी त्यांचे शिष्य त्यांच्याबरोबर होते. 2 शब्बाथ दिवशी येशू त्यांना
(आराधनालयात) शिकवू लागले. त्यांचे ऐकून लोक थक्क झाले व आपसांत बोलू लागले की, “हे ज्ञान या मनुष्याला कोठून प्राप्त
झाले आहे? हे कसे ज्ञान आहे ज्याद्वारे ही महान कृत्यें प्रगट होतात! 3 हा तोच सुतार नाही काय जो मरीयेचा पुत्र, तसेच याकोब,
योसे, यहूदा व शिमोनाचा भाऊ आहे. याच्या बहिणी आपल्याबरोबर नाहीत काय? या प्रकारे त्या लोकांच्या मनात त्यांच्याविषयी
तक्रार होती. 4 परंतु येशू त्यांना म्हणाले, “एक संदेष्टयाला आपल्या जन्मस्थानी, आपल्या घरात, आपल्या नातेवाईकांत अपमानच
(मानभंग) मिळत असतो”. 5 *काही रोग्यांवर हात ठेवून त्यानी त्यांना बरें केले, पण त्याखेरीज इतर दुसरे कोणतेही महान कृत्य ते
तेथे करू शकले नाहीत. 6 त्यांचा अविश्वास पाहून येशूंना आश्चर्य वाटले*, तरी ते शिक्षण देत देत एका गावाहून दुसऱ्या गावी गेले.

---

* **5:34** मत्त 9:22. लोकांच्या दुःखी, कष्टी आणि पिडामय हृदयात शांति स्थापित करावी, हे एक महत्वाचे कारण होते, ज्याकरता येशू या जगात आले. लूक 2:14; योहान 14:1,27; 20:19.

* **5:35** ही माणसें आशा सोडून देण्याच्या बेतात होती आणि याईरनेही तसेच करावे असा त्यांनी प्रयत्न केला. एखाद्याचा मृत्यू त्या व्यक्तिला येशू ख्रिस्तांच्या आटोक्याबाहेर घेऊन जात नाही या गोष्टीची त्यांना जाणीव नव्हती; कारण येशूंना मृत्यूवर अधिकार असल्यामुळे जसे आजाऱ्यांना बरे करणे, मृत्यूशय्येवर असलेल्यांना सहज स्वास्थ्य देणे सोपे होते, तसेच मेलेल्याला जिवंत करणेही त्याच्यासाठी अगदी सोपे होते.

* **5:36** याठिकाणी विश्वासींनी जीवनाच्या अनुभवांत आमरण हे शब्द लक्षात ठेवावेतच असे हे शब्द आहेत. भीतिला तोंड दिले नाही, थांबविले नाही तर त्याद्वारे आपला विश्वास जवळजवळ कमी करण्याची किंवा समूळ नष्ट करण्याची शक्यता असते. विश्वासाला दृढ धरून त्याप्रमाणे केले तर त्यामुळे आपली भीति नाहीशी होते. नव्हे, दृढ विश्वास कार्यरत झाला तर आमची भीति निघून जाते.

* **5:39-40** मत्त 9:24.

* **5:41** येशू अरामी भाषा बोलीत असत. त्या भागात, त्या काळी बोलल्या जाणाऱ्या इब्री भाषेसारखीच ही भाषा होती.

* **5:43** पाहा 1:44; 7:36; मत्त 8:4.

* **6:1-5** मत्त 13:54-58. नासरेथ हे येशूंचे गाव होते.

* **6:5** परमेश्वराची इच्छा अशीच असते की त्याने सर्वांचे कल्याण करावे, त्यांच्यासाठी उत्तम कृत्यें करावी पण माणसाठायी असलेल्या अविश्वासामुळे हे सर्व करणे प्रभु येशूंना अशक्य होते. कमतरता येशूंत नाही, पण लोकांत आहे. परमेश्वराने विश्वासाचा मार्ग अशा पद्धतीने तयार केला आहे की लोकांनी तो विश्वास बाळगून परमेश्वराचा वैशिष्टयपूर्ण/खास आशीर्वाद त्याद्वारे प्राप्त करून घ्यावा. (9:23; मत्त 9:22,29; 21:21-22; योहान 11:40). नोट्स - स्तो 78:41.

* **6:6** *“आश्चर्य वाटले”*- तुलना मत्त 8:10.

7 *येशूंनी त्या बारा जणांना बोलावले; त्यांना दोन-दोन या प्रकारे पाठवले आणि अशुद्ध आत्म्यांवर त्यांना अधिकार दिला. 8 त्यांनी
शिष्यांना प्रवासात फक्त एक काठी घ्यावयास सांगितली; भाकरी, झोळी किंवा पैसे बरोबर घ्यावयास मनाई केली. 9 येशूंनी त्यांना
चपला घालण्याची परवानगी दिली परंतु एकापेक्षा जास्त अंगरखे घेऊ नयेत असे सांगितले. 10 मग येशू त्यांना म्हणाले, “जेव्हा तुम्ही
एखाद्याच्या घरी प्रवेश कराल तेव्हा ते ठिकाण सोडीपर्यंत तेथेच वास्तव्य करा. 11 जो कोणी तुम्हांला स्वीकारणार नाही, त्यांच्या
विरूद्ध साक्षीखातर, आपल्या पायांची धूळ झाडून टाका. . 12 *तेथून निघाल्यानंतर ते सर्व घोषणा करु लागले, की सर्वांना
अंतःकरणाचे परिवर्तन करण्याची गरज आहे. 13 *त्यांनी पुष्कळ दुष्टात्में काढले आणि अनेक आजारी तेल लावून बरें केले. 14 *हेरोद
राजाने येशूंविषयी ऐकले होते, कारण येशूंचे नांव त्याठिकाणी प्रसिद्ध झाले होते. तो म्हणाला, “बाप्तिस्मा देणारा योहान मेलेल्यांतून
जिंवत झालेला आहे, म्हणूनच तो ही आश्चर्यकर्मे करतो आहे. 15 दुसरे म्हणाले, “हा एलीया.* आहे”; इतरजण म्हणाले, हा जुन्या
काळांतील संदेष्टयासारखाच आहे. 16 हेरोद हे ऐकून म्हणाला, “मी ज्या योहानाचे डोके उडविले, कदाचित हा तोच असावा, तो
मेलेल्यांतून जिवंत उठला आहे.” 17 तो असे बोलला कारण स्वतः त्याने माणसें पाठवून त्याला तुरूंगात साखळदंडाने बांधून ठेवले
होते; कारण हेरोदाने आपला भाऊ फिलिप्प याची पत्नी हेरोदिया हिच्याशी लग्न केले होते. 18 योहानाने हेरोदाला म्हटले होते की,
“आपल्या भावाची बायको ठेवणे हे कायदेशीर नाही;” 19 म्हणूनच हेरोदिया त्याचा द्वेष करीत होती व त्याला जिवें मारू इच्छित
होती, परंतु ती तसे करू शकली नव्हती. 20 *योहान प्रामाणिक व सच्चा मनुष्य असल्यामुळे हेरोदाने भीतिपोटी त्याला संरक्षण दिलेले
होते. हेरोद मोठ्या आनंदाने योहानाचे म्हणणे ऐकत असला तरी त्याच्याठायी बहुत भीति होतीच. 21 एक समय असा आला जेव्हा
हेरोदाने वाढदिवसा-प्रसंगी आपल्या राजघराण्याच्या लोकांना, सैन्यांतील अधिकाऱ्यांना व गालीलातील माननीय सदस्यांना
मेजवानीसाठी बोलावले. 22 जेव्हा हेरोदियेच्या कन्येने नाच करून, हेरोद व हजर असलेल्या पाहुण्यांना प्रसन्न केले तेव्हा हेरोद त्या
कन्येला म्हणाला, “तू जे काही मागशील ते मी तुला देईनच, 23 शपथ वाहून तो तिला म्हणाला, तू मला जे काही मागशील ते मी तुला
देईनच, मग माझे अर्धे राज्य असले तरी, ते सुद्धा!” 24 बाहेर जाऊन ती आपल्या आईला म्हणाली, “मी काय मागू आई?” आई
म्हणाली, “योहान बाप्तिस्मा करणाऱ्याचे डोके माग;” 25 लगेच ती घाईने धावत राजाजवळ येऊन म्हणाली, “मला योहान बाप्तिस्मा
करणाऱ्याचे डोके मोठ्या ताटात हवे.” 26 तेव्हा राजा फारच दुःखी झाला, पण त्याने वचन दिल्यामुळे आणि मेजवानीत आलेल्या
लोकांना ठाऊक असल्यामुळे, तो दिलेले वचन नाकारू शकला नाही. 27 त्याच वेळी राजाने एका शिपायास हुकूम दिला की
योहानाचे डोके आणून सादर केले जावे. तुरूंगात जाऊन शिपायाने त्याचे डोके उडविले आणि ते ताटात ठेवून, त्या मुलीला दिले;
तिने ते आपल्या आईला दिले. 28 जेव्हा योहानाच्या शिष्यांनी हे ऐकले तेव्हा त्यांनी त्याचे प्रेत उचलले आणि कबरेत नेऊन ठेवले.
29 प्रेषित येशूंच्या चारीं बाजूला गोळा झाले आणि त्यांनी जे काही केले आणि जे काही शिकविले , त्याविषयी येशूंना सांगितले.
30 **लोकांचे येणे जाणे चालूच होते आणि त्यांना जेवणाकरता संधी (समय) मिळेना. 31 *येशू त्यांना म्हणाले, “एकांती जाऊन थोडी
विश्रांती घ्या” 32 आणि ते सर्व एका बोटीत बसून एकांतात निघून गेले. 33 लोकांनी त्या सर्वांना जातांना पाहिले होते. अनेक लोकांनी
येशू व प्रेषितांना ओळखले आणि आसपासच्या सर्व गावांतून ते पायीच निघाले आणि येशू येण्यापूर्वीच तेथे पोचले आणि गोळा
झाले. 34 *नावेतून खाली उतरून येशूंनी एक मोठी गर्दी पाहिली, त्यांना पाहून येशू कळवळले कारण ते अशा मेंढरांसारखे होते,
ज्यांचा कोणीही मेंढपाळ नव्हता. येशू त्यांना शिकवू लागले. 35 दिवस संपल्यावर येशूंचे शिष्य त्यांच्याजवळ येऊन त्यांना म्हणाले,
“हे (जंगलातील) ओसाड ठिकाण आहे, बराच उशीर झालेला आहे, 36 यांना परत पाठवा यासाठी की गावातील जवळच्या वस्तीत

---

*__6:7-11__ मत्त 10:1,9-14.

*__6:12__ याकडे लक्ष द्या की पश्चात्ताप हा येशूंच्या संदेशाचा/उपदेशाचा एक प्रमुख भाग होता.पश्चात्तापावर त्यांनी जास्त भर दिला. नोट्स मत्त 3:2; 4:17.

*__6:13__ याकोब 5:14.

*__6:14-29__ मत्त 14:1-12.

*__6:15__ *“एलीया”*- मलाखी 4:5; मत्त 11:14; 17:10; योहान 1:19-23.

*__6:20__ हेरोद हा कमजोर वृत्तिचा/स्वभावाचा होता. त्यामुळे त्याला कळलेच नाही की एका नीतिमान व पवित्र व्यक्तिविषयी, ज्याचा तो सन्मान करतो त्याचे त्याने काय करावे?

*__6:30-34__ मत्त 14:13-21.

*__6:30__ वचन 7-13 याकडे पुन्हा जातो.

*__6:31__ पाहा 3:20.

*__6:34__ मत्त 9:36.

जाऊन स्वतःसाठी खाण्यास काही विकत घ्यावे, कारण त्यांच्याजवळ खावयास काहीच नव्हते". 37 येशू म्हणाले, "तुम्हीच त्यांना
खावयास द्या." शिष्य म्हणाले, "आम्ही बाजारांत जाऊन 200 चांदीच्या नाण्यांनी* भाकरी विकत आणून त्यांना वाढावी काय?"
38 येशू म्हणाले, "जा आणि पहा की तुमच्याजवळ किती भाकरी आहेत?" त्यांनी माहिती काढून सांगितले, की एका मुलाजवळ
केवळ "पांच भाकरी व दोन मासें आहेत". 39 तेव्हा येशूंनी त्यांना आज्ञा केली की सर्वांना गवताच्या हिरवळीवर वेगवेगळे गट
करून बसवा. 40 ते शंभर व पन्नासांच्या समूहाने तेथे बसले. 41 तेव्हा पांच भाकरी व दोन मासें घेऊन येशूंनी आकाशाकडे पाहिले.
त्यां भाकरींसाठी आशीर्वाद मागून त्या मोडल्या आणि शिष्यांना दिल्या की त्यांनी त्या लोकांना वाटून द्याव्यात. 42 ते सर्व खाऊन
तृप्त झाले. 43 खाल्ल्यानंतर त्यांनी उरलेल्या तुकड्यांच्या बारा टोपल्या भरल्या आणि माशांचेही तुकडे उचलले. 44 भाकर
खाणाऱ्यांची संख्या जवळजवळ पांच हजार पुरूषांची होती. 45 *लगेच येशूंनी आपल्या शिष्यांना बोटीत बसवले जेणेकरुन त्यांनी
पलीकडे बेथसैदेस आधी पोचावे, या दरम्यान त्यांनी लोकांना निरोप दिला. 46 त्यांना पाठवल्यानंतर येशू प्रार्थना करण्यासाठी
डोंगरावर निघून गेले. 47 संध्याकाळी जेव्हा नाव समुद्राच्या मध्यभागी होती, तेव्हा केवळ येशूंच काठावर होते. 48 वारा सोसाट्याचा
होता; येशूंनी त्यांना वाऱ्यांविरूद्ध संघर्ष करतांना पाहिले. सुमारे चार वाजता पहाटेच येशू समुद्रावरून चालत त्यांच्याकडे आले;
49 पण जेव्हा त्या लोकांनी येशूंना समुद्रावरून चालतांना पाहिले तेव्हा ते भूत आहे असे समजून ओरडले. 50 ते सर्व येशूंना पाहून
घाबरले. लगेच येशू त्यांच्याशी बोलले, "धाडसी व्हा,हिंमत ठेवा, मी आहे, भिऊ नका." 51 त्यांच्याबरोबर येशू बोटीत बसले आणि
वादळही शांत झाले. ते सर्व आपल्या मनातल्या मनात खूपच आश्चर्याने भरून गेले होते. 52 त्यांचे अंतःकरण कठोर झाल्यामुळे
त्यांनी भाकरींच्या आश्चर्यकर्माकडे दुर्लक्ष केले होते; 53 जेव्हा ते पलीकडे जाऊन गनेसरेताच्या किनाऱ्यांस पोचलें तेव्हा 54 नावेतून
उतरताच लगेच लोकांनी त्यांना ओळखून घेतले. 55 जेथे कोठे येशू गेले, तेथे तेथे लोक आसपासच्या सर्व भागांतून आपले आजारी,
बाजेवर घालून त्यांच्याकडे येऊ लागले. 56 ज्या ज्या ठिकाणी येशू गेले, गाव, शहर किंवा वस्ती, त्या त्या ठिकाणी लोक रोग्यांना,
थेट गच्च भरलेल्या बाजारांत आणून त्यांना विनंती करीत असत, की,(त्यांना )येशूंच्या वस्त्राच्या गोंड्याला तरी, स्पर्श करू द्यावा.
जितक्यांनी त्यांना स्पर्श केला तितके सर्व बरें झाले.

# 7

1 *तेव्हा परूशी व यरूशलेमेतून आलेले अनेक शास्त्री येशूंच्या सभोवताली एकत्र जमले. 2 जेव्हा त्यांनी काही शिष्यांना हात न
धुता जेवतांना पाहिले तेव्हा त्यांनी त्यांची टीका केली. 3 यासाठी की परूशी व यहूदी, वडिलांच्या प्रथेनुसार जोपर्यंत हात धुत
नसत, तो पर्यंत जेवत देखील नसत. 4 बाजारांतून घरी आल्यावर, हात धुतल्याशिवाय ते भोजन करत नसत; आणखी अशा बऱ्याच
दुसऱ्या रुढी त्यांच्यामध्ये होत्या; जसे प्याले, पितळेची भांडी धुणें, मेज धुणे इत्यादी. 5 तेव्हा परूश्यांनी व शास्त्र्यांनी येशूंना
विचारले, "तुझे शिष्य हात न धुतां जेवतात, वडिलांच्या प्रथांचे पालन ते का करीत नाहीत?" 6 येशूंनी त्यांना उत्तर दिले, कपट्यांनो
तुमच्या सारख्या लोकांविषयी यशयाने अगदी योग्य भविष्यवाणी केलेली आहे. 7 हे लोक केवळ ओठांनी माझा आदर करतात, परंतु
त्यांचे अंतःकरण माझ्यापासून दूर असते; ते व्यर्थ माझी आराधना करतात आणि माणसांच्या आज्ञा परमेश्वरी सिद्धांतांच्या रूपात
प्रस्तुत करतात. 8 परमेश्वराची आज्ञा लाथाडून तुम्ही माणसांनी स्वीकार केलेल्या प्रथा : जसे प्याले, भांडी धुण्याकडे जास्त लक्ष
देता; अशा प्रकारच्या इतर अनेक गोष्टीं तुम्ही करता. 9 येशू त्यांना म्हणाले, "स्वतःच्या रीतिविधी पूर्ण करण्याची चढाओढ व जणूं
स्पर्धा करुन तुम्ही परमेश्वराच्या आज्ञा टाळता. 10 मोशेने म्हटलेले आहे, "आपल्या आईबापाचा मान राख आणि जो कोणी त्यांची
निंदा करतो त्याला मरणाची शिक्षा दिली जावी." 11 पण तुम्ही म्हणता, की जर एखादा आपल्या आईबापाला म्हणाला की, "माझे जे
काही आहे अर्थात जे आपल्या उपयोगी पडले असते, ते सर्व मी परमेश्वरबापाला अर्पण करून टाकले आहे असे म्हणणे बरोबर
आहे. 12 या प्रकारे तुम्ही त्याला, त्याच्या आईबापासाठी काहीच करू देत नाही. 13 अशारीतिने ही जी प्रथा तुम्ही मानत आहा तिचे
पालन करून तुम्ही परमेश्वराची आज्ञा टाळता; अशा प्रकारचीच अनेक कामें तुम्ही करीत राहता". 14 तेथे हजर असलेल्या पूर्ण
समुदायाला उद्देशून येशू म्हणाले, "प्रत्येकाने माझे ऐकावे व ते नीट समजून घ्यावे": 15 बाहेरून माणसाच्या आंत जाणारी कोणतीही
वस्तु माणसाला अशुद्ध करू शकत नाही, पण ज्या वस्तु माणसाच्या अंतःकरणातून (आंतून) बाहेर निघतात, त्याच त्याला अशुद्ध

---

*6:37 *"200 चांदीच्या नाण्यांनी"*- ग्रीकमध्ये 'दोनशे दीनार' - एका मजुराची, एका दिवसाची कमाई/मजूरी एक दीनार इतकी होती. (योहान 6:7).

***6:45-56** मत्त 14:22-36.

***7:1-23** मत्त 15:1-20.

करतात. 16 जर एखाद्याकडे ऐकण्याचे कान आहेत तर त्याने ऐकावे. 17 जेव्हा येशूंनी लोकांना निरोप दिला तेव्हा त्यांच्या शिष्यांनी
त्यांना दृष्टांताविषयी स्पष्टीकरण मागितले. 18 येशू त्यांना म्हणाले, “तुमच्याजवळ देखील समजेची उणीव (थोडकी समज) आहे
काय? तुम्ही पाहू शकत नाही काय, की जे काही माणसाच्या आंत, बाहेरून जात असते, ते त्याला अशुद्ध करीत नाही. 19 कारण ते
सर्व काही त्याच्या अंतःकरणात जात नाही, पोटांत जाऊन, शरीरांतून बाहेर निघून जाते. 20 पुढे येशू म्हणाले, “जे काही माणसाच्या
मनातून येते[*], तेच त्याला अशुद्ध करते. 21 यासाठी की माणसाच्या आतूंन वाईट विचार, व्यभिचार, हत्या, 22 चोरी, लोभ, दुष्टाई,
धोका, कामुकता, वाईट दृष्टि, निंदा, गर्व व मूर्खता, 23 या सर्व गोष्टी अंतःकरणांतून बाहेर निघून मनुष्याला अशुद्ध करतात.”
24 [*]तेथून निघून येशू सोर व सिदोनाच्या सीमेपर्यंत गेले, तेथील एका घरात गेले पण याविषयी कोणालाही कळू नये अशी त्यांची
इच्छा होती. तरीपण लोकांना त्याविषयी कळलेच. 25 एका स्त्रीने, जिच्या मुलीला भुतबाधा होती, येशूंविषयी ऐकले व ती येऊन
त्यांच्या पायांवर पडली. 26 ती ग्रीक असून सुरफुणीकी जातीची होती. तिने येशूंना विनंती केली की त्यांनी तिच्या मुलींतून भूत
काढावे. 27 पण येशू म्हणाले, “प्रथम,बाळकांचे पोट भरून जाऊ दे. उचित नाहीये की बाळांची भाकर कुत्र्यांपुढे टाकली
(मिली)जावी” 28 त्या स्त्रीने उत्तर दिले, “होय प्रभुजी, तरीपण कुत्रीही मेजाखाली पडलेला चुरा खातातच.“ 29 [*]येशू तिला म्हणाले,
तुझ्या याच एका विधानास्तव, तू जा! तुझ्या मुलीतून भूत निघून गेले आहे.” 30 घरी पोचल्यावर तिने आपल्या मुलीला अंथरूणावर
पाहिले; जिच्यातून भूत निघून गेलेले होते. 31 [*]नंतर येशू सोर व सिदोनातून निघून दकापलीस[*] प्रांतातून जाऊन पुन्हा गालील
समुद्राकडे परत आले. 32 लोक एका बहिऱ्या व तोतऱ्या माणसाला येशूंकडे घेऊन आले जो नीटसे बोलू शकत नव्हता. त्यांनी
विनंती केली की, त्या माणसाला येशूंनी बरें करावे. 33 [*]येशूंनी त्या माणसाला गर्दीपासून दूर नेले आणि त्याच्या कानांत आपली बोटें
घातली, नंतर थुंकून त्यांनी त्याच्या जिभेला स्पर्श केला. 34 [*]वर आकाशाकडे पाहून येशू म्हणाले, “इप्फाथा!” म्हणजे लगेच उघड.”
35 त्याच क्षणी त्याचे कान उघडले आणि जिभेचे तंतू सुटून (सैल)तो स्पष्ट-स्पष्ट बोलू लागला. 36 [*]येशूंनी लोकांना आज्ञा दिली की
याविषयी कोणासही कळवू नये; पण जितकी येशूंनी त्यांना मनाई केली त्याहून जास्तच लोकांनी याविषयी चर्चा केली. 37 सगळे
आश्चर्यचकित झाले! होय, त्यांच्या आश्चर्याला सीमा उरलीच नाही, लोकांनी म्हटले, “येशू सर्व काही बरे करतात, इतके की, बहिरे
ऐकू आणि मुके बोलू लागले आहेत.

# 8

1 [*]तोवर लोकांचा समुदाय वाढतच गेला होता आणि त्यांच्याजवळ खावयास काहीही नव्हते, तेव्हा येशूंनी आपल्या शिष्यांना
बोलावून म्हटले, 2 “आज तीन दिवसांपासून हे लोक सतत माझ्याबरोबर आहेत, यांच्याजवळ खावयास काहीही नाही. मला यांची

---

[*]**7:20** *“मनांतून येते”*- पाहा प्रेषि 10:9-16.जुन्या करारांतील नियम शुद्ध व अशुद्ध भोजनाद्वारे आतंरिक सत्य शिकवीत होते. आता, हे ‘शब्दशः अर्थाचे नियम’ सोडून व टाकून देऊन आतंरिक धडे/शिकवण शिकून घेण्याचा समय आला होता. नोट्स लेवी अध्याय 11.

[*]**7:24-30** पाहा मत्त 15:21-28.सीरियन फिनीशिया हा जमिनीचा पट्टा होता जो भूमध्य समुद्राला लागून थोडासा इस्त्राएलाच्या उत्तरेकडे होता. त्या वेळी हा भूभाग सीरियाच्या आधीन होता (तो सीरीयाच्या ताब्यांत होता). या जमिनीच्या पटट्यावर राहणाऱ्या लोकांना यहूदी लोक कनानी म्हणत असत.

[*]**7:29** या स्त्रीचे उत्तर तिच्या प्रभु येशूंवरील विश्वासावर आधारलेले होते. (मत्त 15:28).

[*]**7:31** सिदोन हे एक महत्वाचे प्रसिद्ध शहर होते. सोरच्या उत्तरेकडे सुमारे 40 कि.मी. दूर ते वसलेले होते. येशू प्रथम उत्तरेकडे आणि नंतर दक्षिणपूर्वेस दकापलीस येथे का गेले, याचे कोणतेच कारण दिलेले नाही. पण येशू कसे व कोण आहेत यावरून आपण पूर्ण खात्रीने विचार करू शकतो की ते एखाद्या व्यक्तिची किंवा लोकांची मदत करण्यासाठी आणि त्यांना आशीर्वाद देण्यासाठीच तेथे गेले असावेत.

[*] *“दकापलीस”*- 5:20.

[*]**7:33** पाहा 8:23; योहान 9:6.

[*]**7:34** लोकांची पीडा व वेदना आणि दुःख पाहून येशू स्वतः दुःखी होत असत. मत्त 8:17; यश 63:9.तुलना रोम 8:26.इप्फाथा हा शब्द अरामी भाषेचा आहे. (5:41).

[*]**7:36** पाहा 1:44; 5:43; मत्त 8:4.

[*]**8:1-10** मत्त 15:32-39.

फार दया येते आहे. 3 जर मी त्यांना उपाशी घरी पाठवून दिले तर ते वाटेतच बेशुद्ध होऊन पडतील कारण यांच्यापैकी अनेक जण
बरेच दुरून आलेले आहेत. 4 येशूंचे शिष्य त्यांना म्हणाले, “या लहानशा जागेत इतक्या अधिक लोकांच्या जेवणाची सोय कशा
प्रकारे केली जाऊ शकेल? 5 येशूंनी त्यांना विचारले, “तुमच्याजवळ किती भाकरी आहेत?” ते म्हणाले, “सात”. 6 येशूंनी लोकांना
जमिनीवर बसण्याची आज्ञा केली. सात भाकरी आपल्या हातात घेऊन, आभार मानल्यानंतर येशूंनी त्या मोडल्या; मग त्या भाकरी
घेऊन शिष्यांनी लोकांना वाढावयास सुरवात केली. 7 त्यांच्याजवळ काही लहान लहान मासे देखील होते, आभार मानून येशूंनी ते
लोकांना वाढावयास (आज्ञा केली) सांगितले. 8 ते लोक जेवून तृप्त झाले आणि त्यांनी उरलेल्या तुकड्यांच्या सात टोपल्या भरून
घेतल्या. 9 त्या दिवशी सुमारे चार हजार लोकांनी भोजन केले; त्यानंतर येशूंनी लोकांना घरी पाठवून दिले. 10 *यानंतर लगेच येशू
आपल्या शिष्यांबरोबर बोटीत बसून दल्मनुथा प्रांताकडे रवाना झाले. 11 *परूशी येऊन त्यांना प्रश्न विचारू लागले आणि त्यांची
पारख करावी म्हणून स्वर्गातून एखादे कोणतेही चिन्ह देण्याची मागणी करु लागले. 12 तेव्हा एक लांब उसांसा (श्वास) घेऊन येशू
बोलले, “या दुनियेचे लोक चिन्हांच्या शोधांत का असतात? मी तुम्हांला खात्रीने सांगतो की या पिढीच्या लोकांना कोणतेही चिन्ह
दिले जाणार नाही“. 13 त्यांना सोडल्यानंतर पुन्हा येशू बोटीत बसून पलीकडे निघून गेले. 14 शिष्य भाकरी घेण्याचे विसरले होते
आणि बोटीत त्यांच्याजवळ फक्त एकच भाकर होती. 15 त्यांना सूचना देऊन येशूंनी सांगितले की, “परूश्यांचे खमीर व हेरोदाचे
खमीर याविषयी सावध असा.” 16 त्यांनी आपसात वादविवाद करून म्हटले, “आपल्याजवळ तर भाकरीच नाहीत.” 17 येशूंनी ते
जाणले आणि त्यांना म्हटले, “तुमच्याजवळ भाकरी नाहीत, याविषयी तुम्ही चर्चा का करता? तुम्हांला (अजूनही) समजतच (कळत)
नाही काय? तुमचे अंतःकरण आत्ताही कठीण आहे काय? 18 तुमचे डोळे असून तुम्ही पाहू शकत नाहीये काय? कान असून ऐकू
शकत नाहीये काय? तुम्हांला आठवत नाही काय? 19 मी जेव्हा पांच हजारांसाठी पांच भाकरी मोडल्या, तेव्हा तुम्ही भाकरींच्या
किती टोपल्या उचलल्या? ते म्हणाले “बारा”; 20 तसेच चार हजारांसाठी सात भाकरी मोडिल्या तेव्हा तुम्ही उरलेल्या तुकड्यांच्या
किती टोपल्या उचलल्या? ते म्हणाले “सात”; 21 येशू त्यांना म्हणाले, “तुम्हांला काहीच कळत नाही याचे कारण तरी काय आहे?“
22 *जेव्हा येशू बेथसैदा येथे आले तेव्हा येशूंनी एका आंधळ्याला स्पर्श करावा म्हणून लोक त्याला येशूंकडे घेऊन आले. 23 येशूंनी
त्याचा हात धरून त्याला शहराबाहेर नेले. त्याच्या डोळ्यांवर थुंकले मग त्याच्यावर हात ठेवल्यावर त्याला विचारले, “तुला काही
दिसत आहे किंवा नाही?” 24 **त्या माणसाने वर पाहून म्हटले, “मला माणसें चालल्यासारखी दिसत आहेत, पण जणूकाही झाडें
चालत आहेत अशी! 25 जेव्हा येशूंनी पुन्हा त्याच्या डोळ्यांवर हात ठेवले आणि त्याने वर पाहिले तेव्हा तो स्पष्ट -स्पष्ट पाहू लागला.
26 येशूंनी त्याला घरी परत जावयास सांगितले आणि म्हटले की त्याने शहरात जाऊ नये किंवा कोणालाही याविषयी सांगू नये.
27 *येशू व त्यांचे शिष्यगण कैसरियाच्या फिलिप्प नगराला जात होते; वाटेत येशूंनी शिष्यांना एक प्रश्न विचारला, “माझ्याविषयी
लोकांचे विचार काय आहेत? 28 त्यांनी उत्तर देऊन म्हटले, “काहींचे म्हणणे आहे की आपण बाप्तिस्मा करणारा योहान आहात;
काहीजण म्हणतात की आपण एलीया आहात व इतर दुसरे आपल्याला अनेक संदेष्ट्यांपैकी एक असे म्हणतात. 29 येशू त्यांना
म्हणाले, “तुम्ही मला काय म्हणता? पेत्र म्हणाला, “आपण मशीहा ख्रिस्त आहात.” 30 येशूंनी त्यांना मना केले की, माझ्याविषयी
तुम्ही कोणालाही सांगता कामा नये. 31 येशू त्यांना शिकवण देऊ लागले की मनुष्याचा पुत्र (मी स्वतः) छळ सहन करून, वडील
चर्च, प्रधान पुरोहित व शास्त्री यांद्वारे मारला जाईल परंतु तिसऱ्या दिवशी तो पुन्हा जिवंत उठेल. 32 ही गोष्ट येशू उघडपणे
(खुल्लमखुल्ला) सांगत होते. हे ऐकून पेत्र येशूंना वेगळे नेऊन त्यांचावर रागे भरु लागला. 33 येशूंनी मागे वळून आपल्या शिष्यांकडे

---

*__8:10__ मगदान (मत्त 15:39) हे या क्षेत्रात होते.

*__8:11-21__ मत्त 16:1-12.

*__8:22__ गालील समुद्राच्या उत्तर काठावर बेथसैदा हे नगर होते.

*__8:24-25__ प्रारंभी तो स्पष्ट पाहू शकला नाही. अशा प्रकारे हीच एक घटना आहे जेथे येशूंनी टप्प्याटप्प्याने त्याला बरे केले. याचे कारण दिलेले नाही. कदाचित सुरवातीला त्या व्यक्तिचा विश्वास अल्प किंवा कमजोर होता आणि येशूंनी वापरलेल्या या पद्धतीमुळे नंतर त्याचा विश्वास वाढत गेला. बरे होण्याची इच्छा बाळगणारे जेव्हा याविषयी वाचतील किंवा ऐकतील तेव्हा त्यांनी धीर धरावा, त्यांची किंमत वाढावी की येशू टप्प्याटप्प्यानेही बरे करू शकतात आणि ताबडतोब रोग बरा झाला नाही तरी त्यांनी निराश होता कामा नये, असे शिकविण्याची येशूंची इच्छा असावी. आतंरिक क्षेत्रातही कधी कधी लोकांना हळू हळू आतंरिक प्रकाश दिला जातो.

*__8:24__ आंधळेपणा दूर करण्याचे सामर्थ्य लाळ किंवा थुंकीत नसते; किंवा त्याला बरे करण्यासाठी येशूंनी त्याला स्पर्श करावा हेही आवश्यक नव्हते (मत्त 8:8,13). कदाचित अशा रचित्यांनी (7:33) येशू विश्वासाला प्रोत्साहन व उत्तेजन देत होते.

*__8:27-38__ मत्त 16:13-27.

पाहिले आणि पेत्राला रागावून म्हटले, “दूर हो सैताना! तू परमेश्वराच्या नव्हे तर मनुष्यांच्या गोष्टींवर मन लावतोआहेस”. 34 येशूंनी
शिष्यांसोबतच लोकांनाही बोलावले व त्यांना म्हटले, ‘’जर कोणी माझा स्वीकार करू इच्छितो तर खात्रीने गरज आहे, की त्याने
आपला ‘स्व’ नाकारावा, तसेच आपला क्रूस उचलून आणि माझे ऐकून जीवन जगावयास सुरवात करावी. 35 कारण जो कोणी
आपले जीवन वाचवण्याची चेष्टा करतो, तो ते गमावील, पण जो कोणी माझ्या व माझ्या मुक्ति-वार्तेकरता स्वतःचे जीवन जगण्याची
चाह बाळगतो, तोच ते वाचवील. 36 कारण जर एखाद्या मनुष्य सर्व दुनिया मिळवून घेतो परंतु आपला आत्मा गमावतो, तर काय
फायदा? 37 मनुष्य आपल्या आत्म्याच्या मोबदल्यात काय देईल? 38 *म्हणूनच या व्यभिचारी व दुष्ट पिढीतून, ज्या कोणाला माझी
लाज वाटेल, (मनुष्याचा पुत्र पवित्र परमेश्वरदूतांसहित आपल्या पित्याच्या गौरवाने येईल (सह) तेव्हा, त्याला त्या माणसाची लाज
वाटेल.

# 9

1 *येशू त्या लोकांना म्हणाले, “मी खरे सांगतो की येथे उभे असलेल्यांपैकी काही लोक, मरण तोवर चाखणार नाहीत जोवर ते
परमेश्वराचे राज्य सामर्थ्याने येतांना पाहणार नाहीत.” 2 *सहा दिवसानंतर येशू पेत्र, याकोब व योहानाला एका उंच डोंगरावर घेऊन
गेले. तेथे त्यांच्या देखतच (दृष्टीसमोरच) येशूंचे रूप बदलले. 3 येशूंचे वस्त्रें अगदी बर्फासारखी पांढरी शुभ्र झाली, आणि ती अशी
काही चमकू लागली, की तशी शुभ्रता (पांढरेपण), या पृथ्वीवरील कोणताही परीट (धोबी) कधीच आणू शकला नसता (आणणे
केवळ शक्य होते). 4 तेथेच एलीया व मोशे प्रगट झाले आणि ते येशूंशी बोलत होते. 5 पेत्र लगेच म्हणाला, “गुरूजी, आम्ही येथे
असणे ही खूप चांगली गोष्ट आहे; आपण तीन तंबू उभारु, एक आपल्यासाठी, एक मोशेसाठी व एक एलीयासाठी. 6 *ते सर्व इतके
घाबरले होते की, पेत्र भांबावून काहीतरी बोलला. 7 मग एका मेघाने त्यांच्यावर छाया केली आणि मेघाच्या त्या आच्छादनांतून एक
आवाज आला की, “हा माझा परमप्रिय पुत्र आहे, याचेच ऐका.” 8 अचानक, ज्या वेळी त्यानी चारीं बाजूला नजर फेकली त्या वेळी
तेथे कोणीही नव्हते, केवळ येशू आणि तेच होते. 9 डोंगरावरून खाली उतरत असताना, येशूंनी त्यांना अशी आज्ञा केली, की ते
मेलेल्यांतून जिवंत होईपर्यंत त्या अनुभवाविषयी इतरांना काहीही सांगू नये. 10 जिवंत होणे काय आहे यावर त्यांनी आपसांत
वादविवाद केला परंतु त्या विषयावर ते शांतच राहिले. 11 त्यांनी (शिष्य) येशूंना विचारले, “शास्त्री असे का म्हणतात की अगोदर
एलीया येईल?” 12 *येशू उत्तर देत म्हणाले, “हे खरे आहे की आधी एलीया येईल व तो सर्व काही सुधारील. पण तरीही मनुष्याच्या
पुत्राविषयी असे लिहिले आहे की, तो पुष्कळ दुःखें सहन करील आणि त्याचा अपमान केला जाईल.” 13 परंतु मी तुम्हांला सांगतो
की एलीया आलेला (येऊन चुकला) आहेच आणि त्याच्याविषयी जसे लिहिलेले होते त्यानुसार, त्यांनी त्याच्याबरोबर ते सर्व केले जे
करण्याची त्यांची इच्छा होती; 14 *जेव्हा येशू शिष्यांजवळ आले तेव्हा त्यांनी एक प्रंचड गर्दी त्यांच्या सभोवताली पाहिली आणि
शास्त्री त्यांना (शिष्यांना) प्रश्न- उत्तर विचारू लागले. 15 येशूंना पाहून लोक दंग झाले *; ते धावतच आले, त्यानी त्यांना प्रणाम केला.
16 *येशू शास्त्र्यांना म्हणाले, “तुम्ही त्यांना काय विचारीत आहा?” 17 *गर्दीतून एकाने उत्तर दिले, “गुरूजी मी माझा मुलगा घेऊन

---

*__8:38__ तुलना मत्त 10:32-33; रोम 1:16.गर्व, अहंकार किंवा माणसांची भीति किंवा दुसऱ्यांची स्वीकृति प्राप्त करून घेण्याची प्रवृत्ति लोकांना येशूंच्या आणि त्यांच्या उद्धाराच्या सुवार्तेपासून लाजिरवाणे करते.

***9:1*** मत्त 16:28.

***9:2-13*** मत्त 17:1-13.

***9:6*** लूक 9:33. जेव्हा आपल्याला कळत नाही की आपण काय म्हणावे/बोलावे तेव्हा शांत/चुप राहिलेले अधिक उत्तम असते. पेत्राच्या वेडपटपणामुळे आणि त्याने केलेल्या अज्ञानाच्या टिप्पणीमुळे आपण शिकतो, की शिष्यांनी मोशे व एलीया यांना ओळखले होते. (हे दोघे अनेक शताब्दीपूर्वी मरण पावले होते)

***9:12*** येशू प्रभु त्यांचा जुन्या करारांकडे संकेत करतात. पाहा यशया अध्याय यश 53; आणि स्तो 22.

***9:14-32*** हा भाग मत्त 17:14-23चे सविस्तर व पूर्ण वर्णन आहे मत्तय याविषयी तर्क (विवाद) करीत नाही. येशूंचे शिष्य त्या दुष्टात्माग्रस्त मुलाला बरे करू शकले नव्हते म्हणून वाद-विवादाचा विषय हाच होता. शिवाय येशूंठायी अद्‌भुतें करण्याच्या सामर्थ्याशी देखील हा वाद संबंधित असावा (तुलना 3:22).

***9:15*** *“दंग झाले”*- कदाचित येशू अचानक आल्यामुळे ते आश्चर्यचकित झाले होते.

***9:16*** येशू त्यांच्या वादविवादाच्या कारणाविषयी अज्ञानी नव्हते कारण त्यांचा वादाचा विषय त्यांना ठाऊक होता (मत्त 9:4; योहान 1:47-49; 12:24-25; 21:17) पण तरीही येशू त्या मुलाच्या बापाला बोलण्याची हिंमत व प्रेरणा देत होते.

आपणाकडे आलो होतो. माझ्या मुलाठायी एक मुका आत्मा आहे. 18 ज्या वेळी तो त्याला धरतो त्या वेळी त्याला खाली आपटतो,
त्याच्या तोंडाला फेस येतो आणि मग तो दांत खातो. माझा मुलगा दिवसेंदिवस अशक्त होत चालला आहे. मी आपल्या शिष्यांना
विनंती केली होती परंतु त्यांना तो काढता आला नाही.” 19 येशू म्हणाले, “हे अविश्वासीं पिढी, मी किती काळ तुमच्याबरोबर
राहणार, कधीपर्यंत तुमचे सोसणार? त्याला माझ्याकडे घेऊन या.” 20 ते त्याला येशूंजवळ घेऊन आले; जेव्हा त्या अशुद्ध आत्म्याने
येशूंना पाहिले तेव्हा लगेच मुलाला झटका आला व तो जमिनीवर आपटला गेला, आणि त्याच्या तोंडातून फेस येऊन तो जमिनीवर
लोळू लागला. 21 येशूंनी त्याच्या वडिलांना विचारले, “याची ही अवस्था केंव्हापासून आहे?” वडील म्हणाले, बाल्यावस्थेपासून.
22 *अनेक वेळा याचा जीव घेण्याकरता त्या आत्म्याने याला पाण्यात किंवा अग्नित ढकलून दिले आहे. जर आपण काही करू
शकला तर, आमच्यावर दया करा.” 23 *येशू त्याला म्हणाले, “आपण काही करू शकत असाल, ही कशी गोष्ट आहे!?” जर तू
विश्वास केलास तर सर्व काही होऊ शकते. 24 *लगेच मुलाच्या बापाने उत्तर दिले, “प्रभुजी, मला विश्वास आहे, कृपा करून माझी
शंका दूर करा.” 25 *जेव्हा येशूंनी लोकांना धावत येतांना पाहिले तेव्हा त्या अशुद्ध आत्म्याला धमकावून सांगितले, “अरे
मुक्या-बहिऱ्या आत्मा, मी तुला आज्ञा देतो की त्याच्यातून निघून बाहेर ये आणि पुन्हा कधीही त्याच्या शरीरात प्रवेश करू नको.”
26 तेव्हा तो आत्मा झटका येऊन किंचाळून (भीषण रीतिने) त्याला पिळून आणि आपटून त्याच्यातून निघून गेला आणि जणूकाही तो
मुलगा अगदी मेल्यागत झाला. तेव्हा पुष्कळ लोक म्हणाले की, “तो मेला आहे”. 27 परंतु येशूंनी आपल्या हाताने धरून, त्याच्या
पायावर त्याला उभे केले तेव्हा तो उभा राहिला. 28 घरी आल्यानंतर शिष्यांनी एकांतात विचारले, “आम्ही त्याला का काढू शकलो
नाही?” 29 *येशू म्हणाले, “या प्रकारचा आत्मा, प्रार्थना व उपासाखेरीज सहजासहजी बाहेर निघत नाही.” 30 *तेथून निघून ते
गालीलातून चालले होते. येशूंची इच्छा होती की त्याविषयी कोणालाही कळू नये. 31 शिष्यांना शिकवीत असताना येशू म्हणाले,
“मनुष्याचा पुत्र लोकांच्या हांतून धरून दिला जाईल आणि ते त्याला जिवें मारतील. त्याच्या मरणानंतर, तो तिसऱ्या दिवशी जिवंत
उठेल. 32 *ते लोक ही गोष्ट समजू शकले नाहीत पण आणखी काही विचारण्याची त्यांना भीति देखील वाटत होती. 33 यानंतर येशू

---

***9:17-18** याठिकाणी दिलेल्या दुष्टात्माग्रस्त लोकांची लक्षणे - चिन्हें पाहा - वचन 20,22,26.

***9:22** त्या माणसाने येशूंच्या सामर्थ्याविषयी संशय बाळगला होता. कदाचित त्याने असा अंदाज आणि विचार केला असावा की जर येशूंचे शिष्य काहीही करू शकले नव्हते, तर येशूही काही करू शकले नसते. ख्रिस्ती लोकांतील विश्वासाचा अशक्तपणा - दुर्बळपणा पाहून, मनुष्य येशूंचे अधिकार व सामर्थ्य याविषयी चुकीचा निष्कर्ष काढून येशूंना कमी समजू शकतो, त्यांच्या व्यक्तित्वावर संशय करून त्यांना कमजोर लेखू शकतो.

***9:23** याठिकाणी पुन्हा आपल्याला या गोष्टीची प्रचिती येते की बायबलच्या शिकवणीनुसार, विश्वास परमेश्वराला कार्य करण्याचा मार्ग मोकळा करतो, उघडतो परंतु अविश्वास मात्र त्याला कार्यरत होण्यापासून थांबवू शकतो, बाधा आणू शकतो. (6:5). विश्वास, परमेश्वराच्या सामर्थ्याकरता, चमत्कारांकरता, एक वैशिष्टयपूर्ण मार्ग तयार करतो. विश्वासामुळे प्रभूच्या सामर्थ्याला प्रचंड बळ प्राप्त होते, नव्हे ते वाढते.

***9:24** तो मनुष्य आपल्या अशक्त विश्वासाविषयी जागृत होता, त्याच्या हृदयातील विश्वास व अविश्वासाविषयीची त्याला जाणीव होती. आणि म्हणून तो वचन 21 मध्ये सुद्धा येशूंकडे मदतीची हाक मारितो. येशूंनी त्याला त्याच्या दोन्ही प्रार्थनांचे उत्तर दिले. सर्व विश्वासीं लोक अशा प्रकारच्या अविश्वासाच्या संघर्षाचा सामना करीत नाहीत काय? ज्याने त्या मनुष्याला मदत केली तेच आपलीही मदत करतील (इब्री 12:2).

***9:25** हा दुष्टात्मा अशा प्रकारचा होता, की त्याने त्या मुलाची ऐकण्याची व बोलण्याची क्षमता हिरावून घेतली होती, नाहीशी केली होती. हाच एक समय आहे की येशूंनी त्या दुष्टात्म्याला अशी आज्ञा दिली की त्याने त्याच्यातून निघावे आणि पुन्हा कधी त्याच्यात प्रवेश करू नये.आपण समजू शकतो की येशूंनी इतर वेळीही तशीच आज्ञा केली असावी. मत्त 12:43-45यावरून कळते की कधी कधी दुष्टात्मा पुन्हा प्रवेश करू शकतो; या उदाहरणावरून ते अधिक स्पष्ट होते.

***9:29** असे वाटते की काही दुष्टात्मा, दुसऱ्या दुष्टात्म्यांपेक्षा अधिक हट्टी, ठाम आणि निश्चयी असतात; आणि त्यांना हाकून लावण्यासाठी फार अधिक गंभीर, आणि चिवटपणे तसेच एक प्रकारच्या हमखास प्रयत्नांची गरज असते.

***9:30-31** ही शिकवण आतापर्यंत संपूर्ण विश्वासीसाठींची नव्हती, ती केवळ त्यांच्या शिष्यांसाठीचीच होती. येशूंची शिकवण तोपर्यंत तरी केवळ शिष्यांपुरतीच मर्यादीत होती. पण आज, आता ही शिकवण येशूंच्या संदेशाचे केंद्र आहे, आता मात्र शिष्य संपूर्ण जगात त्या संदेशाची घोषणा करणार होते. (लूक 24:45; 1 करिं 15:3-4).

***9:32** वचन 10;8:31-33. ते शिष्य होते तरी, आतंरिक बाबींत ते अद्यापही कमजोर होते, कमी होते - आजही जसे येशूंचे अनेक शिष्य आहे तसेच. तुलना- पौलाने केलेली ती अद्भुत प्रार्थना जी इफि 1:17-19यांत नमूद केली आहे.

कफर्णहूमात आले, घरी असताना त्यांनी विचारले, “तुम्ही आपसांत कशाविषयी वादविवाद करीत होता?” [34] *परंतु ते शांत राहिले कारण ते या गोष्टीविषयी विवाद करीत होते की त्यांच्यात सर्वात मोठा कोण आहे? [35] *येशूंनी त्या बारा जणांना बोलावून म्हटले, “जर कोणी प्रथम किंवा पहिला होऊ इच्छितो, तर त्याने सर्वात शेवटचा आणि सर्वांचा चाकर व्हावे. [36] मग येशूंनी एका लहान बाळाला हातात उचलून कवटाळले आणि त्यांना म्हणाले, [37] *“जो कोणी माझ्या नांवाने, अशा बाळांपैकी एकाला स्वीकारतो ,तो मला स्वीकारतो आणि जो कोणी मला स्वीकारतो, तो मला नव्हे तर ज्याने मला पाठविले आहे त्याचा स्वीकार करतो. [38] *योहान त्यांना म्हणाला, “गुरूजी आम्ही एका अशा मनुष्याला पाहिले जो आपल्या नांवाने भुतें काढीत होता; आम्ही त्याला मना केले कारण तो आमच्याबरोबर नव्हता.” [39] येशू त्यांना म्हणाले, “त्यांना मना करू नका, कारण जो मनुष्य माझ्या नांवाने अदभुत कार्ये करतो, तो लगेच माझ्याविरूद्ध काहीच म्हणणार नाही; [40] *कारण जो आपला विरोधी नाही तो आपल्याच पक्षाचा आहे, [41] *जो कोणी माझ्या नांवाने यासाठी, की तुम्ही माझे आहा, तुम्हांला पेलाभर पाणी देतो, मी तुम्हांला खरे सांगतो की तो आपले प्रतिफळ (बक्षिस) गमावणार नाही. [42] *या लहानांपैकी, जे माझ्यावर विश्वास करतात त्यांतील जर कोणी अडचण (अटकाव केला) ठरतो , त्याच्यासाठी हेच बरे आहे,की त्याच्या गळयात जात्याची जड तळी बांधून त्याला खोल समुद्रात ढकलून द्यावे. [43] जर तुझा हात तुझ्या पतनाचे (वाईटांत पडण्याचे) कारण ठरीत असेल, तो कापून फेक. कारण दोन्हीं हात घेऊन नरकाची पीडा भोगण्यापेक्षा, तुझ्यासाठी बरे आहे की तू लुळावस्थेत स्वर्गात जावे,यापेक्षा की दोन्ही हातासह नरकाची पीडा भोगावी, जी कधीच संपत नाही. [44] जेथील किडा मरत नाही, पिडेचा (अग्निचा) अंतच नाही. [45] जर तुझा पाय तुला वाईट कामी पाडण्याचे कारण ठरीत असेल तर, त्याला कापून फेकून दे; कारण दोन्ही पाय घेऊन मरण (नरक) प्राप्त करण्यापेक्षा तुझ्यासाठी हेच चांगले आहे, की तू लंगडा राहूनच जीवनात (स्वर्ग) प्रवेश करावा; [46] जेथील नरकाचा किडा मरत नाही, तेथील अग्नी कधी विझत नाही. [47] जर तुझा डोळा तुला अपराधांत फसवीत असेल तर तो काढून फेकून टाक. दोन डोळे घेऊन नरकात जाण्यापेक्षा हेच चांगले आहे ,की तू एक डोळा घेऊन स्वर्गात जावे; [48] *तेथील किडा मरत नाही आणि तेथील पीडा (अग्नि) कधीच कमी होत नाही. [49] *प्रत्येकाची पारख केली

---

***9:34** लूक 22:24; पाहा यिर्म 45:5.

***9:35** मत्त 18:4; 20:26-28.

***9:37** मत्त 18:5; 10:40.

***9:38** येशूंच्या शिष्यांमध्ये नेहमी ‘संकुचितपणाची’ (संकीर्णता) आणि ‘वांटून न घेण्याची’ किंवा खास ‘फक्त एकासाठीचीच’ असण्याची वृत्ति किंवा लहर असण्याचा धोका असतो; हा धोका, की केवळ त्यांचा समुदायच ‘एकमेव सत्य समुदाय’ आहे आणि परमेश्वराची सेवा करण्याचा अधिकार केवळ त्यांनाच/त्यांचाच आहे. प्रियांनो इतरांना वगळण्याची भावना, त्यांना नालायक, अयोग्य समजण्याची वृत्ति ही मूळांतच विश्वासींच्या मनांत नसावी, कारण तसे असणे अयोग्य- अनुचित आहे. तुलना गण 11:25-29; 1 करिं 1:10-13.

***9:40** मत्त 12:30 ची ही दुसरी बाजू (भाग) आहे.

***9:41** मत्त 10:40-42.

***9:42-47** मत्त 18:6-9; 5:29-30.

***9:48** हा यश 66:24यातून घेतलेला एक भाग आहे. नरकाची तुलना अशा एका विशाल आणि भीषण केरकचऱ्याच्या ढिगाशी केली जाऊ शकते जेथे निरंतर अग्नी पेटत असतो आणि जेथे शरीराला कचऱ्यांतील कीडे सतत खात राहतात. यरूशलेमेच्या भींतिबाहेर गेहेन्ना दरीत अशाच प्रकारचा केरकचऱ्याचा ढीग होता. गेहेन्ना शब्दाचे भाषांतर ‘नरक’ असे सुमारे बारादां नवीन करारात वारंवार केलेले आहे (मत्तय व मार्कात अनेकदां आणि लूक व याकोबात एकदां). अपराधी लोकांची प्रतिक्षा करीत असणारे भयंकर, अटळ, निश्चित व न चुकविता येणारे चित्र येशूंनी दाखविले; प्रियांनो त्याविषयी अजाण असणे हा महामूर्खपणा आहे. (पाहा मत्त 5:22; लूक 16:23-24; प्रकटी 20:14-15). जे कोणी या जगिक केराची, कचऱ्याची निवड करतात (फिलि 3:8) आणि येशू ख्रिस्तांद्वारे येणारा उद्धार नाकारतात, अमान्य करतात, जे सर्व लोक स्वतःला दुष्ट-लज्जास्पद आणि कवडी मोलाचे व कुचकामाचे (टाकाऊ असे) करतात ते जागतिक केराच्या (कचऱ्याच्या) ढिगातच जातील, तेच त्यांचे ठिकाण असेल. हाच परमेश्वराचा सिद्ध न्याय असेल. म्हणूनच किती गंभीरतेने, प्रत्येक मानवप्राण्याने, स्वतःला आपल्या अपराधांपासून आणि अपराधांत पाडणाऱ्या प्रभावापासून कापून टाकावे, स्वतःला त्यापासून वेगळे करावे.

***9:49** या वचनाचा अर्थ आणि त्याच्या मागच्या-पुढच्या वचनांशी त्याचा असलेला संबंध समजणे जरा अवघड (कठीण) आहे, मीठ आणि अग्नी याठिकाणी एकत्र जुळलेले आहेत, त्यावरून हे वर्णन कळते की माणसाला कोणकोणत्या गोष्टींतून जावे लागेल. मीठ सडण्यापासून सुरक्षित ठेवते, अग्नी भस्म करतो. जर येथे ‘प्रत्येक जण’ म्हणजे प्रत्येक मनुष्य आहे तर या वचनाचा अर्थ असा

जाईल, त्याचप्रमाणे प्रत्येकाचे बलिदानही पारखले जाईल! 50 *मीठ चांगला पदार्थ असला तरी, जर मीठाने आपला खारटपणा
गमावला, तर मग त्याला पुन्हा कसे खारट करता येईल? तुम्ही तुमच्याठायी मीठ असू द्या व एकमेकांबरोबर मेळ घालून रहा.”
=

# 10

1 **येशू तेथून निघून यार्देनेच्या पलीकडे, यहूदीया प्रदेशात पोचले आणि लोक पुन्हा त्यांच्या अवतीभवती एकत्र जमले. येशू त्यांना
शिकवण देऊ लागले; 2 तेव्हाच परूशी त्यांना पारखण्याकरता येशूंजवळ आले व त्यांनी त्यांना विचारले, “पुरूषाने बायकोला
सोडून देणे कायदेशीर आहे काय?” 3 येशूंनी त्यांना विचारले, “मोशेने काय आज्ञा दिली होती?” 4 परूशी म्हणाले, “की सूटपत्र
दिल्यानंतरच एखाद्याने बायकोला सोडावे.” 5 येशूंनी उत्तर दिले, तुमच्या अंतःकरणातील कठोरपणामुळेच त्याने तसे म्हटले होते.
6 परंतु प्रारंभापासून परमेश्वराने मनुष्याची स्त्री-पुरूष याच रूपात निर्मिती केली. 7 त्याच कारणाने एक पुरुष आपल्या आईवडिलांना
सोडून पत्नीशी जोडलेला (जुडून) राहील. 8 ती दोघें एकदेह होतील. त्या क्षणापासून ती वेगळी नव्हे तर ‘एकदेह’ म्हटली जातील.
9 म्हणूनच जे परमेश्वराने संयुक्त केले आहे, ते मनुष्याने विभक्त करू नये. 10 घरात याच विषयावर शिष्यांनी प्रश्न विचारले. 11 येशू
त्यांना म्हणाले, “जो मनुष्य आपल्या बायकोचा त्याग करून, दुसरीशी लग्न करतो, तो तिच्याबरोबर व्यभिचार करतो.” 12 जर पत्नी
आपला पति सोडून दुसऱ्याशी लग्न करते, तर ती देखील व्यभिचार करते. 13 या दरम्यानच येशूंनी लहान बाळकांना स्पर्श करावा
म्हणून लोक त्यांना येशूंजवळ घेऊन आले; परंतु शिष्यांनी, आणणाऱ्यांना दटाविले. 14 तेव्हा येशूंना ते बरे वाटले नाही आणि ते
म्हणाले, “लहान बाळकांना माझ्याजवळ येऊ द्या; त्यांना मना करू नका, कारण परमेश्वराचे राज्य बाळकांसारखे अंतःकरण (मन)
बाळगणाऱ्या लोकांसाठीचेच आहे. 15 *मी तुम्हांला खरे सांगतो, की जो कोणी बाळकासारखा होऊन परमेश्वराचे राज्य स्वीकारीत
नाही तो त्यांत प्रवेशही (दाखल)घेणार नाही. 16 तेव्हा येशूंनी बाळकांना आपल्या हातांनी कवटाळले आणि त्यांच्यावर हात ठेवून
आशीर्वाद दिला. 17 **जेव्हा येशू वाटेने जात होते तेव्हाच एकजण धावत आला आणि त्यांच्यासमोर गुडघे टेकून म्हणाला, “अहो!
उत्तम गुरूजी, स्वर्ग प्राप्त करण्यासाठी मी काय करू?” 18 येशू त्याला म्हणाले, “तू मला उत्तम का म्हणतोस? परमेश्वराखेरीज
कोणीही उत्तम नाहीच!” 19 आज्ञा तर तू जाणतोसच; व्यभिचार करू नको, खून करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको,
धोका देऊ नको आणि आईवडिलांचा मान राख. 20 त्याने येशूंना उत्तर दिले, “गुरूजी! हे सर्व तर मी बालपणापासूनच करीत आलो
आहे.” 21 *येशूं प्रीतिने भरुन त्याला म्हणाले, तुझ्यात एक उणीव आहे, जा जे काही तुझ्याजवळ आहे ते विकून टाक आणि गरीबांना
वांटून दे; आपला क्रूस उचलून, माझे वचन पाळून जीवन जग, तेव्हा तुला स्वर्गीक संपत्ति मिळेल.” 22 *हे ऐकून तो दुःखी झाला व

---

होऊ शकतो, की उद्धार प्राप्त न केलेले लोक नरकात अग्नीचा अनुभव करतील आणि ज्यांनी उद्धार प्राप्त केलेला आहे ते आता वर्तमानकाळीच अग्नीने शुद्ध केले जातील. (स्तो 66:12; मलाखी 3:2; 1 पेत्र 1:7)

***9:50** मत्त 5:13. येशूंप्रत शिष्यत्व प्राप्त करण्याकरता, येथे ‘मीठ’ एका उदाहरणाच्या रूपात वापरले गेले आहे; ते शिष्यत्वाचे लक्षण व प्रमुख चिन्ह दर्शविते. तुलना लूक 14:34च्या संदर्भात. ख्रिस्तांच्या खऱ्या सात्विक शिष्याचे चिन्ह आहे “शांति”. तुलना मत्त 5:9.

***10:1-16** पाहा मत्त 19:1-15.

***10:1** पाहा 2:13; 4:2; 6:6,34; मत्त 4:23; स्तो 24:4-5.येशू ख्रिस्तांचा आनंद आताही तोच आहे, की लोकांनी सत्य शिकावे; लोकांना सत्याची शिकवण देण्यात येशूंना प्रचंड समाधान मिळते.

***10:15** मत्त 18:3.

***10:17-31** मत्त 19:16-30 चे नोट्स पाहा.

***10:17** तो मोठ्या उत्कंठेने आणि आदर भावनेने आला होता पण तरीही दुःखी होऊन परत गेला (वचन 22).

***10:21** येशूंनी या तरूणासमोर एक अतिशय कठीण परीक्षा ठेवली. याचे कारण हेच होते की त्यांचे ‘पवित्र-ईश्वरी’ मन त्या तरूणाकरता प्रेमाने भरून वाहत होते. येशूंना त्याचे कल्याण हवे होते. या गोष्टीची आपल्याला खात्री असावी की ज्या वेळी प्रभु आपल्यास काहीतरी कठीण आणि दुःखदायक गोष्ट करावयास सांगतात, ती यासाठी असते की ते आपल्यावर प्रीति करतात आणि आपण तसेच करण्याची गरज असते.

***10:22** येशू ख्रिस्त आणि त्यांनी दिलेले अनंत जीवन यांहून अधिक मोल हा तरूण स्वतःच्या संपत्तिला व मिळकतीला देत होता. त्याच्या संपत्तिचे मोल त्याने अधिक जाणिले. जर एखाद्याने येशूंची आणि त्यांच्या अनंत जीवनाची किंमत कमी लेखिली तर परमेश्वराने त्याला ते कां द्यावे? तुलना नीति 4:7; लूक 14:33.

तसाच घरी परत गेला, कारण तो फार श्रीमंत होता. 23 चाऱ्हीं बाजूला पाहून येशू आपल्या शिष्यांना म्हणाले, जे लोक श्रीमंत आहेत
त्यांचा स्वर्गात प्रवेश होणे किती कठीण आहे! 24 शिष्य येशूंच्या गोष्टी ऐकून चकित झाले, येशू पुन्हा त्यांना म्हणाले, “मुलांनो[*], जो
आपल्या संपत्तिवर भरंवसा ठेवतो, तो स्वर्गाच्या राज्यात दाखल होणे किती अवघड आहे! 25 एक उंट, सुईच्या नाकांतून जाऊ
शकतो पण एका श्रीमंताने स्वर्गात प्रवेश करणे फारच कठीण आहे.” 26 अतिशय चकित होऊन ते आपसांत म्हणू लागले, “मग
उद्धार (मुक्ति) कोण प्राप्त करू शकेल?” 27 त्यांच्याकडे पाहून येशू म्हणाले, “मनुष्यासाठी हे कार्य कठीण आहे, परंतु परमेश्वर
काहीही (सर्व काही) करू शकतो.” 28 पेत्र येशूंना म्हणाला, “पाहा, आम्ही सर्व काही सोडून तुझेच झालो आहोत”. 29 येशूंनी उत्तर
दिले, “मी तुम्हांला सत्य सांगतो, की असा कोणीही नाहीये, ज्याने माझ्या व माझ्या आनंदाच्या (येशू-वार्ता) खबरबातेप्रीत्यर्थ घर,
भाऊबहिण, पत्नी, आई, मुले वा जमीन-संपत्ति सोडली आहे; 30 [*]व ज्याला या दुनियेत छळासमवेत, शंभरपटीने घरें, भाऊबहिणी,
आया, मुलें, जमीन-संपत्ति मिळणार नाही (अर्थात मिळेलच) आणि होय, भविष्यकाळी, अनंत जीवनही त्याचेच होईल. 31 पण बहुत
जे पहिले होते, ते शेवटले होतील, आणि जे शेवटी होते ते पहिले होतील. 32 [*][*]ते यरूशलेमेकडे वाटेने जात असताना येशू त्यांच्यापुढे
चालत होते. ते सर्व आश्चर्याने भरलेले होते व त्यांच्या मागे-मागे येणारे सुद्धा घाबरले होते. येशूंनी त्या बारा लोकांना वेगळे बोलावले
आणि त्यांचे (येशूंचे) काय होणार होते त्याविषयी सर्व सांगू लागले. 33 पहा, आपण यरूशलेमेस जात आहोत आणि मी (मनुष्याचा
पुत्र) प्रधान याजक आणि शास्त्र्यांच्या सुपूर्द केला जाईन, ते मला फाशी देऊन गैरयहूदीयांच्या हाती देऊन टाकतील. 34 [*]ते माझी
थट्टा करून फटके मारतील, थुंकतील आणि जीव देखील घेतील. 35 [*]जब्दीची दोन्हीं मुलें, याकोब व योहान म्हणाले, “गुरूजी,
आम्हांला जे हवे ते आमच्या इच्छेप्रमाणे, आपण आमच्यासाठी करावे.“ 36 येशूंनी त्यांना विचारले, “मी तुमच्यासाठी काय करावे
अशी तुमची इच्छा आहे?” 37 ते लगेच बोलले, “आपण असे होऊ द्यावे की, भविष्यातील आपल्या राज्यात, (शासनकाळी)
आमच्यातील एकाने आपल्या उजवीकडे व दुसऱ्याने डावीकडे बसावे”. 38 [*]पण येशू त्यांना म्हणाले, “तुम्हांला ठाऊक नाही
(कळत) की तुम्ही काय मागत आहा; जो प्याला मी पिणार आहे तो तुम्ही पिऊ शकाल काय? आणि ज्या पिडेत मी बुडणार
(बाप्तिस्मा घेणार) आहे, ती तुम्ही सहन करू शकता काय?” 39 ते लगेच,“म्हणाले होय, आम्ही अगदी सहन करू शकतो. येशू त्यांना
म्हणाले, “अवश्य, तुम्ही तो प्याला पिणार जो मी पिणार आहे आणि त्या पिडेत बुडणार, ज्यातून मला जावयाचे आहे, 40 पण हे
माझ्या हातात नाही की मी कोणाला आपल्या उजवीकडे किंवा डावीकडे बसवावे, परंतु ते स्थान ज्यांच्यासाठी तयार केलेले आहे,
त्यांनाच ते मिळणार. 41 ही गोष्ट जेव्हा बाकीच्या शिष्यांनी ऐकली तेव्हा ते याकोब व योहानावर संतापले. 42 पण येशूंनी त्यांना
आपल्याजवळ बोलावून म्हटले, “तुम्हांला ठाऊक आहे की गैरयहूदी लोकांत, अधिकारी आपला अधिकार चालवतात आणि
लोकांवर शासन करतात. 43 परंतु तुमच्यामध्ये असे होता कामा नये. तुमच्यापैकी जो कोणी दुसऱ्यांपेक्षा मोठा (प्रधान) होऊ
इच्छितो, त्याने प्रथम दुसऱ्यांचा सेवक व्हावे. 44 तुमच्यात जो कोणी पहिला होऊ इच्छितो त्याने प्रथम सर्वांचा सेवक (गुलाम-दास)
व्हावे. 45 मी (मनुष्याचा पुत्र) देखील सेवा करून घ्यावयास आलो नाही, पण सेवा करावयास व अनेकांच्या उद्धाराकरता आपला
जीव बलिदान (अर्पण) करावयास आलो आहे. 46 [*]ते सर्व यरीहोस आले. जेव्हा येशू, त्यांचे शिष्य आणि जमलेला लोकसमूह यरीहो

---

[*] **10:24** *“मुलांनो”*- येशू त्यांना ‘मुलांनो’ असे म्हणाले, कारण ते वयस्क असले आणि पूर्ण विकसीत झाले होते तरी आतंरिक दृष्टीने त्यांचे शिष्य त्याच्यासाठी लहान मुलांप्रमाणेच होते. पाहा मत्त 10:42.

[*] **10:30** जे येशूंचे शिष्य होऊन त्यांचे अनुसरण करतात त्यांच्या जीवनांत क्लेश, छळ असतीलच - मत्त 24:9; लूक 11:29; 21:12; योहान 15:20; प्रेषि 7:52; 1 थेस्स 3:4; 2 तीम 3:12.परंतु त्या छळाची तुलना, त्या महिमेशी करता येत नाही, जी त्यांना भविष्यकाळी लाभणार आहे. रोम 8:18; 2 करिं 4:17.

[*] **10:32-45** मत्त 20:17-28.

[*] **10:32** येशूंच्या सांगण्याच्या पद्धतीत, तऱ्हेत आणि त्यांच्या चेहऱ्यावर असे काही भाव होते, की त्यांच्या शिष्यांची घाबरगुंडी उडाली. ते ऐकून शिष्य एकाएकी घाबरले आणि दचकले.

[*] **10:34** तुलना लूक 9:51; यश 50:7.

[*] **10:35** त्यांची आई त्यांच्याबरोबर होती. आईसह त्यांनी येशूंना विनंती केली. (मत्त 20:20-21).

[*] **10:38** “प्याला” या शब्दाप्रमाणेच “बाप्तिस्मा” हा अलंकारिक चिन्ह किंवा संकेत म्हणून वापरलेला आहे. येशू ख्रिस्त येथे पाण्याच्या बाप्तिस्म्याविषयीचा उल्लेख करीत नाहीत; याठिकाणी परीक्षा, मोह, पीडा आणि दुःखात बुडण्याविषयी म्हटलेले आहे. तुलना लूक 12:50.

[*] **10:46-52** मत्त 20:29-34. मत्तय म्हणतो की त्या वेळी दोन आंधळे बरे झाले होते. मार्क त्यातील एकाला विशिष्ट महत्वाचे स्थान देतो आणि त्याच्याकडे लक्ष वेधितो. (तुलना 5:1-2).

सोडून जात होता, तेव्हा तीमयाचा आंधळा मुलगा बार्तीमय वाटेवर बसून भीक मागत बसला होता. 47 जेव्हा त्याला हे कळले, की
नासरेथकर येशू याच वाटेने जात आहेत, तेव्हा तो मोठमोठ्याने ओरडून म्हणाला, “अहो! येशू दावीद-पुत्र, माझ्यावर दया करा.”
48 पुष्कळजण त्याला रागावून शांत रहावयास सांगू लागले, पण तो आणखी मोठ्या आवाजाने ओरडून म्हणाला, “दावीदपुत्रा,
माझ्यावर दया करा.“ 49 येशू थांबले आणि त्यांनी आज्ञा दिली की त्याला त्यांच्याजवळ आणले जावे, लोकांनी आंधळयाला
बोलावून म्हटले, “हिंमत ठेव, उठून उभा हो, येशू तुला बोलावीत आहेत.” 50 आपले वस्त्र एकीकडे फेकून तो उठला आणि
येशूंजवळ आला. 51 *येशूंनी त्याला विचारले, “मी तुझ्यासाठी काय करावे असे तुला वाटते?” आंधळयाने म्हटले, “गुरूजी, मला
पाहण्याची (डोळस) इच्छा आहे.” 52 *येशू त्याला म्हणाले, “जा तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे”, लगेच तो पाहू लागला आणि
ताबडतोब त्याने येशूंचे अनुसरण केले.

# 11

1 *जेव्हा ते यरूशलेमेजवळच्या बेथफगे व बेथानी जवळ, येऊन पोचले तेव्हा येशूंनी दोन शिष्य जैतूनांच्या डोंगराजवळ पाठवले;
2 त्यांना सांगितले, “पुढच्या गावी जा, ज्या क्षणी तुम्ही तेथे असाल, त्या क्षणीच तुम्हांला बांधलेले एक शिंगरू आढळेल ज्यावर
कधीही कोणीही बसले नाही, ते सोडा व येथे घेऊन या. 3 जर कोणी तुम्हांला म्हटले की, हे तुम्ही का करीत आहा, तर त्यांना सांगा
की “प्रभुजींना ते हवे आहे”, तेव्हा तो लगेच ते शिंगरू (पिलू) इकडे आणू देईल.“ 4 ते तेथून निघाले आणि त्याठिकाणी पोचल्यावर
त्यांना दाराजवळ बांधलेले एक शिंगरू आढळले; ते त्यांनी लगेच सोडले. 5 तेथे उभे असलेले लोक त्यांना म्हणाले, “हे बांधलेले
शिंगरू तुम्ही का सोडीत आहा?” 6 जेव्हा त्यांनी येशूंच्या आदेशाविषयी त्या लोकांना सांगितले तेव्हा त्यांनी शिष्यांना ते शिंगरू
घेऊन जाऊ दिले. 7 ते शिंगरू येशूंजवळ आणून त्यांनी आपली वस्त्रें त्याच्यावर घातली. 8 पुष्कळांनी वाटेवर आपली वस्त्रें पसरली;
दुसऱ्यांनी झाडांच्या डहाळ्या कापल्या आणि त्या वाटेवर पसरल्या. 9 पुढे जाणारे व मागे येणारे लोक, अशी घोषणा करू लागले,
“होसान्ना! प्रभूच्या नांवाने येणारा तो धन्य आहे; 10 *आमचा बाप दावीदाचे राज्य धन्य आहे, जे प्रभूच्या नांवाने येत आहे.आकाशात
होसान्ना”. 11 येशू यरूशलेमेच्या प्रार्थनाभवनात आले. त्यानी चारीं बाजूला पाहिले. बराच उशीर झालेला होता म्हणून ते आपल्या
बारा * शिष्यांबरोबर बेथानीकडे निघाले. 12 *पुढच्या दिवशी बेथानीहून निघाल्यानंतर येशूंना भूक लागली. 13 तेव्हा पानांनी बहरलेला
अंजिरांचा वृक्ष त्यांनी दुरूनच पाहिला. काही मिळण्याच्या अपेक्षेने ते त्या झाडाजवळ गेले; पण जवळ गेल्यावर त्यांना पानांशिवाय
त्यावर काहीही आढळले नाही कारण त्या वेळी अंजिराचा समय नव्हता. 14 येशूंना राग आला व ते त्या वृक्षाला म्हणाले, “यापुढे
कोणीही तुझे फळ न खावो.” येशूंचे शिष्य हे सर्व ऐकत होते. 15 यरूशलेमेस पोचल्यावर येशू आराधनालयात आले व खरेदी -विक्री
करणाऱ्या लोकांना त्यांनी बाहेर हाकलून दिले. येशूंनी मुद्रा बदलणाऱ्या लोकांचे चौरंग व कबूतरांची विक्री करणाऱ्यांच्या बैठकी
उलथवल्या. 16 येशूंनी प्रार्थनाभवनात भांडे ने आण करणाऱ्या लोकांना थांबवले. 17 येशूंनी असेही विचारले की, “असे लिहिलेले
नाही का, की माझे घर, सर्व राष्ट्रांसाठी प्रार्थनेचे घर म्हटले जाईल? परंतु तुम्ही तर ते, “चोरांचे केंद्र” (अड्डा) करून टाकले आहे.”
18 *हे ऐकल्यावर शास्त्री व मुख्य याजक (पुरोहित), येशूंचा घात कसा करावा याविषयी योजना तयार करू लागले, कारण येशूंची
शिकवण लोकांना स्तंभित करीत होती व लोक येशूंच्या शिकवणीने प्रभावित झाल्यामुळे ते येशूंना भीत होते. 19 संध्या समयी येशू
शहराबाहेर जात असत. 20 *सकाळच्या वेळी तेथून जात असताना त्यानी अंजिराचे झाड मूळापासून वाळलेले पाहिले. 21 पेत्राला
आठवताच तो बोलला, “गुरूजी पहा! ज्या अंजिराच्या झाडाला आपण शाप दिला होता, ते वाळून गेले आहे.” 22 येशूंनी उत्तर दिले,

---

*__10:51__ इब्री शब्द “रब्बी”चा अर्थ आहे माझे गुरूजी/माझे शिक्षक.

*__10:52__ पुन्हा एकदा आपण विश्वासाचे सामर्थ्य पाहतो. (9:23; मत्त 8:13; 9:22,29).

*__11:1-11__ मत्त 21:1-9.

*__11:10__ परमेश्वराने राज्याची प्रतिज्ञा दावीद व त्याच्या वंशजांशी केली होती. (पाहा 2 शमु 7:11-14; मत्त 1:1; लूक 1:32,69).

*__11:11__ *“बारा”*- अर्थात बारा प्रेषित (3:16-19).

*__11:12-25__ मत्त 21:12-22.

*__11:18__ शास्त्री व याजकगणांना आपले पद, अधिकार आणि सन्मान अतिशय प्रिय होते आणि येशू ती सर्व काही बदलून टाकतीलच अशी त्याच्या मनात भीति होती.

*__11:20__ मत्तय स्पष्ट करतो की मागील दिवशी ते अंजिराचे झाड काही अंशी वाळलेले होते. परंतु आता मात्र ते पूर्णपणे वाळले होते; अर्थात “मूळापासून”.

“परमेश्वरावर विश्वास ठेवा;” 23 मी तुम्हांला निश्चित सांगतो की जो कोणी संशय न बाळगता या पर्वताला असे म्हणेल की, 24 [*]येथून
बाजूला होऊन समुद्रात टाकला जा आणि हा विश्वास धरील की,जसे तो म्हणतो तसे होईल तर, त्याच्या तोंडच्या शब्दांनुसारच
त्याला मिळेल. 25 प्रार्थना करतांना[*] जर एखाद्याविषयी तुमच्या मनात काही तक्रार असेल तर त्याला क्षमा करा, याकरता की
तुमच्या स्वर्गीक पित्यानेही तुमच्या अपराधांची तुम्हांला क्षमा करावी. 26 पण जर तुम्ही क्षमा केली नाही तर तुमचा स्वर्गीक पिताही
तुम्हांला क्षमा करणार नाही[*]. 27 [*]त्यानंतर ते पुन्हा यरूशलेमेस परत आले. जेव्हा येशू प्रार्थनाभवनात होते, तेव्हा प्रमुख पुरोहित,
शास्त्री आणि वडील तेथे आले. 28 ते येशूंना म्हणाले,” हे सर्व काही आपण कोणत्या हक्काने करीत आहा? जे सर्व आपण करता ते
करण्याचा अधिकार आपणास कोणी देऊ केला आहे?” 29 येशू उत्तर देत म्हणाले,” मी देखील तुम्हांला एक प्रश्न विचारतो आहे;
मला उत्तर द्या म्हणजे मीही तुम्हांला उत्तर देईन.” 30 हे सांगा की योहानाचा बापतिस्मा स्वर्गापासून होता की पृथ्वीपासूनचा ? 31 ते
आपसांत बोलू लागले, जर म्हटले की परमेश्वरातर्फे, तर येशू म्हणतील की मग तुम्ही त्याचे का मान्य केले नाही? 32 जर आपण
म्हटले की मनुष्यांतर्फे, तर जे लोक योहानास संदेष्टा मानत (म्हणात ) होते, त्यांच्याविरुद्ध जाऊ. 33 त्यांचे आपसांतील बोलणे
संपल्यावर ते येशूंना म्हणाले, “आम्हांला माहीत नाही.” येशू त्यांने म्हणाले, “मग मी सुद्धा तुम्हांला सांगत नाही, की जे काही मी
करतो ते कोणत्या अधिकाराने करतो.”

# 12

1 [*]येशू त्यांना दाखले देऊन बोलू लागले : एका माणसाने द्राक्षाचा एक मळा लाविला, त्याच्यासाठी खड्डा खणला, त्यासाठी माळा
बांधला. यानंतर ते त्याने द्राक्षांच्या माळयांना भाड्यावर दिले आणि तो स्वतः दूर देशात निघून गेला. 2 आपल्याला माळयांकडून
द्राक्षमळयांच्या फळांचा एक भाग प्राप्त व्हावा म्हणून तो आणण्यासाठी, हंगामाच्या वेळी त्याने आपला एक नोकर पाठवला. 3 परंतु
शेतकऱ्यांनी त्याला पकडले, मारले आणि रिकाम्या हातांनी परत पाठवून दिले. 4 पुन्हा त्याने एक दुसरा नोकर त्यांच्याकडे
पाठवला. त्या लोकांनी नोकराला दगडमार करून त्याचे डोके घायाळ केले, त्याचा अपमान करून त्यालाही घरी पाठवले. 5 त्याने
आणखी एक नोकर पाठवला, पण त्यालाही त्यांनी मारून टाकले अशा प्रकारचा व्यवहार त्यांनी अनेकांशी केला, त्यांना मारहाण
केली वा पुष्कळांचा जीव घेतला. 6 शेवटी मालकाने आपल्या लाडक्या (प्रिय) मुलाला पाठवले, त्याला वाटले की माझा मुलगा
आहे म्हणून, ते सगळे त्याचा तरी सन्मान करतील. 7 परंतु त्या माळयांनी आपसांत म्हटले, “हाच वारीस आहे, चला आपण याला
मारून टाकू म्हणजे सर्व मालमत्ता आपली होईल.” 8 त्यांनी त्याला पकडले, बदडले आणि जिवें मारल्यानंतर द्राक्षमळयांबाहेर
त्याला फेकून दिले. 9 तर मग आता त्या मळयाचा मालक काय करील? तो येईल व माळयांचा समूळ नाश करून संपूर्ण द्राक्षाचा
बगीचा दुसऱ्यांना देऊन टाकील. 10 तुम्ही पवित्रशास्त्र वाचले नाही काय? ज्या दगडाला शाही-बांधकामगारांनी (बांधकाम
करणाऱ्यांनी) रद्द केले होते, तोच दगड मुख्य कोनशिला झाला? 11 हे परमेश्वर पित्याचेच कार्य आहे आणि आमच्या दृष्टीने ते उत्कृष्ट
व अद्‌भुत (आश्चर्यकारक) आहे. 12 तेव्हापासून ते येशूंना धरावयाच्या बेतात राहू लागले. पण त्यांना लोकांची भीति वाटत होती.
त्यांना ठाऊक होते की, हा दाखला त्यांच्या विषयीचाच होता आणि ते येशूंना सोडून निघून गेले. 13 [*]येशूंना त्यांच्याच गोष्टीत
फसवता यावे म्हणून, नंतर त्या लोकांनी काही परूशी व हेरोदी लोक येशूंकडे पाठवले. 14 हे लोक येशूंना म्हणाले, “गुरूजी,

---

[*]**11:24** येशू पुन्हा एकवार विश्वासाच्या सामर्थ्यावर, वैशिष्टयावर भर देतात, (2:5; 5:34; 6:5; 10:52; मत्त 9:22). जर आपण खरोखर विश्वास धरिला की प्रभूने आपली प्रार्थना ऐकून त्याचे उत्तर दिले आहे तर हे योग्य आणि बरोबर आहे आणि असेच व्हायला हवे. पण अशा प्रकारचा विश्वास कशा प्रकारे शक्य होईल? हे याद्वारे होत नाही की स्वतःशी बोलून किंवा विचार करून म्हणावे की प्रभूने माझे ऐकिले आहे आणि तरीही वास्तविक पाहता आपला विश्वासच नाही की त्याने ते ऐकिलेले आहे, खरा व सत्य विश्वास तेव्हाच येतो जेव्हा आपण परमेश्वराच्या वचनाला प्रतिसाद देतो, ते मानितो. सत्य विश्वास, आपल्या हृदयांत पवित्रआत्म्याने केलेल्या कार्याचाच परिणाम आहे. तुलना रोम 8:26; 1 योहान 5:14-15;पाहा मत्त 9:22.

[*]**11:25** *“प्रार्थना करतांना”*- या शब्दांकडे लक्ष द्या. बायबल असे शिकवीत नाही, की एखाद्या विशिष्ट तऱ्हेने बसून किंवा उभे होऊन, प्रार्थना केल्यानेच आपली प्रार्थना ऐकली जाईल; किंवा असेही नाही की एखादी खास मुद्रा, दुसऱ्यापेक्षा उत्तम आहे.

[*]**11:26** *“तुमचा...नाही”*- तुलना मत्त 6:14-15.

[*]**11:27-33** मत्त 21:23-27.

[*]**12:1-12** मत्त 21:33-46.

[*]**12:13-17** मत्त 22:15-22.

आम्हांला ठाऊक आहे की आपण सच्चे आहात आणि कोण काय विचार करतो किंवा म्हणतो, यांशी आपले काहीही देणेघेणे नाही;
आपण कोणाचेही बाह्य रंगरूप पाहात नाही परंतु जे स्वर्गीक सत्य आहे तेच शिकवता. 15 *आम्ही कैसराला कर द्यावा की नाही?
त्या लोकांचे कपट ओळखून येशू म्हणाले, “तुम्ही मला का पारखता? जरा मला एक नाणे दाखवा,” 16 त्यांनी नाणे आणून दिले
तेव्हा येशूंनी त्यांना विचारले, “याच्यावर कोणाचे चित्र आहे?” ते म्हणाले “कैसराचे”. 17 येशू त्यांना उत्तर देऊन म्हणाले, “जे
कैसराचे ते कैसराला द्या व जे परमेश्वराचे ते त्याला द्या.” हे उत्तर ऐकून ते सर्व आश्चर्यचकितच झाले. 18 *सदूकी जे पुनरूत्थानावर
विश्वास करीत नाहीत, ते येशूंना म्हणाले; 19 “गुरूजी मोशेद्वारे आम्हांला हा आदेश दिलेला होता, की जर एखाद्या मनुष्याला मुलेंबाळें
नसलीत आणि तो मेला व त्याच्या मागे त्याची बायको राहिली, तर त्याच्या भावाने आपल्या वहिनीशी विवाह करून आपल्या
भावाचा वंश वाढवावा. 20 सात भाऊ होते; पहिला मुलेंबाळें न होता मरण पावला. 21 दुसऱ्या भावाने पहिल्या भावाच्या
बायकोबरोबर विवाह केला, परंतु त्यालाही मुलेंबाळें झाली नाहीत, तो देखील मरण पावला. तीच गोष्ट तिसऱ्या बाबतही घडली.
22 सातही भावांनी एकाच स्त्रीशी विवाह केला, पण त्यांनाही संतान झाले नाही, तेही मेले आणि सर्वात शेवटी ती बायको देखील
मेली. 23 म्हणून, ज्या वेळी सर्व जिवंत होतील त्या वेळी, ती त्यांच्यापैकी कोणाची बायको होणार? कारण त्या सातही जणांनी
तिच्याशीच विवाह केलेला होता. 24 येशू म्हणाले, “तुम्ही पवित्र शास्त्र व परमेश्वराचे सामर्थ्य ओळखलेले नाही म्हणून ही चूक करीत
आहा; 25 कारण मेलेल्यांतून जिवंत झाल्यानंतर त्यांच्यात लग्न (विवाह) होणारच नाहीत. 26 हे सत्य, की मेलेले पुन्हा उठवले जातील
तुम्ही मोशेच्या पुस्तकात वांचले नाही काय? झुडपाच्या अग्नीतील (रोशनी) घटनेत, परमेश्वराने कशा प्रकारे मोशेशी वार्तालाप केला
की, “मी अब्राहाम, इसहाक आणि याकोबाचा परमेश्वर आहे. 27 तो मेलेल्यांचा नव्हे तर जिवंत लोकांचा परमेश्वर आहे. म्हणून तुम्ही
भयंकर मोठ्या धोक्यांत (लबाडी- फसवणूक) सापडलेले आहा!” 28 *त्यांच्यापैकी एका शास्त्र्याने (यहूदी धर्माचे जाणकार) हे
ऐकले व पाहिले की येशूंनी किती कौशल्याने, समर्पक उत्तरे दिली; म्हणून त्याने येशूंना विचारले, “हे गुरू! सर्वात पहिली आज्ञा
कोणती?” 29 *येशू म्हणाले, “सर्व आज्ञांपैकी पहिली आज्ञा हीच आहे, की हे इस्त्राएला ऐक, आपला प्रभु* परमेश्वर हा एकमेव
आहे; 30 तुम्ही संपूर्ण हृदयाने, जिवाने, बुद्धिने व संपूर्ण शक्तिसरशी आपल्या परमेश्वरावर प्रेम करा, हीच पहिली आज्ञा आहे. 31 दुसरी
अशी आहे, जसे तुम्ही स्वतःवर प्रेम करता तसेच आपल्या शेजाऱ्यावरही करा; या दोन्हींपेक्षा मोठी अशी दुसरी कोणतीही आज्ञा
नाहीये.” 32 शास्त्री त्यांना म्हणाला, “उत्तम गुरू, आपण अगदी खरे बोलता की परमेश्वर एकच आहे आणि त्याच्याशिवाय अन्य
कोणीही नाही. 33 *आपल्या संपूर्ण हृदयाने, बुद्धिनें आणि शक्तिने परमेश्वरावर प्रेम करणे आणि शेजाऱ्यावर आपल्यासारखेच प्रेम
करणे हे सर्व होमांचे अर्पण व बलिदान यांपेक्षाही श्रेष्ठ आहे.” 34 *येशूंनी त्याचे समर्पक उत्तर ऐकले आणि त्याला म्हटले, “तू
परमेश्वराच्या राज्यापासून दूर नाहीस.” 35 यानंतर मात्र येशूंना ,आणखी प्रश्न विचारण्याची हिंमत कोणीही केली नाही. प्रार्थनाभवनात
शिकवितांना , येशू म्हणाले, “शास्त्री का म्हणतात की येशू ख्रिस्त दावीदाचे पुत्र* आहेत, हे कसे? 36 *कारण, स्वतः दावीदाने
पवित्रात्म्याच्या मदतीने (स्फूर्तिने) म्हटले होते की, “प्रभूंनी माझ्या प्रभुला म्हटले, “जोपर्यंत मी तुझ्या शत्रूंना धूळ चाटांवयास लावीत
नाही (तोपर्यंत) माझ्या उजवीकडे बैस”, 37 म्हणून जर स्वतः दावीद ‘प्रभु’ म्हणतो तर मग तो त्याचा पुत्र कसा काय झाला? येशूंचे हे
बोलणे सर्वसाधारण लोकही ऐकत होते. 38 *शिक्षण देताना येशू म्हणाले, “शास्त्र्यांविषयी सांभाळून रहा. लांबलांब झगें घालून,
बाजारांत फिरून, लोकांचा नमस्कार त्यांना ऐकावयाचा असतो. 39 तसेच आराधनालयांत पहिल्या खुर्चीच्या आणि सणांत सर्वांत

---

*__12:15__ कपट (ढोंग) याविषयी इतर वचनें : मत्त 6:2,5,16; 7:5; 23:13,28; लूक 12:1; 19:15; 1 तीम 4:2; 1 पेत्र 2:1.

***12:18-27** मत्त 22:23-33.

***12:28-37** मत्त 22:34-46.

***12:29** अनु 6:4.

* *“प्रभु”*- याचा संकेत किंवा उल्लेख “याहवे” करता केलेला आहे. जुन्या करारात हे परमेश्वराचे नांव आहे.

***12:33** पाहा - 1 शमु 15:22; होशेय 6:6; मीखा 6:6-8.

***12:34** या माणसाने थोडे आतंरिक ज्ञान, आणि थोडया दीनतेचे प्रदर्शन केले. त्याने केलेल्या अंगिकाराद्वारे आपल्याला त्याची नम्रता दिसते. “प्रभु येशू अगदी खरे बोललेत” असा अंगिकार त्याने केला होता. तो परमेश्वराच्या राज्याजवळ होता, पण तरीही तोपर्यंत राज्याच्या आत नव्हता. प्रत्येक पिढीत असेच पुष्कळ लोक आहेत, यात शंकाच नाही. नोट्स - परमेश्वराचे राज्य - मत्त 4:17.

***12:35** *“दावीदाचे पुत्र”*- नोट्स - मत्त 1:1.

***12:36** “पवित्रात्म्याच्या मदतीने(स्फूर्तिने)” - पाहा मत्त 22:43.

***12:38-39** तुलना - मत्त 23:5-7.

उत्तम खोल्यांच्या शोधांत ते लागलेले असतात. 40 *पण, लांब -लांब प्रार्थनांचा बहाणा करून, हे लोक मात्र विधवांची घरें विध्वस्त
करुन उजाडपणाने भरुन टाकतात, म्हणून तेच सर्वांत मोठा दंड प्राप्त करतील.” 41 **येशू कोषागाराजवळ बसून, दान पेटीत दान
टाकणाऱ्या लोकांना पाहत होते. श्रीमंतांपैकी बरेच लोक पेटीत मोठी रक्कम टाकीत होते. 42 *एक गरीब विधवा तेथे आली व तिने
दोन तांब्याची नाणीं दानपेटीत घातली; ज्यांची किंमत एक दमडी इतकी होती. 43 आपल्या शिष्यांना बोलावून येशू म्हणाले, “मी
सत्य सत्य सांगतो की, दानपेटीत जे लोक दान टाकीत आहेत, त्या सर्वांपेक्षा सर्वांत जास्त या गरीब विधवेने टाकलेले आहे.
44 कारण सर्व लोकांनी आपल्या श्रीमंतीच्या भरभराटीतून टाकले पण हिने मात्र आपल्या गरीबीतून, आपल्या संपूर्ण जीवनाची
जणूकांही, सर्व कमाईच टाकून दिलेली आहे.

# 13

1 **येशू प्रार्थनाभवनाच्या (मंदिरात) बाहेर येताच, त्यांच्या एका शिष्याने त्यांना म्हटले, “गुरूजी, पहा येथे कशा प्रकारचे दगड व
इमारतीं आहेत! 2 येशू म्हणाले, “तू या इमारतींबाबत बोलीत आहेस काय? याठिकाणी असा कोणताच दगड नाही, जो खाली
फेकला जाणार नाही. 3 जेव्हा येशू जैतूनांच्या डोंगरावर बसले होते, तेव्हा पेत्र, याकोब, योहान व अंद्रिया यांनी त्यांना एकांतात
विचारले, “आम्हांला सांगा की असे कधी होईल? 4 आणि या गोष्टी पूर्ण होण्याच्या समयीचे कोणते चिन्ह असेल?” 5 उत्तर देऊन
येशू म्हणाले, “सावध रहा, लक्ष असू द्या, की कोणी तुमची फसवणूक करता कामा नये.” 6 कारण माझ्या नांवाने अनेक लोक
येऊन, ख्रिस्त होण्याचा दावा करून लोकांना बहकवतील. 7 जेव्हा तुम्ही युद्ध आणि युद्धाचा आवाज ऐकाल, तेव्हा घाबरून जाऊ
नका, कारण या घटनांचे घडणे गरजेचे (अवश्य) आहे, परंतु हा अंतिम समय नसणार. 8 एक देश दुसऱ्या देशाविरूद्ध आणि एक
राज्य दुसऱ्या राज्याविरूद्ध उठेल. वेगवेगळया ठिकाणी भूकंप, दुष्काळ आणि अफरातफरी माजेल; ही तर दुःखाची (पीडा)
सुरवातच असेल. 9 परंतु, तुम्ही सावध रहा, कारण ते तुम्हांला महासभांच्या हाती सोपवीतील. आणि तुम्हांला पंचायतींत (सभेत)
मारतील; माझ्यासाठी तुम्हांला अधिकारी व राजे यांच्यांसमोर उभे केले जाईल, यासाठी की त्यांच्यापुढे तुम्ही माझ्यासाठीचे
साक्षीदार ठरावे. 10 सर्व देशांत येशू-वार्ता गाजवली जाणे (ऐकवणे) आवश्यक आहे. 11 *परंतु जेव्हा ते तुम्हांला सोपवून देतील तेव्हा
आधी ही चिंता करू नका की तुम्ही काय बोलाल, किंवा कोणत्या विचारांसह तयार असाल.परन्तु, त्याऐवज़ी जे काही तुम्हांला
(बोलण्यास ) दिले जाईल तेच बोला,कारण बोलणारे तुम्ही नसाल, तर पवित्र*ात्माच आहे. 12 *भाऊ आपल्या भावाचा आणि पिता

---

*12:40** बाहेरून ते धार्मिक दिसत होते पण आंतून/गुप्तपणे ते लोभी, क्रूर, निर्दयी, असाहाय्य, असमर्थ व दुबळया आणि कमजोर लोकांना लुबाडणारे, गैरफायदा घेणारे होते. तुलना मत्त 23:25-28.(मत्तय 23व्या संपूर्ण अध्यायात अशा धार्मिक ढोंगी लोकांच्या मनाचे आणि मार्गाचे निर्भीकपणे, उघडरित्या वर्णन केलेले आहे).

***12:41-44** परमेश्वराला देण्याविषयीचे काही आवश्यक धडे येशू शिकवीत आहेत. आपण परमेश्वराला काय देतो, ते येशू आताही पाहतात. तुलना इब्री 4:12-13.जे श्रीमंत व धनी लोक स्वतःसाठी भरपूर राखून ठेवतात पण परमेश्वराला त्यापेक्षा कमी देतात, त्यांच्या बाबतीत येशू नाखुष असतात; असे श्रीमंत लोक त्यांच्यावर काहीही प्रभाव टाकीत नाहीत; कारण त्यांच्या दृष्टीने लहान-अल्पशी भेट, मोठ्या राशीपेक्षा कितीतरी मोलवान व महत्वाची आहे. येशू दान देणाऱ्याची प्रवृत्ति/हेतू यांकडे लक्ष देतात, त्या ‘देण्यात’ किती बलिदान केले गेले, किती किंमत मोजावी लागली हे बघतात. येशू हे पाहात नाहीत की व्यक्ती किती देतो, पण हे पाहतात की तो स्वतःसाठी किती ठेवतो. गरीब विश्वासीच्या दानांत प्रभु येशूंना विशेष रूचि आहे, गरीब विश्वासींनी दिलेली दानें त्यांना प्रसन्न करतात. तुलना 2 करिं 8:1-5,12.नोट्स 2 करिं 9:15.

***12:41** प्रार्थनाभवनाच्या बाहेर असलेल्या अंगणात हा कोषागार होता.

***12:42** ग्रीक भाषेत ‘नाणे’ सर्वांत लहान मुद्रा होती; आणि ती त्या देशात चालत होती. तिने दोन नाणी दिली होती, त्यांपैकी एकही तिने स्वतःसाठी राखून ठेविली नव्हती.

***13:1-37** मत्त 24:1-51.

***13:1-2** येशूंचे शिष्य, लोकांनी केलेल्या कामाचे खूप कौतुक करू शकतो, त्यांच्या कामाच्या सौंदर्यामुळे-आकर्षणामुळे असा विचार करू शकतो की बहुमूल्य आहेत.. पण शेवटी माणसाने केलेली श्रेष्ठतम-भव्य कार्ये, वाकडी तिकडी होऊन गडगडून कोसळतील (खाली पडतील); कारण शेवटी माणसाची कृत्यें सर्व काही ठरवितील. पाहा - यश 2:6-22; प्रकटी 18:9-24.

***13:11** मत्त 10:19-20.

* *“पवित्र”*- मत्त 3:16; योहान 14:16-17.

आपल्या पुत्राचा घात करवून देईल. मुलें आपल्या आईबापांविरूद्ध होतील व त्यांचा प्राणघात करवून टाकतील. 13 माझ्या नांवामुळे
(खातर) सर्व लोक तुमचा तिरस्कार व घृणा करतील. 14 *परंतु जो शेवटपर्यंत सहन करील, तोच वांचेल. ज्या समयी तुम्ही, ओसाड
करणारा तो पदार्थ, ज्याच्याविषयी दानीएल संदेष्टयाने सांगितले होते, तेथे उभा असलेला पाहाल जेथे तो नसावा*, त्या समयी
यहूदीयातील लोकांनी पळून डोंगराकडे निघून जावे. 15 जो घराच्या धाब्यावर असेल त्याने खाली उतरू नये किंवा घरातून काही
घेण्याकरता घरात शिरू नये. 16 जो कोणी आपल्या शेतांत असेल त्याने आपले वस्त्र घेण्यासाठी परत जाऊ नये. 17 परंतु शोक आहे
त्या गर्भवती स्त्रियां आणि दूध पाजणाऱ्या आयांसाठी. 18 हीच प्रार्थना करा की हे सर्व काही हिवाळ्यात घडू नये. 19 कारण त्या
दिवसांत अशी पीडा होईल जशी दुनियेच्या प्रारंभापासून वर्तमान काळापर्यंत झाली नाही, किंवा भविष्यांतही कधीच होणार नाही.
20 जर प्रभुजींनी ते दिवस कमी केले नसते तर कोणताही मनुष्य वाचू शकला नसता, परंतु निवडलेल्या लोकांसाठी हे दिवस कमी
केलेले आहेत. 21 त्या वेळी जर कोणी तुम्हांला म्हणेल की पाहा, “ख्रिस्त येथे आहे किंवा तेथे आहेत, तर ते खरें मानू (एकूच) नका;
22 कारण ‘खोटे ख्रिस्त’ व ‘खोटे संदेष्टे’ उठून उभे होतील आणि ते चिन्ह व चमत्कारही दाखवतील, यासाठी की लोकांची दिशाभूल
व्हावी आणि इतकी, की जमले तर निवडलेल्यांना सुद्धा मार्गापासून दूर न्यावे. 23 पण, पहा सावध असा, मी आधीच तुम्हांला सर्व
काही सांगितलेले आहे. 24 तरीपण त्या दिवसांच्या पिडेनंतर, सूर्याचा प्रकाश संपेल आणि चंद्रही प्रकाश देणार नाही. 25 आकाशांतून
तारें खाली पडू लागतील आणि आकाशांतील शक्ति (बळें) हलविल्या जातील. 26 तेव्हा ते मनुष्याच्या पुत्राला मोठ्या सामर्थ्याने व
वैभवाने मेघांवर येतांना बघतील. 27 तेव्हा परमेश्वर आपले दूत, आपल्या निवडलेल्यांना चारीं दिशांतून एकत्र करण्यासाठी पाठवील
यासाठीच की पृथ्वीचे अत्यंत दूरदूरचे, कानाकोपऱ्यांतील लोक त्यांनी (दूतांनी) एकत्र जमवावे. 28 अंजिराच्या झाडापासून एक
दाखला शिका. जेव्हा त्याची डहाळी कोमल होऊन तिला पानें येऊ लागतात तेव्हा, तुम्हांला कळते की उन्हाळा जवळच आहे*.
29 याच प्रकारे जेव्हा तुम्ही या गोष्टी घडतांना पहाल तेव्हा समजून घ्या, की येशू येणार आहेत; नव्हे, ते अगदी दाराशीच आहेत.
30 मी तुम्हांला खात्रीने सांगतो की, जोपर्यंत सर्व गोष्टी पूर्ण होत नाहीत, तो पर्यंत ही पिढी* समाप्त होणार नाही. 31 आकाश व पृथ्वी
समाप्त (नाहीशी) होतील, पण माझी वचनें (जे बोलतो) पूर्ण झाल्याशिवाय राहणारच नाहीत. 32 *परंतु त्या क्षणांविषयी कोणालाही
ठाऊक नाहीये म्हणजे, ना स्वर्गातील देवदूतांना ना पुत्राला (मी), केवळ परमेश्वरबापच जाणतो. 33 सावध रहा, जागे असा व प्रार्थना
करीत रहा, कारण तो निश्चित समय केव्हा येईल हे तुम्हांला ठाऊक नाही. 34 मनुष्याचा पुत्र (अर्थात मी) एका अशा माणसाप्रमाणे
आहे जो आपल्या घरापासून कोठेतरी दूर आहे, ज्याने घर सोडण्यापूर्वी आपल्या सेवकांपैकी प्रत्येकाला अधिकार आणि
जबाबदारी नेमून दिली आणि द्वाररक्षकाला जागे राहण्याची आज्ञा केली. 35 म्हणून सतर्क व्हा, कारण तुम्हांला ठाऊक नाही की तो
(घराचा स्वामी) केव्हा येईल; संध्याकाळी, मध्यरात्री किंवा भल्या पहाटे किंवा सकाळी. 36 नाहीतर, असे होऊ नये की, त्याने
अचानक यावे व तुम्हांला झोपा काढतांना पहावे. 37 जे मी तुम्हांला सांगत आहे, तेच सर्वांना सांगतो आहे, जागे असा!”

## 14

1 *वल्हांडण* व बेखमीर भाकरीचा सण याला अजून दोन दिवस बाकी होते आणि प्रमुख-याजक व शास्त्री, याच संधिची वाट
पाहत होते की, येशूंना कपटाने कसे धरावे आणि जिवें मारावे. 2 पण ते लोक म्हणाले, “सणाच्या दिवशी नाही कारण त्यामुळे
कदाचित मोठा दंगा (हडबड) होईल. 3 जेव्हा येशू बेथानी येथील एका शिमोन कुष्ठरोग्याच्या (कोडयाच्या) घरी जेवावयास बसले
होते तेव्हा एक स्त्री अलाबास्त्र कुपीत मौल्यवान उत्तर घेऊन आली. (हे उत्तर फार महाग होते). तिने कुपी फोडली व येशूंच्या

---

*__13:12-13__ मत्त 10:21-22.

*__13:14__ मत्त 24:15.

* *“जेथे तो नसावा”*- म्हणजे प्रार्थनाभवन/मंदिर. तुलना 2 थेस्स 2:4.

*__13:28__ *“जवळच आहे”*- दुसऱ्या शब्दांत “तो जवळ आहे, ते ओळखून घ्या”.

*__13:30__ *“ही पिढी”*- किंवा हा वंश.

*__13:32-37__ येथे येशूंच्या दुसऱ्या आगमनाविषयी सतर्क मत्त 24:36-51, चौकस व जागृत राहण्याकडे संकेत केलेला आहे; त्याकडे लक्ष देण्यावर भर दिला आहे. (वचन 33,35,37).

*__14:1-72__ मत्त 26:1-75.

*__14:1__ *“वल्हांडण”*- निर्ग 12:11; लेवी 23:5-6.

डोक्यांवर त्यातील उत्तर ओतले. 4 *त्यांपैकी काही लोक नाराज होऊन म्हणाले, “हे सुगंधी मौल्यवान उत्तर असे व्यर्थ (नाश) का
केले गेले? 5 हे तीनशे चांदीच्या नाण्यांस* विकून गरीबांची मदत करता आली असती; इतर दुसरेही तशीच तक्रार करू लागले.
6 येशू म्हणाले, “तिला तुम्ही का त्रास देत आहा? तिला तशीच सोडून द्या; तिने माझ्यासाठी एक उत्तम कार्य केले आहे. 7 गरीब लोक
तर तुमच्याबरोबर नेहमीच राहतील म्हणून जेव्हा तुमची इच्छा असेल तेव्हा तुम्ही त्यांची मदत करू शकाल. पण मी तुमच्याबरोबर
नेहमी असणार नाही. 8 ती जे काही करू शकत होती ते तिने केलेले आहे. (मला) पुरले जाण्यापूर्वीच तिने माझा अभिषेक केलेला
आहे. 9 मी तुम्हांला सत्य सांगतो की सर्व दुनियेत, ज्या-ज्या ठिकाणी येशू-वार्ता गाजवीली जाईल, त्या त्या ठिकाणी, जे काही या
स्त्रीने केलेले आहे, (त्यासाठी) लोक तिची आठवण करतील. 10 यहूदा इस्कर्योत जो बारांपैकी एक होता, येशूंना धरून
मुख्ययाजकांच्या स्वाधीन करण्याच्या हेतूने त्यांच्याकडे पोचला. 11 *ज्या वेळी त्यांनी ऐकले, त्या वेळी ते आनंदी झाले आणि त्यांनी
त्याला काही रक्कम देण्याचे कबूल केले. तो योग्य वेळी येशूंना धरून देणार होता. 12 बेखमीर भाकरीच्या सणाच्या पहिल्या दिवशी
जेव्हा वल्हांडणाचे कोकरू* बलिदान व्हावयाचा (जीव घेतला),तेव्हा येशूंच्या शिष्यांनी त्यांना विचारले, “वल्हांडणाचे भोजन
करण्याची तयारी आम्ही कोठे करावी? याविषयी आपली काय इच्छा आहे?” 13 *येशूंनी दोन शिष्यांना असे सांगून पाठवले की,
“तुम्ही नगरात जा आणि तुम्हांला पाण्याचे मडके घेतलेला एक मनुष्य आढळेल, त्याच्याबरोबर जा. 14 तो ज्या घरात प्रवेश करील
त्या घराच्या मालकाला असे सांगा, “की गुरूजींना जाणून घ्यायचे आहे की पाहुण्यांची ती विशेष जागा कोठे आहे, जेथे ते आपल्या
शिष्यांबरोबर वल्हांडणाचे भोजन करतील? 15 तो तुम्हांला तयार केलेली एक मोठी खोली दाखवील, त्याच ठिकाणी आपल्या
सर्वांसाठी भोजनाची तयारी करा. 16 येशूंचे शिष्य तेथून निघून नगरात आले आणि जसे त्यांना सांगितले होते तसेच (ते सर्व काही)
त्यांनी तेथे पाहिले. त्यांनी वल्हांडणाची तयारी केली, 17 संध्याकाळी ते बारा जणांसह तेथे आले. 18 जेव्हा ते येशूंबरोबर भोजन
करीत होते तेव्हा येशू म्हणाले, “मी तुम्हांला सत्य सांगतो की माझ्याबरोबर जेवणाऱ्यांपैकी एक मला धोका देईल.” 19 ते सर्व दुःखी
झाले आणि एकमेकाला विचारू लागले, “काय तो मी आहे?” दुसरा म्हणाला, “तो मी आहे काय?” 20 येशू उत्तर देऊन म्हणाले,
बारांपैकी एक जण आहे, जो माझ्याबरोबर ताटांत हात घालतो आहे. 21 जसे मनुष्याच्या पुत्राविषयी लिहीलेले आहे, तसे तर
त्याच्याविषयी होईलही, परंतु त्या मनुष्याविषयी शोक होतो, ज्याच्या हातून तो धरून दिला जाईल; तो मनुष्य जन्मलाच नसता तर
बरें झाले असते! 22 ज्या वेळी ते खात होते त्या वेळी येशूंनी भाकर घेतली आणि आशीर्वाद दिला व नंतर भाकर मोडून त्यांना देत
असताना म्हटले, “घ्या, खा. हे माझे शरीर आहे;” 23 येशूंनी प्याला घेतला, उपकार मानून त्यांना दिला आणि सर्वजण त्यांतून
प्यायलेत. 24 *येशूंनी त्यांना म्हटले, “हे नवीन कराराचे रक्त दर्शवीत आहे, जे पुष्कळांसाठी वाहिले जाणार आहे. 25 मी तुम्हांला सत्य
सांगतो की, जोपर्यंत परमेश्वराच्या राज्यात मी नवीन द्राक्षारस पीत नाही, तो पर्यंत (मी) पुन्हा द्राक्षारस पिणारच नाही.” 26 मग एक
गीत गाईल्यानंतर ते सर्व जैतूनांच्या डोंगराकडे निघून गेले. 27 *येशू त्यांना म्हणाले, “याच रात्री तुम्ही सर्व माझ्यासाठी अडखळाल
कारण लिहीले आहे की,” मी मेंढपाळाला मारीन आणि मेंढरें इकडेतिकडे पांगतील. 28 मी जिवंत उठल्यानंतर तुमच्या आधी मी
गालीलात जाईन. 29 परंतु पेत्र त्यांना म्हणाला, जरी सर्व अडखळले तरी मी ढिम्म अडखळणार नाही. 30 येशू म्हणाले, “मी खरेखरे
सांगतो, की आज, होय आजच रात्री, कोंबडा आरवण्यापूर्वी, तू तीनदां मला नाकारलेले सुध्दा असेल.” 31 तो भर देऊन पुन्हा
म्हणाला, “मला आपल्याबरोबर मरावे लागले तरी मी आपल्याला नाकारणार नाही.” हीच गोष्ट सर्व जण बोलले. 32 ते सर्व गेथशेमाने
नांवाच्या स्थानावर आले; तेथे येशू शिष्यांना म्हणाले, “मी प्रार्थना करतो तोवर तुम्ही येथे बसा;” 33 पेत्र, याकोब आणि योहान यांना

---

*__14:4__ शिष्य असे म्हणाले होते (मत्त 26:8) आणि त्यांत यहूदा सर्वांत पुढे होता (पाहा योहान 12:4-5.ही एक दुसरी विशिष्ट वेळ असावी. योहान 12:2चे नोट्स पाहा).

*__14:5__ *“तीनशे चांदीच्या नाण्यांस”*- ग्रीक भाषेत “तीनशे दीनार” - एका मजुराची तीनशे दिवसाची मजूरी इतकी होती.

*__14:11__ विश्वासघात व धोका करण्याची संधी त्यांना मिळाली होती. जगातील सर्वांत पवित्र आणि सर्वश्रेष्ठ माणसाला घात करण्याच्या या संधिचा त्यांना आनंद झाला होता. वाईट-घृणात्मक चरित्राचे इतके चांगले प्रगटीकरण करणारे दुसरे कोणतेही उदाहरण सापडूं शकेल काय? नाखुशीने दुष्टाई करणे ही एक गोष्ट/बाजू आहे पण त्यात आनंदी होणे, त्याचा आनंद घेणे ही दुसरी गोष्ट आहे आणि ती अत्यंत वाईट बाब आहे.

*__14:12__ *“वल्हांडणाचे कोकरू”*- निर्ग 12:3-11.पाहा योहान 1:29.

*__14:13-15__ जी कधी पूर्वी घडली नाही त्या घटनाक्रमाचे विस्तारपूर्वक अवलोकन/आकलन येशूंनी केले; यावरून येशू ख्रिस्तांची योग्यता आढळते.

*__14:24__ मत्त 26:28 यांत ‘ख्रिस्तांचे रक्त सांडणे’ याचे कारण लिहिलेले आहे.

*__14:27__ जखऱ्या 13:7.

येशूंनी आपल्याबरोबर घेतले. येशू आपल्या अंतःकरणात अत्यंत अस्वस्थ व व्याकूळ होत होते. 34 येशू त्यांना म्हणाले, “माझे मन
खूप दुःखी आहे आणि असे वाटते आहे की माझा प्राणच निघून जाईल की काय! येथेच थांबा आणि जागे रहा. 35 थोडे दूर गेल्यावर
येशू जमिनीवर नतमस्तक झाले आणि त्यांनी अशी विनंती केली, की “शक्य असेल तर ही वेळ संपून जावी,” 36 येशू म्हणाले,
“अब्बा *, बापा, तुला सर्व काही शक्य आहे; हा प्याला माझ्यापासून दूर कर, तरीपण माझी नव्हें तर तुझीच इच्छा पूर्ण होवो”.
37 परत आल्यावर येशूंनी सर्वांना झोपी गेलेल्या अवस्थेत पाहिले आणि पेत्राला म्हटले, “शिमोना, तू झोपीत आहेस काय? एक तास
सुद्धा तू माझ्याबरोबर जागा राहू शकला नाहीस?” 38 जागे रहा आणि प्रार्थना करा, यासाठी की तुम्ही परीक्षेत पडू नये (प्रलोभनांत
पडू नये). आत्मा तयार आहे खरा, परंतु शरीर कमजोर आहे. 39 मग पुन्हा येशू पुढे गेले आणि प्रार्थनेत त्यांनी तेच शब्द म्हटले.
40 नंतर परत आल्यावर त्यांनी त्यांना पुन्हा झोपलेलेच पाहिले; त्यांचे डोळे फारच जड झाले होते आणि येशूंना आपण काय उत्तर
द्यावे हे त्यांना कळत नव्हते. 41 पुन्हा तिसऱ्यांदा येऊन येशू त्यांना म्हणाले, “तुम्ही आता देखील झोपत आहा आणि विश्रांती घेत
आहा?बस्स! पुरे झाले आहे. तो समय येऊन ठेपला (आलेला) आहे; पहा मनुष्याचा पुत्र अपराध्यांच्या हातांत धोक्याने फसवला व
सोपवला जाईल. 42 उठा, येथून चला. पहा, मला धोका देऊन धरून देणारा जवळच आहे.” 43 येशू बोलत असतानाच, बारांपैकी
एक यहूदा तेथे आला. त्याच्याबरोबर प्रमुखयाजक आणि शास्त्र्यांनी पाठवलेल्या लोकांचा एक मोठा समुदाय होता. त्यांच्या हातांत
तरवारी व काठ्या होत्या. 44 येशूंना धरून देणाऱ्याने त्यांना एक इशारा दिला होता; तो हा की, “मी ज्याचे चुंबन घेईन तोच आहे.
त्याला धरा व सुरक्षेच्या बंदोबस्ताने घेऊन जा.” 45 तेथे येताच यहूदाने येशूंना ‘गुरूजी’ म्हणून त्यांचे चुंबन घेतले. 46 त्या लोकांनी
येशूंना अटक केली. 47 जवळ असलेल्या लोकांपैकी एकाने आपली तरवार उपसून वार केला, त्यामुळे प्रमुखयाजकाच्या नोकराचा
कान कापला गेला. 48 येशू त्यांना म्हणाले, “(ज्याप्रमाणे) एखाद्या चोराला पकडण्यासाठी तरवारी व काठ्या घेऊन जातात, त्याच
प्रमाणे तुम्ही मला धरायला आला आहा काय?” 49 प्रार्थनाभवनात मी नेहमी तुम्हांला शिकवीत होतो, त्या समयी तुम्ही मला धरले
नाही, परंतु पवित्रशास्त्रातील (बायबल) गोष्ट पूर्ण व्हावयाची होती. 50 तेव्हा सर्व शिष्य (येशूंना सोडून) तेथून पळून गेले. 51 *एक
तरूण मनुष्य आपल्या अंगावर वस्त्र पांघरलेला होता, तो त्यांच्याबरोबर चालू लागला. 52 काही लोकांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न
केला, तेव्हा तो आपले वस्त्र तेथेच टाकून पळून गेला. 53 येशूंना प्रमुखपुरोहिताकडे नेण्यात आले आणि सर्व प्रमुख पुरोहित, वडील
व शास्त्री त्याठिकाणी एकत्र होते. 54 *पेत्र दुरूनच चालत तेथे येत होता व प्रमुखयाजकाच्या अंगणापर्यंत पोचून सेवकांबरोबर तो
विस्तव शेकीत बसला. 55 प्रधानपुरोहित व संपूर्ण सभा * येशूंना.मरणदंडासाठी, आवश्यक असलेल्या साक्षीदाराच्या शोधात होते,
परन्तु ते यशस्वी झाले नाहीत. 56 पुष्कळांनी येशूंविरूद्ध खोटी साक्ष दिली, पण त्यांची साक्ष जुळेनाशी ठरली. 57 तेव्हा काही
लोकांनी उभे राहून खोटी साक्ष देत असे म्हटले, की 58 *“आम्ही याला असे बोलतांना ऐकले होते की, “प्रार्थनाभवन जे हातांनी
बांधलेले आहे, ते मी नष्ट करेन, आणि तीन दिवसांत हातांनी न बांधलेले असे दुसरे तयार करेन.” 59 परंतु तरीही त्यांच्या साक्षीत
मेळ बसेना (समानता नव्हती). 60 प्रमुखयाजकाने उभे राहून येशूंना म्हटले, “तुझ्याविरूद्ध आरोप लावले जात आहेत, तू काही उत्तर
का देत नाहीस?” 61 येशू शांतच राहिले. प्रमुखयाजकाने पुन्हा विचारले, “तू परमप्रधानाचा पुत्र ‘ख्रिस्त’ अर्थात मशीहाआहेस
काय?” 62 येशू म्हणाले, “यात शंकाच नाहीये. तुम्ही मनुष्याच्या पुत्राला सर्व अधिकारांसह आणि आकाशांतील मेघांबरोबर येतांना
पहालही” 63 तेव्हा प्रमुखयाजकाने आपले कपडे फाडले; तो म्हणाला, “आता आम्हांला कोणत्याही साक्षीची काय गरज? 64 तुम्ही
परमेश्वराची निंदा ऐकलेलीच आहे; तुमचा काय विचार आहे?” त्या सर्वांनी येशूंना आरोपी म्हटले, व ते मृत्यूदंडास योग्य आहे असे
ठरविले. 65 काही लोक त्यांच्यावर थुंकू लागले, काहींनी येशूंचे तोंड झाकून व त्यांना बुक्क्या मारून म्हटले, “आता भविष्यवाणी
कर” अधिकाऱ्यांनीही त्यांना चांगलेच हाणले. 66 जेव्हा पेत्र खाली अंगणात होता तेव्हा प्रमुख-याजकाची दासी तेथे आली.

---

* **14:36** *“अब्बा”*- अरामी भाषेतील शब्द ज्याचा अर्थ आहे ‘बाप’ ‘पिता’. परमेश्वरपित्याला निश्चितच शक्य होते की त्यांनी येशूंना दुःख आणि मृत्यूच्या वेदनांपासून वाचवावे; (येशूंचे दुःख टाळणे त्यांना शक्य होते) पण तशी त्याची इच्छा नव्हती. “परमेश्वराने येशूंना वाचवण्याचा अर्थ म्हणजे माणसांकरता तयार केलेली तारणाची योजना “परमेश्वराने रद्द करणे” आणि “मनुष्याला त्याच्या दुर्दशेत सोडून देणे” अर्थात ‘अटळ असलेल्या पिडेच्या अवस्थेतच त्याला राहू देणे’, असा झाला असता.

* **14:51-52** केवळ मार्क याविषयी लिहितो. तो तरूण स्वतः ‘मार्कच’ असावा, नाहीतर त्याने या घटनेचा उल्लेख कां केला हे समजणे कठीण झाले असते.

* **14:54** मत्त 26:58 यांत लिहिलेले आहे की पेत्र तेथे कां गेला.

* **14:55** *“सभा”*- सेन्हेड्रिन - मत्त 5:22.

* **14:58** योहान 2:19 यांत लिहिलेले येशूंचे शब्द वेडेवाकडे करून म्हणणेच आहे. मनुष्याने तयार केलेल्या, बांधलेल्या मंदिराला मी नष्ट करीन असे येशूंनी म्हटलेच नव्हते.

67 पेत्राला विस्तव शेकतांना पाहून ती म्हणाली, “त्या नासरेथकर येशूंबरोबर तू देखील होतास ना?” 68 पण नाकारून पेत्र तिला
म्हणाला, “तुला म्हणायचे तरी काय आहे! मला काहीही समजत नाहीये.” पेत्र ज्या वेळी बाहेर अंगणात आला त्याच वेळी कोंबडा
आरवला. 69 [*]पेत्राला पुन्हा तेथे पाहून, ती जवळच उभ्या असलेल्या लोकांना पुन्हा सांगू लागली, “हा देखील त्यांच्यापैकीच एक
आहे.” 70 पेत्राने पुन्हा स्पष्ट नकार दिला. काही वेळाने जवळ उभे राहणारे लोक पुन्हा पेत्राला म्हणाले“काही कां असेना! तू खात्रीने
त्यांच्यापैकीच एक आहेस, तू गालीली आहेस म्हणून तुझी बोलीसुद्धा त्यांच्यासारखीच आहे.” 71 परंतु पेत्र शपथ वाहून म्हणाला,
“ज्या माणसाविषयी तुम्ही बोलत आहा त्याला मी ओळखत सुध्दा नाही.” 72 त्याच क्षणी कोंबडा, दुसऱ्यांदा आरवला, तेव्हा
पेत्राला ती गोष्ट आठवली जी येशूंनी त्याला म्हटली होती, “कोंबडा दुसऱ्यांदा आरवण्यापूर्वी तू मला तीन वेळा नाकारलेले सुध्दा
असेलही” हे आठवताच तो जोरजोराने रडू लागला.

# 15

1 [*]मग पहाट झाल्यावर प्रमुख-याजक, वडील, शास्त्री व न्यायसभा या सर्वांनी आपसात सल्ला केला, नंतर त्यांनी येशूंना बांधले
आणि नेऊन पिलाताच्या सुपूर्द केले. 2 [*]पिलाताने येशूंना विचारले, “तू यहूद्यांचा राजा आहेस काय?” उत्तर देऊन येशू म्हणाले, “होय
असेच आहे.” 3 प्रमुख-याजकांनी सर्व गोष्टींत त्यांच्यावर आरोप ठेवला परंतु येशूंनी त्यांना कोणतेही उत्तर दिले नाही. 4 पिलाताने
विचारले, “तू उत्तर देशील काय? पहा, तुझ्यावर कितीतरी आरोप केले जात आहेत, काय काय म्हटले जात आहे!” 5 तरीपण येशूंनी
उत्तर दिले नाही, म्हणून पिलात आश्चर्यचकित होता. 6 सणाच्या दिवसांत, पिलात जनतेच्या विनंतीनुसार एक कैदी मुक्त करीत असे.
7 एका कैद्याचे नांव बरब्बा होते; तो आपल्या सोबतच्या खूनी व बंडखोरांबरोबर तुरूंगात ठेवलेला होता. 8 जसे पिलात,
लोकांकरता करीत असे, तशीच लोक देखील मागणी करू लागले. 9 पिलाताने उत्तर दिले, “यहूद्यांच्या राजाला तुमच्यासाठी मी मुक्त
करावे, अशी तुमची इच्छा आहे काय? 10 त्याला नीट ठाऊक होते, की प्रमुख-याजकांनी हेव्याने येशूंना त्याच्या हाती सोपवले होते.
11 परंतु प्रमुख-याजकांनी, लोकांना भडकवले की पिलाताने येशूंऐवजी बरब्बाला सोडून द्यावे. लोकांच्या गर्दीने मोठ्याने ओरडून
तशीच मागणी केली. 12 पिलाताने पुन्हा म्हटले, “ज्याला तुम्ही यहूद्यांचा राजा म्हणता, त्याचे मी काय करू?” 13 ते सर्व पुन्हा
ओरडले, “त्याला क्रूसावर खिळून टाका.” 14 [*]पिलाताने विचारले “का? त्याने काय वाईट केले आहे?” ते आणखी मोठमोठ्याने
ओरडू लागले, “होय, त्याला क्रूसावर खिळा.” 15 म्हणून लोकांना खुश करण्यासाठी पिलाताने बरब्बाला सोडले आणि येशूंना फटके
मारून क्रूसावर खिळण्यासाठी सोपवले. 16 शिपाई त्यांना कचेरीत अर्थात प्रीटोरियन हॉलकडे घेऊन गेले. मग त्यांनी पूर्ण रोमन
तुकडी एकत्र बोलावली. 17 त्या लोकांनी येशूंना जांभळे वस्त्र घालून, काट्यांचा मुकुट घातला. 18 ते त्यांना प्रणाम करू लागले
“यहूद्यांच्या राजा प्रणाम” असे म्हणू लागले. 19 त्यांनी येशूंच्या डोक्यावर वेताने मारले, त्यांच्यावर थुंकले आणि गुडघे टेकून येशूंना
नमन केले. 20 थट्टा केल्यानंतर, त्यांनी त्यांच्या अंगावरचे जांभळे वस्त्र काढले व त्यांचे कपडे पुन्हा त्यांना घालून क्रूसावर
खिळण्यासाठी बाहेर घेऊन गेले. 21 [*]त्या लोकांनी शिमोन कुरेनकर, नांवाच्या माणसाला जो अलेक्सांद्र व रूफ यांचा बाप होता,
क्रूस वाहून नेण्यासाठी भाग पाडले; तो तर त्या वाटेवरून केवळ जातच होता. 22 येशूंना ते गुलगुथापर्यंत (म्हणजे कवटींची जागा)
घेऊन गेले. 23 त्यांनी येशूंना बोळ मिसळलेला द्राक्षारस पिण्यासाठी दिला परंतु येशूंनी तो घेण्यास नकार दिला. 24 येशूंना क्रूसावर
खिळल्यानंतर, येशूंच्या कपड्यांसाठी त्यांनी चिठ्या टाकल्या आणि ते कपडे वांटून घेतले. 25 [*]सकाळी नऊ वाजतां त्यांनी येशूंना

---

[*] **14:69** अंगणातील समुदायाला पेत्राविषयी शंका होती; त्यावर त्यांनी संशय केला होता. अनेकांनी त्याला प्रश्न विचारिले किंवा त्याच्याविषयी दुसऱ्यांना सांगितले होते - दासी (दोनदा) दुसरी मुलगी (मत्त 26:71) एक मनुष्य (लूक 22:58), कांही लोक जे विस्तव शेकत होते; प्रामुख्याने, महायाजकाच्या दासाचा नातेवाईक (योहान 18:25-26). सर्व शुभवर्तमान लेखकांपैकी काहींचा उल्लेख आहे, लेखकांपैकी कोणीही त्या सर्वांचा उल्लेख केलेला नाही. नोट पहा 4:1-20.

[*] **15:1** मत्त 27:1-2. मत्तय यहूदाच्या आत्महत्येविषयी लिहितो, पण मार्क त्याकडे दुर्लक्ष करतो.

[*] **15:2-47** मत्त 27:11-61.

[*] **15:14** मत्त 27:25 पाहा की आता यहूदी लोकांनी किती भयंकर गोष्ट म्हटली.

[*] **15:21** स्पष्टपणे कळते की आलेक्सांद्र आणि रूफ हे दोन असे व्यक्ती होते ज्यांना त्या दिवसानंतरही येशूवार्ता वाचणारे पुष्कळ लोक ओळखत होते. पण आपल्याला त्यांच्याविषयी कांहीही माहीत नाही. एक रुफस (शक्यतो समान) मध्ये उल्लेख आहे रोम 16:13.

[*] **15:25** तिसरा तास म्हणजे 9 वाजतां, ग्रीक भाषेत सांगितल्यास सूर्योदयानंतरचा तिसरा तास.

क्रूसावर खिळले. 26 येशूंसाठी ‘दोष पत्र’ या प्रकारे होते : ‘यहूद्यांचा राजा’. 27 येशूंच्या दोन्हीं बाजूला, दोन चोर, एक उजवीकडे व
एक डावीकडे असे क्रूसावर खिळले. 28 हा लेख की, ‘येशू अपराध्यांबरोबर गणले गेले.[*]’ अशा प्रकारे पूर्ण झाला. 29 त्या वाटेने
जाणाऱ्या लोकांनी आपली डोकी डोलवून येशूंची थट्टा असे म्हणून केली, की “अरे, मंदिर मोडून तीन दिवसांत बांधणाऱ्या! 30 आता
आपला बचाव कर आणि क्रूसावरून खाली ये!” 31 तसेच प्रमुख याजक, शास्त्र्यांबरोबर मिळून त्यांची थट्टा करीत म्हणाले, “याने
दुसऱ्यांना वाचवले पण स्वतःला वाचवू शकला नाही; 32 इस्त्राएलांचा राजा व मशीहा याने आता, क्रूसावरून खाली यावे म्हणजे ते
पाहून तरी आम्हीही विश्वास करू.” ज्यांना येशूंबरोबर क्रूसावर खिळले होते, ती माणसें देखील त्यांचा अपमान करत होती. 33 दुपारी
बारा वाजता आकाशी अंधार पसरला, जो जवळजवळ दुपारी तीन वाजेपर्यंत राहिला. 34 तीन वाजतांच्या सुमारास येशू उंच आणि
मोठ्या आवाजात ओरडून म्हणाले, “एलोई, एलोई, लमा सबखथनी!” म्हणजे, हे माझ्या परमेश्वरा, माझ्या परमेश्वरा, तू मला का
सोडून दिले?” 35 जवळ उभे राहणाऱ्या लोकांपैकी काहींनी हे ऐकून म्हटले, “पहा तो एलीयाला बोलावीत आहे.” 36 त्यांच्यापैकी
एकाने धावत जाऊन द्राक्षारस व आंबेने भरलेला स्पंज, लाकडाच्या टोकावर ठेवला आणि येशूंना चोखावयास दिला आणि असे
बोलला की, “याला एकटा सोडा, आता आपण पाहू, एलीया येऊन याला खाली उतरवतो की नाही.” 37 तेव्हा येशूंनी मोठ्याने
आरोळी मारली आणि आपला जीव दिला.[*]. 38 [*]प्रार्थनाभवनाचा (मंदिराचा) पडदा वरून खालपर्यंत फाटून त्याचे दोन भाग झाले.
39 जेव्हा तेथे समोरच उभे असलेल्या सुभेदाराने येशूंना अशा प्रकारे आरोळी मारून प्राण सोडतांना पाहिले तेव्हा तो म्हणाला, “हा
मनुष्य खरोखरच परमेश्वराचा पुत्र होता.” 40 दुरून स्त्रिया हे पाहत होत्या; त्यांच्यात मग्दालीया मरीया, योसेस व लहान याकोब यांची
आई मरीया व सलोमे या होत्या. 41 जेव्हा येशू गालीलात होते तेव्हापासून त्या त्यांचाबरोबर राहून त्यांची सेवा करीत असत.
याखेरीज यरूशलेमेतून आलेल्या इतर अनेक स्त्रियांही होत्या. 42,43 [*]अरिमथाईकर योसेफ सभेचा.[*] आदरणीय सदस्य होता. तो
परमेश्वराच्या राज्याची.[*] वाट पाहत होता; त्याने मोठ्या हिंमतीने शब्बाथाच्या आदल्या दिवशी, जो तयारीचा दिवस होता,
संध्याकाळी पिलाताकडे जाऊन (त्याला) येशूंचे शरीर मागितले. 44 पिलाताला आश्चर्य झाले की येशू मरण पावले होते. त्याने
सुभेदाराला बोलावून विचारले की येशूंनी केव्हा प्राण सोडला. 45 [*]सुभेदाराकडून पूर्ण माहिती मिळवल्यानंतर पिलाताने येशूंचे शव
योसेफाच्या स्वाधीन केले. 46 त्याने येशूंचे शव खाली काढले आणि आपल्याबरोबर आणलेल्या उत्तम तागाच्या वस्त्रांत ते गुंडाळले,
त्यानंतर खडकात खोदलेल्या कबरेत ठेवले. 47 येशूंचे शव कोठे ठेवण्यात आलेले आहे, हे मग्दालीया मरीया व योसेची आई मरीया
पाहत होत्या.

# 16

1 [*][*]शब्बाथ संपल्यानंतर, येशूंच्या शवावर सुगंधी द्रव्यें लावली जावीत म्हणून मग्दालीया मरीया, याकोबाची आई मरीया यांनी ती

---

[*]**15:28** *“येशू अपराध्यांबरोबर गणले गेले”*- यश 53:12.पवित्र आणि निष्कलंक परमेश्वराचे -पुत्र अपराधी समजला गेला.

[*]**15:37** *“आपला जीव दिला”*- मत्त हा शब्द वापरतो की त्यांनी आपला आत्मा दिला, पण ग्रीक भाषेत हा शब्द वेगळा आहे.

[*]**15:38** मत्त 27:51.

[*]**15:42** सूर्यास्तानंतर यहूदी शब्बाथाचा प्रारंभ होत असे, आणि दुसऱ्या दिवशी तो सूर्यास्तापर्यंत कायम राहात असे. या दरम्यान कोणत्याही प्रकारचे कार्य केले जात नव्हते. (पाहा निर्ग 20:8-11) याच कारणास्तव योसेफाला येशूंचे शरीर (शव) सूर्यास्तापूर्वी क्रूसावरून खाली काढण्याची इच्छा होती. याठिकाणी ज्या शब्बाथाचा उल्लेख केला आहे कदाचित तो विशिष्ट असा शब्बाथ होता ज्यांपासून बेखमीर भाकरीचा सण प्रारंभ होत असे. दर शनिवारी येणारा हा काही साधारण शब्बाथ नव्हता; काही विद्वान म्हणतात की येशू बुधवारी मेले, कांहीचा सल्ला आहे की ते गुरूवारी मेले, तर इतर दुसरे म्हणतात की तो दिवस शुक्रवार होता. दिवसाविषयी मतभेद व विवाद करण्यात कांहीही अर्थ नाही.

[*]**15:42-43** *“सभेचा”*- म्हणजे सेन्हेड्रीन - नोट्स - मत्त 5:22.येशूंना क्रूसावर ज्या लोकांनी खिळिले, योसेफ त्या लोकांच्या पक्षाचा/बाजूचा नव्हता (लूक 23:51).

[*]*“परमेश्वराच्या राज्याची”*- मत्त 4:17.

[*]**15:45** क्रूसावर खिळिल्यानंतर येशू सहा तासानंतर मरण पावले होते. क्रूसावर खिळिलेल्यापैंकी कांही लोक कधी कधी दोन ते तीन दिवस जिवंत राहात असत. म्हणून येशूंचे शरीर पुरण्याकरता देण्यापूर्वी त्याने निश्चितपणे पूर्णतः खात्री करून घेतली की येशू खरोखरच मेले आहेत वा नाही, त्याचप्रमाणे यहूदी पुढाऱ्यांनाही निश्चित ठाऊक होते की येशू मेले आहेत. मत्त 27:62-66पाहा.

[*]**16:1-8** मत्त 28:1-8.

विकत घेतली. 2 त्या सर्व, आठवडयाच्या पहिल्या दिवशी, सूर्य उगविण्याआधीच भल्या पहाटेस कबरेवर पोचल्या. 3 आपसांत त्या
एकमेकीला म्हणत होत्या, “आपल्यासाठी कबरेवरील धोंड कोण बाजूला लोटेल? 4 तेथे पोचल्यानंतर त्यांनी पाहिले की खूप मोठी
असलेली ती धोंड, आधीपासूनच एकाबाजूला लोटलेली होती. 5 *आंत गेल्यावर एक तरूण लांब पांढरा झगा घालून, उजव्या
बाजूला बसलेला त्यांनी पाहिला आणि त्या प्रचंड भयभीत झाल्या. 6 तो व्यक्ती त्यांना म्हणाला, “भिऊ नका, क्रूसावर खिळलेल्या
येशूं नासरेथकरांचा शोध तुम्ही करीत आहा, ते येथे नाहीत कारण जिवंत झाले आहेत, जेथे त्यांना ठेवले होते ती जागा पाहा,
7 *ताबडतोब जाऊन त्यांच्या शिष्यांना आणि पेत्रालाही सांगा की येशू तुमच्यापुढे गालीलात असतील, अगदी जसे त्यांनी तुम्हांला
सांगितले होते, तसेच तुम्ही त्यांना तेथे पाहाल. “ 8 *यानंतर लवकरच त्या कबरेपासून निघून पळू लागल्या, कारण त्या भय व
आश्चर्याने खूपच भरून गेल्या होत्या. 9 * *जिवंत उठल्यानंतर प्रभात समयी, आठवडयाच्या पहिल्या दिवशी, येशूंनी सर्वप्रथम
मग्दालीया मरीया, जिच्यामधून त्यांनी सात भुतें काढली होती तिची भेट घेतली. 10 जे लोक येशूंबरोबर राहिले होते, पण आता शोक
करून रडत होते, त्यांना जाऊन तिने ही बातमी सांगितली. 11 *तिच्याद्वारे जेव्हा त्यांना कळले की येशू जिवंत आहेत आणि तिने
त्यांना पाहिलेले आहे, तरीही त्यांनी विश्वास ठेवला नाही. 12 यानंतर बाहेरच्या भागांत (क्षेत्रांत) जाणाऱ्या दोन लोकांवर, येशूंनी
स्वतःला दुसऱ्या रूपाने प्रगट केले. 13 त्या दोघांनीही जाऊन बाकी लोकांना हे वर्तमान सांगितले, पण तरीही त्यांनी विश्वास ठेवला
नाही. 14 अकरा * शिष्य ज्या वेळी भोजन करावयास बसले होते, त्या वेळी येशू अचानक तेथे उपस्थित झाले आणि त्यांचा
अविश्वास व अंतःकरणाचा कठीणपणा पाहून त्यांच्यावर रागावले, कारण येशू जिवंत झाले, असे ज्या लोकांनी पाहिले होते, त्यांच्या
शब्दांवर त्यांनी विश्वास ठेवला नव्हता. 15 *येशू म्हणाले, “संपूर्ण दुनियेत जाऊन सर्व लोकांना ही आनंदाची खबरबात सांगा. 16 *जो

---

***16:1** कोणतेही शव पुरण्यापूर्वी ही एक प्रथा होती. स्पष्ट कळते की या स्त्रियांना येशूंच्या जिवंत उठण्याविषयीची खात्री नव्हती; कारण येशूंचे पुनरूत्थान होणार नाही या विचारानेच त्यांनी त्या प्रथेचे पालन केले होते.

***16:5** हा एक स्वर्गदूत होता जो मनुष्याच्या रूपांत आला होता. (मत्त 28:2). स्वर्गदूतांवर पाहा - उत्प 16:7.

***16:7** ज्या पेत्राने येशूंना नाकारले होते, त्याच्यासाठी येशूंजवळ एक विशेष संदेश होता. पेत्राने स्वतःचा धिक्कार करावा किंवा आता यापुढे तो येशूंचा शिष्य गणला जाणार नाही असा विचार करावा, हे येशूंना नको होते. म्हणून ते म्हणाले की “पेत्राला” सांगा. जे लोक भयंकर चुका करतात, अशांवर प्रभु कधी कधी खूपच प्रेम करतो आणि त्याच्याविषयी विचारशील असतो.

***16:8** याचा अर्थ असा आहे की त्यांनी वाटेने जातांना, शिष्यांजवळ पोहंचेपर्यंत कोणालाही कांहीही सांगितले नव्हते, नव्हे त्या कोणाशी बोलल्याच नव्हत्या. (मत्त 28:8; लूक 24:9,19).

***16:9-20** काही ज्ञानी म्हणतात की ही वचनें मार्कानें लिहिलेल्या मूळ मुक्तीवार्तेचा भाग नव्हते, पण कोणीतरी ती नंतर त्यांत जोडली होती (समाविष्ट केली होती). ही गोष्ट खरी आहे की प्रारंभी असलेल्या हस्तलिखितात किंवा मूळ प्रत यांत ही वचनें आढळत नाहीत. असे कोणतेही प्रमाण नाही की ही वचनें हस्तलिखितात नव्हती. आमचा विश्वास आहे की मार्कानें किंवा कोणीही ज्याने ही वचनें लिहिली ती पवित्र आत्म्याच्या प्रेरणेनेच लिहिली. ही वचनें परमेश्वराच्या पवित्रआत्म्याच्या स्फूर्तिने लिहिली गेल्यामुळे ती “परमेश्वराने म्हटलेले वचन” म्हणून स्वीकारावीत.

***16:9** योहान 20:11-18; लूक 8:2.

***16:11** या बाईने ती साक्ष दिली नसती तरी त्यांनी येशूंच्या जिवंत उठण्यावर विश्वास ठेवायला हवा होता. येशू स्वतःच म्हणाले होते की मी मेल्यानंतर पुन्हा जिवंत होईन (9:31; मत्त 16:21; 17:22-23). परंतु साक्ष दिल्यानंतरही त्यांनी अविश्वासच केला; आणि विश्वास ठेविलाच नाही. (वचन 12,13; पाहा लूक 24:13-32). हे या गोष्टीचे प्रमाण आहे की ते अंधविश्वासी नव्हते किंवा एखाद्याच्या गोष्टीवर सोप्या रीतिने विश्वास ठेवून धोका खाणारे लोक नव्हते; अर्थात ते प्रमाणाशिवाय विश्वास करणारच नव्हते.

***16:14** *“अकरा”*- यहूदाला वगळून ते अकरा, प्रमुख आणि विशेष शिष्य होते. (मत्त 27:5). लक्षात घ्या की हे शिष्य आपल्याप्रमाणेच मानव होते. आमच्याप्रमाणेच शाकाही वरदान होते. त्यांनाही परमेश्वराची निंदा करण्याची गरज होती.

***16:15** 1 करिं 15:1-8 यांत येशू आपल्या शिष्यांना (तेव्हा आणि आताही) आज्ञा देतात की त्यांनी या पृथ्वीवरील प्रत्येकाला उद्धाराची वार्ता सांगावी, त्यांच्या उपदेशाचा प्रचार करावा (मत्त 28:18-20; लूक 24:47-48; योहान 20:21; प्रेषि 1:8). येशूंनी सर्वांसाठी आपला जीव दिला म्हणून त्यांनी सर्वांसाठी काय केले, हे लोकांना कळावे असे येशूंना हवे आहे (त्यांची इच्छा आहे); (2 करिं 5:14-15; 1 तीम 2:6; 1 योहान 2:2). प्रत्येक विश्वासीने आपल्या शक्ति व क्षमतेनुसार, सर्व जगाला येशूंची वार्ता गाजविण्याचा भरसक प्रयत्न करावा.

***16:16** नोट्स - बाप्तिस्मा - मत्त 3:6.तारण विश्वासाद्वारे प्राप्त होते (योहान 3:16; 5:24; 6:47; प्रेषि 16:31; रोम 1:17; 3:22,25; गल 2:16; इफि 2:8-9) तारण प्राप्त करून घेण्यासाठी बाप्तिस्मा आवश्यक नाही, पण ज्यांचा विश्वास येशू ख्रिस्तांवर आहे त्यांनी

विश्वास करील व बाप्तिस्मा घेईल त्याचा उद्धार होईल, पण जो विश्वास करणार नाही तो शिक्षेपासून (दंडापासून) मुक्त होऊ शकणार
नाही. [17] *जे लोक विश्वास बाळगतील त्यांच्यात ही चिन्हें असतील : [18] ते नवीन (अन्य) भाषा बोलतील. जरी साप त्यांच्या हातास गुंडाळलेला असला आणि त्यांना कोणी विष देखील दिले असले, तरी त्यांचे काहीच नुकसान होणार नाही; ते आजाऱ्यांवर हात ठेवतील आणि आजारी बरें होतील.
[19] *त्यांच्याशीअसे बोलल्यानंतर प्रभु येशू वर (स्वर्गात) उचलून घेतले गेले आणि तेव्हापासून ते परमेश्वराच्या अधिकारांसह तेथे आहेत.
[20] *शिष्य तेथून निघाले आणि सर्वत्र जाऊ लागले आणि येशू त्यांच्याबरोबर चिन्हें दाखवून, आपल्या सच्चेपणाचे (सत्याचे) प्रमाण देत राहिले.

---

बाप्तिस्मा घ्यावा आणि उघड व स्पष्टपणे आपल्या विश्वासाची साक्ष द्यावी. जर एक व्यक्ती म्हणतो की तो येशू ख्रिस्तांवर भरंवसा ठेवतो, पण जर तो बाप्तिस्मा घेत नसेल तर तो विश्वासीच नाही असा संशय येतो, "जो बाप्तिस्मा घेत नाही त्याला दंड होईल" असे येशू म्हणाले नाहीत, पण "जो कोणी विश्वास करणार नाही तो शिक्षेपासून मुक्त होऊ शकणार नाही" असे येशू म्हणाले. तुलना योहान 3:17-18.येथे शिक्षा/दंड याचा अर्थ "नरकदंड" असा होईल.

***16:17-18** याचा अर्थ असा नव्हे की या संपूर्ण कृपा- युगात प्रत्येकाच्या जीवनात ही चिन्हें असतीलच. अनेक खऱ्या व सात्विक विश्वासींत यांपैकी एकही चिन्ह नाही; त्यांतील एकही चिन्ह त्यांनी अनुभविले नाही ही एक वास्तविकता व खरी गोष्ट आहे. ही त्या लोकांविषयीची बाब आहे "जे विश्वास धरतील", त्या लोकांविषयी मुळीच नव्हे ज्यांच्याकडे असाधारण विश्वास असेल किंवा ज्यांचे जीवन जास्त समर्पित असेल. या वचनांचा अर्थ असा असावा, की ही चिन्हें 'जागतिक ख्रिस्ती चर्चमध्ये' असतील. दुष्टाला काढण्याविषयी : प्रेषि 5:16; 8:7; 16:18; 19:13-16. नवीन भाषा : प्रेषि 2:4; 10:46; 19:6; 1 करिं 12:10,28,30; 13:1; 14:2-39. सापासाठी - लूक 10:19; प्रेषि 28:3-5. बरे करण्याविषयी - प्रेषि 28:8-9; याकोब 5:14-15. (याचा अर्थ असा नाही की एखाद्याने आपला विश्वास कसा आहे हे दर्शविण्यासाठी मुद्दाम साप तयार केले पाहिजेत. तुलना करा मत्त 4:6-7).आपले सामर्थ्य प्रदर्शित करण्यासाठी किंवा दुसऱ्यांवर आपला प्रभाव घालण्यासाठी ही चिन्हें दिलेली नव्हती, ही गोष्ट विश्वासींनी समजून घ्यावी. हे जाणून घेणे गरजेचे आहे की ही चिन्हें परमेश्वराच्या हातांत आहेत. परमेश्वर कधीही ती देऊ शकतो आणि कोणत्याही वेळी ती थांबवू शकतो; ज्या ठिकाणी त्याची इच्छा आहे, तेथे ती देऊ शकतो. बायबल (नवा करार) यांत कोठेही असे वाचण्यात येत नाही की एखाद्याला विष दिले असावे. येथे दिलेली काही चिन्हें, आतंरिक दानाच्या यादीत आढळत नाहीत. आतंरिक वरदानें - रोम 12:6-8; 1 करिं 12 अध्याय. नोट्स - पाहा (यावरील)

***16:19** लूक 24:50-51; प्रेषि 1:9-11; स्तो 110:1. 'अधिकारांसह' म्हणजे अधिकारांची, सन्मानाची, आदराची जागा/स्थळ. तुलना मत्त 28:18; फिलि 2:9.

***16:20** वचनें 17,18; इब्री 2:4.